म. ग्रं. सं. ठाणे

विषय
काव्य

ग्रहालय क्रमांक
३८२

लेखक आ. दो. आठ

पुस्तकाचें नांव भावां

# भावसृष्टि

८१ -

कु

# भावी सृष्टी.

( पूर्वार्ध )

हें

थि राईटआनरेबल लार्ड लिटन यांच्या
" थि कमिंग रेस " या पुस्तकाच्या पूर्वार्धाचें
मराठींत भाषांतर, मेसर्स जार्ज रुटलेज आणि
सन्स यांच्या परवानगीनें,

[illegible] या पुस्तकात [illegible] गु[illegible] फोलटकर

यांनीं केलें.

तें

मुंबई येथें
जगदीश्वर छापखान्यांत छापिलें.

---

याची मालकी सन १८६७चा आक्ट २५ प्रमाणें नोंदली आहे

---

सन १८८७.

किंमत १० आणे.

# प्रस्तावना.

उच्च प्रतीच्या इंग्रजी कल्पित कादंबऱ्या कोणत्या धर्तीवर लिहीत असतात, याजविषयीं निवळ मराठी समजणारांस बोध व्हावा; इंग्रजी अभ्यास करणारांस भाषांतर करण्यास कांहीं प्रसंगीं मदत व्हावी, व स्वभाषेची यत्किंचित् तरी सेवा आपल्या हातून घडावी, या हेतूंनीं हें भाषांतर केलें आहे. मुळास कोठेंही सोडलेलें नाहीं. कांहीं ठिकाणीं थोडीशी दुर्बोधता उत्पन्न झाली आहे असें भासतें, पण मननकेल्यानें तिचें निवारण होईल अशी आशा आहे. या पुस्तकांत जे गुण आहेत ते मूळ ग्रंथकाराचे आहेत. दोषांचा वांटा माझा आहे.

हें पूर्वार्ध लोकप्रिय झालें तर उत्तरार्ध लवकरच प्रसिद्ध होईल.

ज. दा. को.

हें पुस्तक लार्ड लिटन साहेबांनीं मॉक्स मुल्लर साहेबांविषयीं आदर व पूज्य बुद्धि यांचे द्योतक म्हणून त्यांस अर्पण केलें आहे.

# भावी सृष्टी.

## भाग १.

अमेरिकेंतलि संयुक्त संस्थानांपैकीं ——— गांवीं माझें जन्म झालें. माझे पूर्वज इंग्लंडांतून दुसऱ्या चार्लस राजाच्या अमदानींत अमेरिकेंत रहावयास गेले. आणि स्वतंत्रतेकरितां त्या राष्ट्रानें जें युद्ध केलें त्यांत माझ्या आज्यानें ह्मणजे कांहीं कमी लौकिक संपादिला असें नाहीं. ह्मणून, आमचें घराणें मोठ्या कुळापैकीं गणलें जाऊन, समाजांत बऱ्याच उंच पदवीचा मान आम्हांस मिळत असे. कान्ग्रेस ह्मणून जी लोकनियुक्त मंडळी अमेरिकेचा राज्यकारभार चालविते त्यांत आपली निवड व्हावी म्हणून माझ्या तीर्थरूपानीं एकदां यत्न केला होता, पण बेव्या एक्या शिंप्यानें तो सर्वस्वीं बिघडाविला. असें झाल्यादिवसापासून माझ्या वडिलानीं राज्यकारस्थानाचें नांव सोडिलें; व नंतर ते पुस्तकालयांत प्रायशः कालक्रमण करीत. माझ्या तीन भावांपैकीं मी सर्वांत वडील. सोळाव्या वर्षीं मला इंग्लंडांत पाठविलें. माझा विद्याभ्यास पुरा व्हावा

व व्यापारसंबंधीं शिक्षण, लिव्हरपूल येथील एका व्यापाऱ्याच्या पेढीवर मीं शिकावें, असा या प्रवासाचा हेतु होता. मी एकवीस वर्षांचा झाल्यावर लौकरच माझे तीर्थरूप निवर्तले. आणि बरीच संपत्ति माझ्या पदरीं आल्यानें, व मला प्रवासाची व टक्के टोणपे खाण्याची हौस असल्यामुळें, त्या सर्व शक्तिमान् पैक्याचा अट्टाहास थोड्या कालपर्यंत सोडून, पृथ्वीच्या पृष्ठावर एकाकी भटकत फिरणारा मी बनलों.

सन १८—सालीं ——— गांवीं असतां, एका प्रवीण भूगर्भवेत्त्या इंजनेराशीं मीं स्नेह संपादिला. तो ज्या खाणीवर काम करीत असे त्या पाहण्याकरितां त्यानें मला एकदां बोलाविल्यावरून मी गेलों होतों.

ज्या प्रांताविषयीं हें वर्णन लिहिलें आहे, त्याचा मुद्दापत्ता यांत गुप्त ठेवण्याचें कारण, ही सगळी गोष्ट संपण्याच्या पूर्वींच आमच्या वाचकांस कळून येईल, आणि कोणी तर तो प्रांत उमगला जाण्या इतकें त्याचें वर्णन आम्हीं दिलें नाहीं, याबद्दल आमचे उपकार मानतील.

थोडक्यांत तात्पर्य काय कीं, सदहू माझ्या स्नेह्यासमागमें मी खाणीच्या पोटांत प्रवेश केला. तेथील निबिड अंधःकारांतील चमत्कार पाहून मी इतका अजब झालों, व माझ्या मित्राच्या शोधांत इतकें मन घालूं ला-

गलों कीं, आसपास बरेच दिवस माझें वास्तव्य झालें. मग कांहीं आठवडेपर्यंत रोजच्या रोज त्या पृथ्वीच्या पोटांतील स्वभावजन्य व मनुष्यकृतीनें बनलेल्या भुयारांत व सज्ज्यांवर मी उतरत असें. आमच्या इंजनेराची अशी समजूत झालेली होती कीं, त्यांणीं जो पाचर फोडण्याचें काम सुरू केलें होतें, त्याच्या खालीं आजपर्यंत सांपडलेल्या खनिज द्रव्यांहून अधिक मोलाचे पदार्थ खचित सांपडतील. एके दिवशीं हा पाचर फोडतां फोडतां आम्ही एका सुळे पडलेल्या व जणूं कांहीं काळापूर्वी ज्वाला मुखानें फाडलेल्या अशा एका विस्तीर्ण भेगीवर येऊन ठेपलों. तिच्या दोन्ही बाजू एकमेकींपासून तुटलेल्या दिसत. या भेगींत उतरण्याकरितां प्रथमतः भूगर्भ—वाय्वावरण—मापक दिवा सोडून, तेथें जाणें धोक्याचें नाहीं अशी खात्री करून घेऊन, मग माझ्या मित्रानें एका पिंजऱ्यांत बसून आपणास खालीं सोडविलें. तेथें त्या निबिड अंधःकारांत त्याणें सुमारें एक तास घालविला. परत येतो तों, तो फारच निस्तेज झालेला व काळजीची व विचाराची मुद्रा त्याजवर दिसूं लागली. साधारणतः तो खुला, आनंदी व निर्भय असा असे, त्या मानानें त्याची मुद्रा अगदींच विपरीत दिसली.

तो नुसतें इतकेंच ह्मणाला कीं, येथें उतरणें भयप्रद आहे व त्यापासून फारसा लभ्यांशही नाहीं. आणि

पाचर फोडण्याचें काम महकूफ करून, खाणीच्या दुसऱ्या संवयीतील भागावर आम्ही परतलों.

परंतु त्या सगळ्या दिवसभर माझ्या मित्राचा एकसारखा गहन विचार चालला होता. तो नित्यापेक्षां घुम्या बनला; त्याचे डोळे भूत पाहिलेल्या माणसासारखे भयभीत व कावरे बावरे झाले. रात्रीं आह्मी दोघेजण आमच्या खाणीच्या तोंडाजवळ घेतलेल्या बिऱ्हाडांत बसलों असतां, मी आपल्या मित्रास ह्मटलें:—

"गड्या, त्या भेगींत तूं काय पाहिलेंस तें मला मन मोकळें करून सांग. माझी खात्री आहे कीं, तें कांहीं तरी अजब व भयंकर असें असावें. कांहींही असो, त्या योगें तुझें मन भ्रांतींत पडलेलें आहे. अशा प्रसंगीं एकापेक्षां दोन डोकीं विचार करण्यास नाहीं का बरीं—ह्मणून, काय जें असेल तें मला सांग."

माझ्या मित्रानें माझ्या प्रश्नांच्या उत्तराची फार काळपर्यंत चुकवाचुकवी करण्याचा यत्न केला. परंतु बोलत असतां, न कळत त्याणें संवयीपेक्षां अधिकच मद्य प्राशन केलें; व प्रायशः तो फारच मद्य निषिद्ध असल्यानें, त्याचें मौनव्रत हळु हळू विरघळून गेलें. ज्याला ज्याला आपले विचार आपणापाशींच ठेवावयाचे असतील त्याणें त्या मुक्या जनावराचें अनुकरण करावें, व पिणें तें पाणी प्यावें.—अखेरीस तो ह्मणाला:—

"मी तुला सर्व सांगतों, ऐक. पिंजरा थांबतांच पाहतों तों मी एका दगडाच्या कड्यावर आहें. खालीं तें भुयार लांबच्या लांब व खोल उतरतें दिसतें आहे. आणि तो अंधःकार तर काय सांगूं कीं, माझ्या दिव्याचा तेथें कांहींच प्रवेश होईना. परंतु त्यांतून अव्याहत व लकाखित प्रकाशाची एक ज्योत्स्ना वर येतांना मला दिसली; त्या सरशीं मी अतोनात विस्मय पावलों. मनांत ह्मणतों, भूगर्भद्रव्याच्या तर या ज्वाला नसतील ना! पण तसें असतें तर मला खचित ऊष्णता भासली असती. याविषयीं संशय असला तर तो दूर करणें आपणा सर्वांच्या सुरक्षितपणा करितां अत्यंत आवश्यक होतें. म्हणून उतरणीच्या दोन्ही बाजू चांचपूं लागलों. तेव्हां मला वाटलें कीं, पुढें आलेल्या कड्यांच्या व तुटक्या दगडांच्या आश्रयानें कांहीं वाटपर्यंत तरी जातां येईल. मग पिंजऱ्यांतून उतरून खालीं सरपटत उतरलों. जसजसा त्या प्रकाशा नजीक येत गेलों तसतशी ती भेग अधिक रुंदट होत चालली. अखेरीस त्या भुयाराच्या पायथ्याशीं एक खासा रुंद सपाट रस्ता, नजर जाई इतक्या लांबीचा पाहून मला जें आश्चर्य वाटलें तें सांगतां पुरवत नाहीं. त्याजवर नेमक्या अंतरावर दिव्याचे खांब असून ते जणूं एखाद्या मोठ्या शहरांत जसे धुराचे दिवे लावलेले असावे तसे दिसले. दुरून मनुष्यांच्या ध्वनीची

गलबल व चाहुल माझ्या कानीं आली. या प्रांतीं दुसरे कोणी खाणीवर काम करणारे नाहींत हें मला ठाऊक होतें. तर मग हा कोणा माणसांचा शब्द असावा? व ते रस्ते इतके सपाट कोणी तयार केले असतील व ती दिव्यांच्या खांबांची रांग कोणी बनविली असेल?

"आम्हां खाणींत काम करणाऱ्यांत अशी एक भोळी समजूत आहे कीं, पृथ्वीच्या पोटांत भुतें व पिशाच्यें राहत असतात. त्या समजुतीचा मजवर अंमल बसत चालला. तेव्हां खालीं उतरून त्या भूगत चिंचोळया प्रांतींच्या रहिवाश्यांशीं टक्कर मारण्याचा प्रसंग येणार, याचें मला भय वाटून, कंप सुटला. आतां, तेथें पाय लागावयाला दोऱ्यांची मदत असल्या शिवाय व्यर्थ हें खरें. कारण ज्या पायथ्याशीं मी पोंचलों होतों, तेथून त्या खडकाचे कडे तुटलेले, गुळगुळीत व उभंट होते. तेव्हां जसातसा संकटानें परतलों. ही कायती माझी सगळी हकीगत आहे."

"तर मग पुनः तुह्मी उतरणार असाल?"

"असें तर खरें, पण मला वाटतें बोवा इतकें धाडस आपल्याच्यानें होणार नाहीं."

"खात्रीचा सोबती असला म्हणजे प्रवास निम्मे वाटतो व धैर्य दुणावतें. मी तुम्हांबरोबर येईन म्हणजे झालें. सामागमें माफक लांबीच्या व मजबुत दोऱ्या आपण घेऊं,

आणि—माफ करा हं!—अतःपर त्या मद्याला शिवूं देखील नका. कारण आपले हातपाय उद्यांकरितां शाबूद व सकस राहिले पाहिजेत."

---

## भाग २.

उजाडतांच माझ्या मित्राची कुवत पूर्ववत् झाली. व जिज्ञासेनें मजपेक्षां त्याला म्हणजे कमी आवेश आला होता असें नाहीं. किंबहुना अधिकच आला होता; कारण, त्यानें सांगितलेली हकीगत खरी आहे असा त्याचा समज होता, व मला तर त्याजविषयीं बराच संशय होता. त्यानें बुद्धिपुरःसर मिथ्या थाप मारली असेल असें नाहीं, पण मला वाटे कीं, एकांतांत व गैरसंवईच्या जागीं आपल्या कल्पनेवर अगर मनावर जें भ्रांतिपटल येत असतें, व ज्याच्या योगें आपण निराकृतीस आकृति देतों व निर्ध्वनीस ध्वनी मानतों, त्यांतला हा मासला झाला असावा.

आम्हावर उतरतानां नजर ठेवण्याकरितां सहा धिप्पाड खाणकरी आम्हीं निवडून घेतले. पिंजऱ्यांत कायती एकाचीच जागा होती, म्हणून इंजनेर प्रथमतः बसले; व ज्या कड्यावर ते पूर्वीं जाऊन ठेपले होते तेथें पोहोंचल्यावर मला नेण्याकरितां पिंजरा वर आला. मी लव-

करच त्यांच्या पाशीं जाऊन दाखल झालों. आमच्या बरोबर एक भक्कें मजबूत दोरखंड घेतलेलें होतें.

पूर्व दिवशीं जशी ती ज्योत्स्ना माझ्या मित्राच्या दृष्टीस पडली तशीच ती मलाही दिसूं लागली. ज्या पोकळीमधून ती दिसत होती ती तिरपी व उतरती होती. वाय्वावरणांतील प्रसृत प्रकाशा सारखी ती मला भासली; अग्नीच्या ज्योती सारखी प्रखर नसून, दृष्टीस सुखकर, व चांदीच्या रंगासारखी, जणूं ध्रुवाचा अगर शुक्राचा प्रकाश पडला असतां जशी कांति दिसते तशी, ती दिसली. पिंजरा सोडून आम्ही एकामागून एक खालीं उतरूं लागलों. दोन्ही बाजूंस पुढें आलेल्या चिपा होत्या त्यामुळें उतरणें सोपेंच होतें. उतरत उतरत येतां-येतां पूर्व दिवशीं माझा मित्र जेथे टेंकला होता तेथवर पोंचलों. छातीला छाती भिडून उभें राहण्यापुरतीच कायती लांबी रुंदी त्या कड्याची होती. तेथून बघतों तों, त्या पोकळीचें तोंड भलें मोठें गाळणें असून त्याचा खालचा भाग जसा रुंदट होत जातो, तसें तें दिसलें. त्यांतून तो चिचोळा प्रदेश, तो रस्ता, ते दिवे, जसे माझ्या सोबत्यानें वर्णिले होते, तसेचे तसेच मला अगदीं स्पष्ट दिसूं लागले. त्याच्या सांगण्यांत बिलकुल अतिशयोक्ति नव्हती. त्यानें जे ध्वनी ऐकिले होते ते मला ऐकूं येऊं लागले. पुष्कळ ध्वनी एकमेकांत मिसळून जी

एक अवर्णनीय कुजबुज ऐकूं येते, तसल्या प्रकारचा तो ध्वनी असून, त्यांत पावलांची चाहूल ऐकूं येत होती. नजर ओढती करून पाहतां, ब-याच अंतरावर एका उंच इमारतीची ओझरत झांक मला स्पष्ट दिसूं लागली. नुसता सृष्टिजन्य खडक तर तो खचितच नव्हता, कारण त्यांत रेखिवपणा फारच असून, त्यास भले मोठ मोठाले, इजिप्त देशांतील इमारतींत असतात तसे, खांब होते व आंतून दिवे लावले आहेत असें दिसत होतें. मज जवळ खिशांतली दुर्भिण होती, तिच्या मदतीनें पाहतां, सदरहू इमारतीनजीक दोन आकृती दिसल्या, त्या मनुष्यां सारख्या दिसत पण खात्री वाटेना. त्या सजीव खचित होत्या, कारण त्या हालत चालत होत्या, व दोन्हीही त्या इमारतींत जाऊन अदृश्य झाल्या. मग बरोबर आणलेल्या दोरीचें एक टोंक आम्ही ज्या कड्यावर उभे राहिलों होतों त्यास बांधूं लागलों. आम्हां बरोबर कप्या दोर, खिळे, कोयडे वगैरे सामान होतेंच, त्याचा चांगल उपयोग झाला.

या कृत्यांत गुंतलों असतां तोंडा वाटे एक ब्र देखील आम्ही काढला नाहीं म्हटलें तरी चालेल. एकमेकांशीं बोलण्याचें भय वाटत असल्या इसमांसारखे आम्ही श्रम चालविले होते. या प्रमाणें दोरीचें एक टोंक कड्याशीं पक्कें खिळविल्यासारखें झाल्यावर दुस-

त्या टोंकास खडकाचा एक तुकडा बांधून, तो, खालीं सुमारें पन्नास फुटांवर जमीन होती, तिच्यावर सोडला. माझ्या मित्राहून मी वयानें लहान व कृतींत अधिक चपळ होतों, व लहानपणीं तारवावर मी कामास राहिलेला असल्यानें, या दोरीवरून खालीं जाण्याच्या मार्गाची, त्याच्या पेक्षां मला अधिक संवय होती. म्हणून 'तुमच्या अगोदर मी खालीं जातों' असें हळूच त्यांच्या कानांत सांगितलें व म्हटलें कीं, जमिनीवर पोंचल्यावर दोरी मजबूत धरण्यास व तिच्यावरून येण्याचें तुम्हांस सुलभ होण्यास माझा उपयोग होईल. या रीतीनें मी तर जमिनीवर सुरक्षित पोहोंचल्यावर, इंजनेरही येऊं लागले. पण सुमारें दहा फूट खालीं आले न आले तों, ज्या कप्या मजबूत खिळविलेल्या आहेत असें आम्हांस वाटलें होतें, त्या निसटल्या, अगर तो खडकच ठिसूळ होता कीं काय नकळे. त्याजवर एवढा भार सहन न झाल्यानें, तोच खालीं ढांसळला असेल. माझा दुर्भाग्यी मित्र धाडकन माझ्या पांयाजवळ येऊन पडला, व त्याजबरोबर खडकाचा एक धलपा तुटून मला चाटून गेला. दैववशात् तो लहान होता, ह्मणून नुसत्या कानठळ्या बसण्या पलीकडे मला इजा झाली नाहीं. मी शुद्धीवर आल्यावर पाहतों तों, माझा मित्र निर्जीव गोळा होऊन पडलेला आहे. धुगधुगी बिलकुल त्यांत राहिली नव्हती. अशा

 मो. ७५७

दुःखानें व भीतीनें त्याच्या प्रेतावर मी वांकलों असता, माझ्या नजीकच एक ध्वनि मला ऐकूं आला. घोरण्याचा जसा आवाज व्हावा, अगर फुस्कारा टाकल्याचा जसा होतो, तसल्या प्रकारचा हा ध्वनि होता. मग ज्या दिशेकडून हा ध्वनि आला तिकडे स्वाभाविकपणें पाहूं लागलों, तों माझ्या असें दृष्टीस पडलें कीं, खडकाच्या एका काळ्या भेगींतून एक भलें धिप्पाड व भयप्रद शीर बाहेर निघालेलें आहे. त्याचा जबडा उघडलेला आहे, डोळे थिजलेले, भयाण, व भुकावलेले आहेत. हें शीर एखाद्या विक्राळ, सर्पटणाऱ्या मगराच्या अगर सुसरीच्या शिरासारखें दिसत होतें, इतकेंच कीं मी प्रवासांत जे या जातीचे प्राणी पाहिले होते त्यांपेक्षां हें अधिक मोठें होतें. मी धूम पळ मारित सुटलों, व त्या दरीच्या खोऱ्यांत मोठ्या वेगानें पळालों. दम घेण्याकरितां जेव्हां मी थांबलों, तेव्हां माझ्या भेंकडपणाची व पळून जाण्याची माझी मलाच लाज वाटूं लागली. मग जेथें माझ्या मित्राचें शव पडलें होतें तेथें परत येऊन पाहूं लागलों, तों तेथून तें नाहींसें झालें होतें. तेव्हां मला वाटलें कीं, त्या विक्राळ प्राण्यानें आपल्या गुहेंत नेऊन त्याचा चट्टामट्टा केला असेल. आमची दोरी व अडकविण्याचा कोंयडा तेथेंच पडलेला होता, पण त्यांच्या योगें परत जाण्याचें साधन कांहीं बनेना; कारण वरच्या खडकास त्यांस अड-

काविणें अशक्य होतें, आणि कड्याच्या बाजू इतक्या उभंट व गुळगुळीत होत्या कीं, मनुष्याच्यानें त्यांजवरून जातां आलें नसतें. अशा प्रकारें मी या अजब दुनियेंत, व पृथ्वीच्या पोटांत येऊन दाखल झालों.

---

## भाग ३.

मग हळु हळु व सावधगिरीनें त्या दिवे लावलेल्या रस्त्यानें एकाकी चालत चालत जी मोठी इमारत वर सांगितली आहे तिजकडे मी वळलों. तो रस्ता आल्प्स पर्वतावर ज्या प्रमाणें पाऊल वाटा आहेत त्यांजसारखा होता, व खडकाळ डोंगराच्या कड्या कड्यानीं जात असे. ह्या डोंगराची एक मालिकाची मालिका तेथें होती, व ज्या खडकाच्या भेगीमधून मी खालीं उतरलों तो डोंगर या मालिके पैकींच होता. डाव्या हाताकडे बऱ्याच खोलीवर एक खिंड होती, तिच्यांत माझ्या चकित झालेल्या डोळ्यांस कलेचीं व सुधारणुकीचीं चिन्हें दिसलीं. एक चमत्कारिक तऱ्हेचा व पृथ्वीवर कधींही माझ्या दृष्टीस न पडलेला झाडपाला ज्यांत उगवलेला आहे अशीं शेतेंही तेथें होतीं. त्यांचा रंग हिरवा नव्हता, शिशाच्या रंगा सारखा मजीतखोर व कोठें कोठें सुवर्णाच्या लाली सारखा होता.

तेथें तळीं होतीं व नाले होते पण ते मनुष्य कृतीनें वळवून त्यांजवर घाट बांधलेले होते. कांहींचें पाणी स्वच्छ होतें, व कांहींचें नगतेलासारखें चकचकत होतें. उजव्या हाताकडे खडकांत बनविलेल्या दऱ्या व खोऱ्या होत्या, त्यांच्या दरम्यान पाऊलवाटा होत्या त्या मनुष्यकृतीनें तयार झालेल्या होत्या हें उघड दिसलें. त्यांच्या बाजूंस वृक्ष उगवलेले होते ते प्रायशः उंच उंच देवगवताप्रमाणें दिसत. त्यांचीं पानें चित्रविचित्र पिसाऱ्याप्रमाणें होती व मधले सोट माडाच्या झाडासारखे होते. कांहीं झाडें उंसासारखीं होतीं पण त्यापेक्षां अधिक उंच होतीं, व त्यांस फुलांचे झुबकेचे झुबके लटकलेले होते. कांहीं झाडांची आकृति मोठी विस्तीर्ण छत्री असावी तशी होती. मधें एक जाडा दांडा असून वरून डोलाऱ्यासारखें त्याजवर आच्छादन होतें, त्याच्या खालीं आलेल्या अगर वर उगवलेल्या बारीक फोंकासारख्या फांद्या होत्या. हा सर्व देखावा, मागें, पुढें व आजुबाजूस, माझ्या दृष्टीची धांव जात होती तेथपर्यंत असंख्य दिव्यांनीं प्रकाशित झाला होता. ही निःसूर्य सृष्टि, मध्यान्हीं इटलींतील प्रदेशासारखी, लखलखीत व ऊबदार होती. पण येथील हवा कमी त्रासदायक होती व ऊष्णता अधिक सौम्य होती. या मज समोरच्या देखाव्यांत ह्मणजे मनुष्य वस्तीचीं चिन्हें नव्हती असें नाहीं. दूर दृष्टी फेंकली म्हणजे त-

ळ्याच्या अगर नाल्यांच्या कांठीं व मधोमध उंचवट्या-वर, चोहों बाजूंनीं झाडपाला उगवून मध्यें गडप झालेलीं घरें दिसत. तेथें निःसंशय मनुष्य वस्ती असेल असें वाटे. मधुन मधुन तर, बऱ्याच लांबीवर त्या प्रदेशावरून कांहीं आकृतींची हालचाल दिसे. त्या माझ्या नजरेस मनुष्याकृती असाव्या असें वाटे. पुरती दृष्टी देऊन पाह-ण्याकरितां मी थांबलों असतां, माझ्या उजव्या हाताकडे पाहतों तों, सर्रकन वायुमार्गें एक होडकें तरंगत वर चाललें आहे, व त्यास पंखाच्या आकृतिसारखीं शिडें असून त्यांतून गती मिळत आहे असें दिसलें. हें होडकें लवकरच माझ्या दृष्टी आड झालें व एका रानांतलि छायेंत उतरलें. माझ्या डोक्यावरतीं आकाश नव्हतें, आच्छादन काय तें भुयाराचें. लांब लांबच्या नयनगोचर भूप्रदेशापा-सून पाहतां तें पटल अधिक उंच उंच दिसे, तें इतकें कीं, तें दिसेनासें होई; आणि जसें फार धुकें आलें म्हणजे वा-तावरण बनतें तसेंच खालीं बनलेलें आहे असें भासे.

असा चालत असतां मी एकाएकीं चपापलों. पाहतों तों समुद्र कांठीं उगवणाऱ्या झुडपांचा एक गुच्छ होता, त्यांत देव गवतासारखीं झुडपें व मोठमोठाल्या पानाचीं लहान लहान झाडें ज्यांचीं पानें अळूसारखीं अगर निव-डुंगासारखीं होतीं, त्यांतून एक चमत्कारिक जनावर बाहेर पडून आलें; त्याचा आकार व बांधा हरणासारखा

होता. पण थोड्या अंतरावरून उड्या मारल्यावर तें जेव्हां मजकडे निरखून पाहूं लागलें तेव्हां मला वाटलें कीं, पृथ्वीच्या पृष्ठ भागीं ज्या हरिणांच्या जाती उपलब्ध आहेत त्यांच्या सारखें हें नसून, पृथ्वीप्रलयाच्या पूर्वी एक प्रकारच्या मजबुत हरिणाची जाती होती त्याचें मातीचें चित्र मी एका पदार्थसंग्रहालयांत पाहिलें होतें त्याची मला याजमुळें आठवण झाली. हें जनावर बरेंच माणसाळलेलें होतें, आणि मजकडे क्षणभर निरखून पाहिल्या नंतर त्या चमत्कारिक गवतांत निःशंक व मनमुराद चरूं लागलें.

---

## भाग ४

अखेरीस मी त्या इमारतीच्या थेट समोर आलों. ती हातांनीं बनविलेली होती व कांहीं भाग एक खडकांत कोरून तयार केलेला होता हें अगदीं स्पष्ट झालें. प्रथमदर्शनीं मला वाटलें कीं, ईजिप्तदेशांतील इमारती बांधण्याची जी बहुत प्राचीन पद्धती होती तसलीच हिची आहे. समोरच मोठमोठाले खांब होते. ते भक्कम दगडी पायावर सुरूसारखे उंचच उंच गेलेले दिसत. जवळ जवळ गेल्यावर नजरेस आलें कीं, ईजिप्तांतील पद्धतीपेक्षां त्याचे मुखडे अधिक नकशीचे व अधिक करामतीचे आणि फारच मनोहर होते. जसें कॉरिन्थयन मुखड्यांत पानाप्रमाणें नकशीची पत्ती हुबेहुब उठवितात तशी येथील खां-

बाऱ्या मथळ्यावर आसपासच्या झाडांच्या पानांसारखीं कोरींव पानें काढलेलीं होतीं. त्यांतील कांहीं अळूसारखीं होतीं व कांहीं देव गवतासारखीं होतीं. पुढें कांहीं वेळानंतर या इमारतीमधून कोणी एक आकृति बाहेर पडली–ती मनुष्यवत् होती. मनुष्यवत्. मी झटलें, पण खरेंच काय? त्या रुंद रस्त्यावर उभें राहून, आसपास पाहिल्या नंतर, त्या आकृतीनें मला पाहिलें व ती मजकडे येत चालली. मजपासून कांहीं हात लांबीवर आल्या नंतर तिला पाहिल्यानें व तिच्या समक्षतेमुळें मला असें कांहीं अनिर्वाच्य भय वाटलें व कापरें सुटलें कीं, माझे पाय जमिनीला खिळल्यासारखे झाले. राक्षसांचीं अगर दैत्यांचीं चित्रें भांड्यावर व खापरावर कोरलेलीं असतात अगर थडग्याच्या इमारतींत पौरस्त्य देशांत जीं चित्रें काढलेलीं असतात, त्यांचें मला तिजमुळें स्मरण झालें. या चित्रांत बाह्यरेखांत मनुष्याच्या अवयवाचें अनुकरण असतें खरें, पण ती मनुष्य जातीहून भिन्न जाती असते. ही आकृती उंच होती, पण उगीच लंबाडी नव्हती. दैत्यांची म्हणून जी उंची मानली आहे तिच्या खालोखाल मनुष्यांतील परमावधीची जी उंची लेखितात, तितपत ही आकृती उंच होती.

तिचें मुख्य आच्छादन म्हटलें म्हणजे दोन मोठे मोठे पंख होते. ते छातीवर एकावर एक झांकलेले असून गुड-

घ्यापर्यंत पोंचलेले दिसत. बाकीच्या पोषाखांत एक आं-गासरशी घातलेली बंडी व पायाच्या बचावा करतां बारीक, तंतु युक्त पदार्थाचे गुडघ्यापर्यंत पोंहचणारे जोडे होते. तिच्या मस्तकीं एक प्रकारचा मुकुट असून त्याजवर रत्नें लखलखत होतीं. उजव्या हातांत पाणी दिलेल्या पोलादाप्रमाणें चकचकणाऱ्या धातूची एक बारीक छडी होती. परंतु तिचें तें तोंड! मला भय वाटण्याचें व कांपरें सुरू होण्याचें कारण तें तेंच. चेहरा माणसाचा तर खरा, पण आपणांत ज्या जाती उपलब्ध आहेत त्यांहून अगदीं भिन्न तऱ्हेची याची ठेवण होती. *(Sphinx) परीची आकृती कोठें कोठें कोरलेली असते, तिच्या बाह्यरेखांचें व मुद्रेचें या आकृतीशीं बरेंच साम्य दिसलें—इतकें शांत, समंजसपणानें भरलेलें, व अनिर्वाच्य तिचें तें सौंदर्य होतें. तिचा वर्ण कांहीं तऱ्हेचाच होता, तो मनुष्य जातींतील तांबुस जाती म्हणतात तसला, पण त्याहून अगदीं निराळा होता. तिची कांती अधिक गहिरी पण सुकुमार होती. डोळे मोठे मोठे आणि काळेभोर असून खोल व पाणीदार होते व भोंवया अर्ध वर्तुळाकृती, व कमानदार होत्या. चेहेऱ्यावर लंव मुळींच नव्हती. पण जरी तिची मुद्रा सौम्य, व अवयव

---

* Sphinx= A fabulous monster, said to have proposed a riddle to the Thebans, murdering all who failed to guess it.

सुरेख होते, तरी तिच्या आंगीं असलें कांहीं अनिर्वाच्य पाणी असे कीं, तें पाहून जसा एखादा वाघ अगर सर्प पाहून भीती उत्पन्न व्हावी तसली भीती उत्पन्न होई. मला असें अंतर्ज्ञान झालें कीं, ह्या मनुष्याकृति पुतळ्यांत, मनुष्यास अपायकारक अशी कांहीं तरी शक्ति असावी. ती आकृति जवळ येतांच मी आंतल्या आंत थिजून गेलों. तिजपुढें मी आपले गुडघे टेंकले व हातांनीं आपलें तोंड झांकून घेतलें.

---

## भाग ५

कांहीं वेळा नंतर माझी कोणी विचारपुस करतें आहे असला ध्वनी मी ऐकला. किती तरी शांत व मंजूळ ती वाणी म्हणून सांगावी! त्या भाषेचा एक शब्द देखील मला उमजला नाहीं, पण त्या भाषणानें माझी भिती उडाली. तोंडावरचे हात दूर करून मी वर पाहूं लागलों.— त्या आकृतीनें (तिला मनुष्य असें माझ्यानें अजून ह्मणवेना) माझें असें रोंखून निरीक्षण आरंभिलें कीं, मला वाटलें माझ्या हृदयांतर्गत सर्वच ती पाहते कीं काय नकळे. नंतर डावा हात माझ्या कपाळावर ठेवून उजव्या हातांतील छडी माझ्या खांद्यास तिनें हळूच लावली. ह्या दोन ठिकाणीं झालेल्या स्पर्शाचा परिणाम केवळ जादूसारखा झाला. पूर्वीं जें कांपरें माझ्यांत भरलें होतें त्याच्या

ऐवजीं मजमध्यें समाधान व आनंद यांचे वेग उत्पन्न होऊन माझा मला धीर आला व मज समूर उभ्या असलेल्या प्राण्याविषयीं भरंसा वाटूं लागला. मी उठून उभा राहिलों. व मी आपल्या भाषेनें बोलूं लागलों. तें तो लक्ष्य देऊन ऐकत होता असें दिसलें परंतु त्याच्या मुद्रेवरून वाटे कीं, यास विस्मय झाला असावा. मग त्यानें आपलें डोकें हलविलें.—तें माझें म्हणणें समजलें नाहीं असें दर्शविण्याकरितां असावें. मग तो मला हातांनीं धरून, उठवून, कांहीं एक न बोलतां त्या इमारतींत घेऊन गेला. इमारतींत शिरण्याची वाट अगदीं खुली होती, काय सांगावें कीं, इमारतीस दरवाजाच नव्हता. प्रथमतःच एक टोलेजंग दिवाणखान्यांत शिरलों. तेथें बाहेर जसा होता तशाच प्रकारचा प्रकाश पडलेला होता, पण विशेष इतकेंच त्यांतून सुगंध परिमळ सुटत होता. मूल्यवान धातूंच्या गटाचे मोठे मोठे चौकोन करून त्यांची तक्त पोशी केलेली होती; व कांहीं भागावर हंर्‍यांसारखी बिछायत हांतरली होती. वरून व सभोंवार अगदीं कोमळ गान चाललें आहे असा ध्वनी निघत होता. तो अदृश्य ठिकाणीं असलेल्या वाद्यांतून येत असावा. डोंगराळ प्रदेशांतून वाहणाऱ्या पाण्याचा जसा झुळझुळ होणारा ध्वनी अगर वसंतांत विहाराकरितां केलेल्या कुंजांतील पक्ष्यांचा किलकिलाट जसा त्या प्रदेशीं सहज

वाटतो तसाच हा मंजूळ ध्वनी त्या इमारतीस सहज असा वाटे.

माझ्याबरोबर चालणाऱ्या आकृतीहून अधिक साधा पोषाख केलेली पण त्याच तऱ्हेची एक मूर्ती उंबरठ्यापाशीं गपचुप उभी होती. माझ्या सोबत्यानें तिला त्या छडीनें दोनदां स्पर्श केला, त्या सरशीं झर्कन् त्या तक्तपोशीवर ती आवाज होऊं न देता सरसर चालूं लागली. टक लावून पाहिल्यावर मला दिसून आलें कीं, ती जीवमान नसून कळसूत्री बाहुली होती. दिवाणखान्याच्या दुसऱ्या टोंकाशीं एक वाट होती तिला दारें नव्हतीं, पण अर्धमुर्धे पडदे तिजवर सोडलेले होते, त्यांतून ही बाहुली नाहींशी होऊन, दोन एक मिन्युटें झालीं असतील नसतील इतक्यांत, त्याच वाटेनें एक सुमारें बारा वर्षांचा मुलगा बाहेर आला. त्याच्या अवयवांचें व माझ्या सोबत्याच्या अवयवांचें इतकें साम्य होतें कीं, मला वाटलें मी या बापलेंकांशींच बोलत आहें. मला पाहून त्या मुलानें किंचाळी फोडली, व माझ्या सोबत्याच्या हातांत जशी छडी होती तशीच त्याच्या हातांत होती ती मजवर उगारली. पण त्या वडील माणसानें त्याच्या कानाशीं लागतांच ती त्याणें खालीं केली. नंतर त्यांचें कांहीं काळपर्यंत संभाषण चाललें होतें, त्यांत ते राहून राहून मजकडे न्याहळून पाहत त्या मुलानें माझ्या कपड्यांस चाचपून पाहिलें

व जिज्ञासेच्या भरांत माझ्या गालावरून हात फिरविले, व हंसण्यासारखा ध्वनी केला, परंतु आपल्या हंसण्यांत जितका आनंद आपण प्रदर्शित करतों, त्यापेक्षां त्या हंसण्यांतील कौतुक अधिक संकुचित होतें. इतक्यांत त्या दिवाणखान्याचें आढें दुभंग होऊन त्यांतून एक तक्ता खालीं आला. भोजन गृहांत ( हटेलांत ) व वखारींत एका मजल्यावरून दुसऱ्यावर जाण्याकरितां जशा "उचली" असतात त्याच प्रकारची या तक्त्याची बांधणी होती.

मग त्या अनोळखी गृहस्थानें त्याजवर आपण आरूढ होऊन, मुलास जवळ घेतलें व मलाही वर येण्याविषयीं खूण करतांच मीही वर बसलों. आम्ही जलद व सुरक्षितपणें वर पोंचलों, व दोन्ही बाजूस दारें असलेली एक गलेरी होती तींत उतरलों.

यापैकीं एका दारांतून मला एका दालनांत नेलें. तें दालन प्राच्य प्रदेशाकडील वैभवानें विभूषित केलेलें होतें. भिंतीवर स्फटिकाचे, धातूंचे व पाणी न दिलेल्या हिऱ्यांचे चौकोन बनवून बसविले होते. लोड व चाकाचीं कोंचें जिकडे तिकडे मांडलेलीं होतीं; दालनांतून तक्तपोशीवर जाण्याकरितां जागोजाग खिडक्यांसारख्या वाटा होत्या; पण त्याजवर तावदानें चढविलेलीं नव्हतीं; जातां जातां मला दिसून आलें कीं या वाटांनीं भल्या, मोठमोठ्या गच्चयांवर जातां येई, व तेथून तो बाहेरच्या प्रकाशित

प्रदेशाचा देखावा दिसत असे. नानाविध आकृतींचे व लखलखीत पिसाऱ्याचे पक्षी पिंजऱ्यांत घालून ते पिंजरेवरून लटकलेले होते. आम्ही शिरतांच या पक्ष्यांनीं सर्वांनीं मिळून गायनास आरंभ केला. त्याचा ध्वनी आपणांमधील उंच स्वरानें गाणाऱ्या कोकिलेच्या अवाजासारखा मंजूळ होता. सुवर्णाच्या नामी नामी कोरिंव हलकरत्यांतून सुगंध परिमळ सुटून दिशाभरून गेल्या होत्या. कळसूत्रीचीं बाहुलीं, मागें मी एक पाहिलें होतें तसलीं, भिंतींशीं टेंकून गपचिप अचेतन उभीं होतीं. मला कोंचावर आपल्या जवळ जागा घेऊन त्या अनोळख्यानें मजशी भापण करण्यास आरंभ केला. व मीही त्याजशीं उलट बोललों. पण त्याचें मला, व माझें त्याला, यत्किंचत् ही कळूं लागलें असेल म्हणाल तर शपथ.

पण त्या खडकाचा घलपा निघून खालीं हपटल्यामुळें झालेल्या आघाताच्या वेदना मला प्रथमपेक्षां आतां अधिकच होऊं लागल्या.

मला अशी कांहीं ग्लानी आली कीं त्या योगें मी बेशुद्ध होईन कीं काय असें झालें. कपाळांत व मानेंत सणासण शिणका सुरू झाल्या. तेथल्या तेथेंच मी आडवा झालों. विवळण्याचें टाळावें ह्मणून मनांत आणलें पण साधलें नाहीं. तो " आय आई ! " असा शब्द ऐकतांच त्या मुलानें ओणवें होऊन मला सांवरलें. इतका

वेळ पावेतों हा मजकडे बेभरंशानें अगर नावडतेपणानें पाहत होता. पण आतां माझा एक हात आपल्या हातांत घेऊन त्यानें आपले ओंठ माझ्या कपाळा नजीक आणून तो हळू हळू फुंकर घालूं लागला. कांहीं थोडीं पळें गेलीं नाहीं तों माझ्या वेदना राहिल्या. मला गुंगी येऊन, सुख व शांती वाटूं लागली, व झोंप लागली.

या अवस्थेंत मी किती वेळ होतों तें मला ठाऊक नाहीं, पण मी जागा झालों तेव्हां मला पूर्ववत् शक्ति वाटूं लागली. डोळे उघडून पाहतों तों माझ्या सभोंवार त्या मौनव्रतस्थ आकृतींनीं गराडा घातलेला आहे. त्यांचा गंभीरपणा व स्वस्थता प्राच्यदेशीयां सारखीं हातीं. व त्या आकृती थोड्या बहुत त्या परकीयासारख्या होत्या. म्हणजे त्यांच्यासारखेच यांनांही एकमेकांवर झां-कतां येणारे पंख होते; पोषाखही तसाच होता; तसेच, ते परीसारखे चेहेरे; काळेभोर व खोल डोळे, आणि तांबुस माणसांचा वर्ण. विशेष सांगण्यासारखें काय कीं ते सर्व एक जातीय दिसत; म्हणजे माणसाला अगदीं मिळती अशी तर ती जाति खरी, पण बांधा अधिक मजबुद आणि मुद्रा अधिक भव्य. ती पाहतांच अनिर्वाच्य भीति उत्पन्न होई. असें जरी होतें, तरी प्रत्येक व्यक्तीचा मोहरा कसा सौम्य आणि शांत दिसे, व मुद्रा मोठी ममताळु वाटे. आश्चर्य तें हेंच कीं त्यांच्या चेहऱ्यावरून जो दरारा उत्पन्न होई त्यां-

तलें इंगित पाहूं गेलें तर त्याची ती शांतता व ममत्व होय असें मला दिसून आलें. घडविलेल्या मूर्त्तींच्या मुखावर, अगर प्रेताच्या शांत भोंवयावर ख्रिस्ती आम्हांस जशी काळजी व दुःख, विकार व पापें यांची छाया अगर छाप दिसत नसते तशीच यांच्यावर तसली झांक मुळींच नव्हती.

माझ्या खांद्यावर कोणाचा उन्हून हात आहे असें मला भासलें. पाहतों तों तो त्या मुलाचा. एखाद्या वेदना होत असलेल्या पक्ष्याकडे अगर पाकोळीकडे आपण पाहत असतांना जशी आपल्या डोळ्यांत दिसते तसलीच मजविषयीं उच्च प्रतीची सदय दया व प्रेम त्याच्या नेत्रांत दिसलीं. मला त्याचा तो स्पर्श दुःसह वाटला. त्याच्या नजरेस नजर देववेना. माझी आपली अशी एक अस्पष्ट समजुत झाली कीं, त्याच्या मनांत येतें तर त्या मुलास मला ठार मारून टाकणें म्हणजे एखाद्या मनुष्यास एखादा पक्षी अगर पाकोळी चिरडणें जितकें सोपें तितकें सुलभ होतें. माझी विमुखता पाहून त्या मुलास दुःख झालेसें दिसलें. मला सोडून तो एका खिडकीजवळ जाऊन उभा राहिला. बाकीचे एकमेकांशीं हलक्या स्वरांनीं बोलत होते व मजकडे ते मधुनमधुन पाहत असत, यावरून मला दिसून आलें कीं त्यांच्या भाषणाचा विषय मी होतों. माझी व ज्याची पहिल्यानें गांठ पडली त्याजपाशीं त्यापैकीं विशेषेंकरून एकानें माझ्याविषयीं कांहीं विचार

चालविला होता व तो त्यास पसंत पडला असें त्याच्या चर्येवरून दिसलें. इतक्यांत त्या मुलानें खिडकीजवळून येऊन त्या इतरांच्या व माझ्या दरम्यान् ठाणे दिलें; जणु माझ्या बचावाकरितांच तो धांवला, आणि जलद् जलद् व कळकळीनें बोलूं लागला. एकूण, ज्या मुलाविषयीं मला इतका दरारा वाटला होता तो माझ्या वतीनें समजावणी करीत आहे, असें मला माझ्या उपजत बुद्धीनें अगर स्वभावजन्य ज्ञानानें वाटलें. त्याचें बोलणें संपतें न संपतें इतक्यांत आणखी एक परका आंत आला. बाकी इतरां पेक्षां हा वडील दिसला पण म्हातारा नव्हता; त्यांच्या सारखेच याचे अवयव जरी नीट नेटके होते तरी त्या सर्वांहून याच्या चेहऱ्यावर मोठी गंभीर शांतवृत्ती दिसत होती, तिजमुळें मनुष्य जातीची झांक त्यांजवर दिसे. ती मजशीं सदृश अशी होती. प्रथमतः माझ्या वाटाड्यानें, व मागाहून त्या थव्यापैकीं दुसऱ्या दोघांनीं, व अखेरीस त्या मुलानें जें जें म्हटलें तें त्यानीं मुकाट्यानें ऐकून घेतलें. नंतर मजकडे वळून त्यानें माझी विचारपूस केली; ती शब्दांनीं नव्हे, पण खुणा व हावभाव करून. मला वाटे त्या खुणा मला पूर्णपणें समजल्या, व माझी समज कांहीं चुकीची नव्हती. मी कोठून आलों हें त्यानें विचारलें हें मी समजलों. मी हात पुढें करून, त्या खडकांतील भुयारांतून ज्या रस्त्यानें आलों होतों, तो दाखविला. नंतर मल

एक कल्पना सुचली. माझ्या खिशांत एक टिपणवही होती, तिच्या कोऱ्या पानावर एक नकाशा काढला; त्यांत त्या खडकाचा कडा, ती दोरी, व मी तिजवर लटकलेला आहें असें काढलें. पुढें तो दऱ्याखोऱ्याचा डोंगराळ प्रदेश, त्या सरपटणाऱ्या जनावराचें तोंड, व माझ्या मित्राची निर्जीव आकृति, अशीं काढलीं. ह्या आद्यलेखन पद्धतीचा मासला मला प्रश्न करणाऱ्यास मी दिला, त्यानें तो गंभीर पणानें पाहून आपल्या शेजाऱ्यास दिला. याप्रमाणें तो थव्यांतील सर्वांस दिसला. प्रथमतः जो मला भेटला होता त्यानें कांहीं म्हटलें, तेव्हां त्या मुलानें जवळ येऊन नकाशाकडे पाहून, इत्यर्थ समजलों, असें दाखविण्याकरितां मान डोलविली, मग खिडकीजवळ परत जाऊन आपल्या शरीरावर असलेले पंख उभारून, एक दोनदां त्यांस झाडून, बाहेर वातावरणांत उड्डाण केलें. मी विस्मयपूर्वक दचकून खिडकीजवळ गेलों. पाहतों तों मुलगा हवेंत तरंगत आहे. त्याचें अवसान त्या पंखांवर होतें, पण जसा एखादा पक्षी ते मागें पुढें हलवितो, तसे तो हलवीत नव्हता. त्यानें ते पंख आपल्या डोक्यावर उभारले होते व ते याच्या यत्नावांचून त्याला पुढें वाहून नेत होते असें दिसे. त्याच्या उड्डाणाची चपलता गरुड पक्ष्याच्या चापल्या इतकी होती, व ज्या खडकांतून मी उतरलों होतों, व ज्याची दिशा त्या प्रकाशित वातावरणांत दृष्टीस पडत

होती, तिकडे त्याची गती होती असें मी पाहिलें. फारच थोड्या काळानें तो परत आला, व ज्या खिडकीवाटे त्यानें उड्डाण केलें होतें, तिच्यांतून आंत येऊन, भुयारांतून खालीं पडांतना जी दोरी व अडकविण्याचे हुक मी मागें ठेऊन आलों होतों, ते त्यानें तक्तपोशीवर टाकिले. तेथें हजर असलेल्या मंडळींत मग थोडेसें हळुहळू बोलणें झालें. त्या थव्यापैकीं एकानें एक कळसुत्री बाहुलीस स्पर्श करितांच ती पुढें सरसावली व खोलींतून झरदिशी नाहींशी झाली. मग ज्यानें मला खुणांनीं प्रश्न केले होते तो उठून, माझा हात धरून, मला ग्यालेरींत घेऊन चालला. तेथें ज्या तक्त्यावरून आम्ही वर आलों होतों, तो तक्ता तयार होता. त्याजवर आम्ही आरूढ होतांच खालच्या दिवाणखान्यांत उतरलों. मग माझ्या नव्या सोबत्यानें माझा हात तसाच धरून, मला इमारतीच्या बाहेर एक गल्ली (तिचें नाव मात्र गल्ली) होती, तिच्यांत नेलें. तिच्या दोन्ही बाजूंस इमारती होत्या, व दरम्यान् हिरवींगार झाडेंझुडपें, व तऱ्हेतऱ्हेचीं पुष्पें ज्यांत विकास पावलीं आहेत असे बगीचे, होते. लहान लहान भिंती घालून हे बगीचे एकमेकांपासून निरनिराळे केले होते. त्यांजमध्यें, व रस्त्यावरून हळुहळू चालणारे, अनेक जन होते. त्यांच्या आकृती पूर्वीं पाहिलेल्या सारख्याच होत्या. कांहीं वाटसरूंनीं मला पाहतांच माझ्या वाटाड्याजवळ येऊन मजविषयीं प्रश्न

करावे, हें त्याच्या आवाजावरून, चर्येवरून, व हावभावा वरून, मला उघड दिसून आलें. थोड्या वेळानें, आम्हां भोंवती एक समूह जमला, व मी जणु एखादें क्वचितच आढळणारें रानटी जनावर आहें, असें समजून मला मोठ्या जिज्ञासेनें न्याहाळूं लागला. परंतु आपली जिज्ञासा पुरवितांना त्यांचें गंभीर व सभ्यतेचें वर्तन कायम होतें. आणि माझ्या वाटाड्यानें, वाटेंत अडथळा करणें उचित नाहीं, असलें कांहीं थोडेंसें भाषण करितांच, ते दरबारी तऱ्हेचा मुजरा करून, शांतपणानें व बेफिकिरीनें अपला मार्ग क्रमूं लागले. या रस्त्याच्या मधोमध आम्ही एका इमारती समोर उभे राहिलों. ती इतर इमारतींहून निराळ्या प्रकारची होती, म्हणजे एका मह्या विस्तीर्ण चौकाच्या तीन बाजू असल्या सरख्या असून, त्यांच्या कोनांत उंचउंच ( पिरमिदासारखे ) मनोरे होते. मधल्या खुल्या जागेवर वर्तुळाकृती व मनस्वी उंच असा एक हौद होता; त्यातून डोळे दिपविणारा एक फवारा उडत होता. तो विस्तव असावा असें मला दिसलें. एका उघड्या दरवाज्यावाटें आम्ही आंत शिरलों, ते एका भव्य दिवाणखान्यांत आलों. तेथें, एखाद्या मोठ्या गिरणींत असतात तसे, लहान मुलांचे अनेक थवेच्या थवे कामकरीत होते असें वाटलें. एका भिंतींत एक अजस्त्र एंजिन चालू होतें, त्याला आपल्या वाफेच्या एंजिनास असतात तशींच चाकें व नळकांड्या

होत्या,—तफावत इतकाच कीं त्याजवर मुल्यवान हिरे, माणकें व धातू, शोभे करितां बसविलेले होते, व त्यांतून फिक्की, पण वातावरण प्रकाशित करणारी, अशी एक ज्योती वर येत होती. त्या मुलां पैकीं बहुतजण या यंत्राच्या कांहीं गुप्त कामावर गुंतलेले होते, व कांहीं मेजें पुढें ठेवून बसलेले होते. कोणत्या प्रकारच्या कामांत ते लागलेले आहेत हें पाहण्या पुरती अवधी मला मिळूं दिली नाहीं. इतकीं लहान मुलें, पण एकाचा देखील हुं कीं चूं शब्द आमच्या कानीं आला नाहीं, आणि त्यांतील एकानें देखील आमच्याकडे बघण्याकारितां डोळे वर केले नाहींत; जशीं जिवंत मनुष्यें भुतांच्या मेळ्यांतून, त्यांची नजर चुकवून जातांना असावीं, तशीं तीं स्तब्ध व बेफिकीर होतीं.

हा दिवाणखाना सोडल्यावर माझ्या वाटाड्यानें मला एका चित्रांच्या खोलींत नेलें. तेथें चित्रांचे गर्द रंग दिलेले असे तक्तेचे तक्ते काढलेले होते. त्यांत, लुईस क्रॉना या चिताऱ्याच्या चित्रांत असतात तसें, रानटी तऱ्हेचें, सोन्याच्या रंगांचें मिश्रण दिसलें. भिंतीवर जीं चित्रें काढलेलीं होतीं त्यांचा उद्देश, माझ्या दृष्टीस असा दिसला कीं, ज्या सृष्टींत मी येऊन दाखल झालों होतों, तिच्या इतिहासांतील कथांचें त्यांच्यायोगें दिग्दर्शन व्हावें. त्या सर्व तक्त्यांत, मी पाहिलेल्या प्राण्यांसारखी आकृती असलेलीं बहुतेक चित्रें होतीं. परंतु सर्वांचेच तसले पोषाख

होते, अगर सर्वांना पंख होते, असें नाहीं. त्यांत मला अनश्रुत अशा नाना तऱ्हेच्या जीवांचीं व पक्ष्यांचीं चित्रें होतीं, व त्यांच्या पार्श्वभागीं, देखाव्यांची व इमारतींची हुबेहुब नक्कल दाखविलेली होती. माझें चित्रकलेचें ज्ञान अपूर्ण आहे खरें, पण जें मला समजतें त्यावरून माझा असा अभिप्राय ठरला कीं, हीं चित्रें घटनेंत तंतोतंत, व मालमसाल्यांत ओतप्रोत असून, छायादर्शककलेची पूर्ण अभिज्ञता त्यांत दिसत होती. परंतु, आपणांमधील कलाभिज्ञांत जे रचनेचे नियम मान्य आहेत, त्यांप्रमाणें पाहतां, या चित्रांत बारिकसारीक भाग साधलेले नव्हते; उदाहरणार्थ, त्यांत मध्यबिंदु साधलेला नव्हता. त्यामुळें, त्यांजविषयीं ग्रह असा होई कीं तीं अस्पष्ट, विसंगत, गिचमिडलेलीं, व घोंटाळ्यांत पाडणारीं अशीं दिसत. चित्र कलेच्या स्वप्नांतील नानाविध तुकड्यांचा समुच्चय असल्यासारखीं तीं दिसत.

नंतर, आम्ही एका खोलींत गेलों; ती लांबी रुंदींत माफकच होती. तिच्यांत फराळा करितां मांडतात तसें एक मेज मांडलेलें होतें, व त्यासभोंवार माझ्या वाटाड्याचें कुटुंब (असें जें मला पुढें कळून आलें) तें जमा झालें होतें. त्यांत त्याची बायको, त्याची मुलगी व दोन मुलें, अशीं होतीं.

जरी त्या दोघी जणी पुरुषापेक्षां बांध्यानें उंच व

शरीरानें पुष्ट होत्या, तरी स्त्रीपुरुषांतील जातिभेद मला तात्काल समजून आला. त्यांचे चेहरे जरी बाह्यरेषेनें पाहतां अधिक सुरेख होते, तरी वरील भूलोकीं स्त्रीजातींत जी सलज्जता व मुद्रेंत नम्रता आढळते, व ज्याच्यायोगें स्त्रियांस मनोहरता प्राप्त होते, ती त्यांच्यांत नव्हती. वाटाड्याच्या पत्नीस पंख नव्हते, मुलीला होते, ते पुरुषांहून लांब लांब होते,

त्यानें कांहीं थोडेसें बोलतांच, बसलेली सर्व मंडळी उभी राहिली, व त्यांच्या चर्येवर व वागणुकींत जी सौम्यता असते असें मी वर सांगितलें आहे, व जी या बलाढ्य जातीचा खरोखरी सामान्यतःच गुण आहे, तिचें अवलंबन करून, त्यांनीं आपल्या तऱ्हेनें मला प्रणाम केला—तो असा कीं, उजवा हात हळूच डोक्यावर ठेवून, तोंडानें दंतस्थ एकमात्रक—स्—सि्—असा बारिक ध्वनी केला.—त्याचा अर्थ, आपलें स्वागत असो, असा आहे.

त्या गृहस्वामिणीनें मला आपणाजवळ बसवून घेतलें, व मेजावरील खाद्यांपैकीं एकांतून पदार्थ घेऊन, सोन्याच्या ताटांत घालून, मज पुढें ठेविले.

मी जेवीत असतां (खाद्य पदार्थ जरी मला नवखे होते, तरी त्यांतील रुचिवैचित्र्यापेक्षां त्यांच्या स्वादुमाधुर्याचें मला अधिक नवल वाटलें) माझे सोबती आपणा आपणांत हळु हळु बोलत होते. त्या भाषणांत मजवि-

षयीं प्रत्यक्ष निर्देश किंवा मला संकोच उत्पन्न करण्याइतकी माझ्या चेहऱ्या मोहऱ्याची टेहळणी, त्यांनीं शिष्टांच्या संप्रदायास अनुसरून वर्ज्य केली होती, असें मला दिसून आलें. तरी मनुष्य जातीच्या ज्या वर्गापैकीं मी आहें, त्यांतील त्यांनीं आजपर्यंत पाहिलेला कायतो मी प्रथमच प्राणी होतों—म्हणून ते मला फारच चमत्कारिक व विचित्र अद्भुत, असें समजत. परंतु या लोकांस कोणताच असभ्यपणा माहीत नाहीं, आणि कोणताही विकार उग्रपणानें प्रकटकरणें हें निंद्य आहे, अशी त्यांच्या अगदीं लहान मुलास देखील शिक्षा लावून दिलेली आहे. जेवण आटोपल्यावर, माझ्या धुरीणानें आपला हात माझ्यांत अडकवून मला सज्ज्यावर नेलें—तेथें, जिजवर चमत्कारिक आकृती खोदलेल्या होत्या, अशी एक धातूची तबकडी होती, तिला यानें स्पर्श केला. आपणा मधील विद्युद्यंत्र असतें तसल्याच प्रकारची ही होती असा माझा बरोबर तर्क झाला. त्या स्पर्शासरशीं वरून एक तक्ताखालीं आला, व आम्ही वर चढून जे गेलों ते पूर्वींच्या इमारतीपेक्षां अधिक उंचीवर जाऊन एका माफकशा खोलींत उतरलों;— तेथील साधारण मांडण वरच्या जगांतून आलेल्या पाहुण्यास नेहमी अवगत असलेल्या तऱ्हेची होती. भिंतीवरून खणाची कपाटें लावलेलीं होतीं, त्यांत पुस्तकासारखें कांहीं दिसत होतें, व तीं खरोखरीच पुस्तकें होती. द्वादशपत्री साच्याचीं आपलीं पुस्तकें असतात

तशीं तीं बहुतकरून फार लहान लहान होतीं; त्यांची बांधणी आपणाकडील जाडीं पुस्तकें बांधतात त्या प्रकारची होती, आणि त्यांजवर पातळ धातूचे पत्रे लावून तीं बांधविलीं होतीं. चमत्कारिक चमत्कारिक अनेक यंत्रांचे लहान सहान प्रकार सर्वत्र पडलेले होते, ते भासले तयार करतात तसे असून, यांत्रिक विद्याव्यासंग करणाराच्या अभ्यासाच्या खोलींत जसें आढळण्यांत येतात तसले होते. चार कळसूत्री बाहुलीं ( घरगुती साधारण कामें करण्यास ह्या-लोकांत या बाव्हल्यांसच वापरतात ) खोलीच्या चार कोपऱ्यांत भुतां सारखी उभीं ठेविलीं होतीं. एकीकडे एक ठेंगणा कोंच मांडलेला होता, त्यावर बिछाना व गिरद्या व लोड होते. एक खिडकी होती, तिजवर कांहीं तंतुयुक्त पदार्थाचे पडदे होते, ते एकीकडे सारून, बाहेर एक्या थोरल्या सज्ज्यावर जातां येत असे. माझे यजमान त्या सज्ज्यावर गेले. मागोमाग मींही गेलों. कोपऱ्यांतून मनोरे होते असें मागें सांगीतलें आहे, त्यांतील अगदीं शेवटच्या मजल्यावर आम्ही येऊन थडकलों. तेथून पलीकडील देखाव्याचें सौंदर्य इतकें गंभीर व वनशोभेनें पूर्ण होतें कीं, त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. दूरवर, पश्चाद्भागीं त्या कडे तुटलेल्या व विस्तीर्ण डोंगराच्या पंक्ती; मध्यभागीं त्या अनिर्वचनीय व चित्रविचित्र रंगाच्या तृण पल्लवांनीं ओथंबलेल्या दऱ्या; तें उदकाचें मधून मधून चमकणें;

त्यांतून कांहींचे गुलाबी रंगाचे पाट वाहल्यासारखें दिसणें; तशींच ती लक्षावधि दिव्यांमुळें सर्वांवर पडलेली गंभीर प्रभा; या सगळ्यांमुळें बनलेल्या देखाव्याचें यथातथ्य वर्णन माझ्या कोणत्याही शब्दांनीं केलें तरी वठणार नाहीं; असला कांहीं वैभवयुक्त पण तमातीत, आणि मनोहर पण उद्वेगकारक, तो देखावा होता.

परंतु लवकरच माझें लक्ष्य या भूगर्भ प्राग्देशाकडून इतर ठिकाणीं गेलें. अकस्मित एक मंगलकारक गायनाचा घोष, जणु खालच्या गह्वींतून, आमच्या कानीं आला. नंतर आकाशांत एका पक्षयुक्त आकृतीनें भरारी मारली; तिच्या मागोमाग दुसरीनें, मग तिसरीनें, जसें कांहीं पहिलीचा पाठलाग करण्याकरितां, आकाश मार्गीं उड्डाण केलें. याप्रमाणें शेंकडों जण उडाल्यानें मोठा गर्दीपेंच झाला, इतके असंख्यात प्राणी तेथें जमले. परंतु त्या अंदोलनांत जी त्यांच्या आकृतींत परी सारखी मनोहरता दिसून आली, तिचें वर्णन कसें तरी करावें ! कांहीं डाव अगर कर्मणूक त्यांणीं आरंभिली होती असें दिसलें. पळमात्रांत समोरासमोर उभे होत; एक निमिषांत दूरदूर पळत, इतक्यांत एकमेकांस लपेटी मारून, अधंत्रीं राहून, खालीं येऊन, एकमेकांस सव्यापसव्य टाकून, पुनः निराळे होत. आणि हें सर्व खालीं चाललेल्या गाण्याच्या तालांत; जणु एखाद्या कल्पित कादंबरींतील पऱ्यांचाच नाच चालला आहे. !

आश्चर्याच्या आवेशांत मी आपल्या यजमानाकडे नजर केली. त्याच्या वक्षस्थळीं जे मोठमोठे पक्ष एकमेकांवर पडलेले होते त्यांजवर मी हिय्या करून हात ठेविला, त्यासरशीं माझ्या शरीरांत, विद्युल्लतेची जशी चमक जाते, तशी गेली. भीतीनें मी मागें सरकलों. त्यानें किंचित् हास्य करून, व माझी जिज्ञासा तृप्त करण्याकरितां, सभ्यपणानें आपले पंख हळु हळु उघडले. पहातों तों वाऱ्यानें भरलेलें कातडें फुगतें तसें त्याच्या आंगावरील वस्त्र फुगत चाललें. त्याचे हात पंखांच्या आंत गुडुप झाल्यासारखे दिसले. एका क्षणांत त्या प्रकाशित वातावरणांत तो अधंत्रीं व निश्चल होऊन, पंख पसरून, जसा गृध्रपक्षी सूर्याच्या तापाकरितां उन्हांत थांबतो, तसा तो दिसला. नंतर, खालीं जमा झालेल्या थव्या पैकीं एकांत गृध्रपक्ष्याप्रमाणें सर्कन् शिरून त्या सगळ्यांस स्पर्श करून, पुनः तसाच वेगानें तो वर आला. तेव्हां त्या थव्यामधून, त्याच्या मागोमाग, पक्ष्यामागें पक्षी जसे खेळत खेळत जातात, तशा तीन आकृती बाकीच्यांतून निराळ्या होऊन, याच्या मागोमाग आल्या. त्यांपैकीं एक माझ्या यजमानाची कन्या अशी मी ओळखली. प्रकाशानें दिपल्यामुळें, व समूहामुळें घोटाळल्यानें, त्या पंखयुक्त खेळगड्याचें तें गिरगिर फिरणें व विवरणें यांत माझ्या दृष्टीस भेदाभेद कळण्याचें थांबलें. शेवटीं, माझे यजमान त्या

गर्दीतून बाहेर पडले, व माझ्या बाजूस येऊन उभे राहिले.

या प्रसंगीं जें जें माझ्या पाहण्यांत आलें, त्याच्या वैचित्र्याचा अंमल माझ्या ज्ञानेंद्रियावर तावडतोब होत चालला. माझ्या मनाची देखील चलबिचल झाली. स्वभावतः मी श्रद्धाळू नसें, व मनुष्याचा व भुतांचा अंगस्पर्श होणें शक्य आहे असें मी मानीत नसें, तरी, ज्या प्रमाणें (Gothic) रानटी मनूंत, पिशाच्यें व डांकिणी यांचा अड्डा ( सब्बान नांवाचा ) नाच एकाद्या प्रवाशानें पाहिला असें मानून, त्याला जें दारुण भय व जो चित्ताचा उद्वेग झाला असता, तसा मला होऊं लागला. त्या प्रसंगीं, मोठ्या आवेशानें हावभाव केल्याचें, व पिशाच्यबाधा न व्हावी म्हणून जे तोडगे करतात ते केल्याचें, व माझ्या त्या सभ्य व सदय यजमानानें मजकडे येऊं नये व परतावें असें सुचविण्यासाठीं मोठ्यामोठ्यानें असंबद्ध बोलल्याचें, मला कांहींसें ओझरतें स्मरण आहे. तसेंच त्यानें मी शांत व थंड व्हावें म्हणून जे सौम्य उपचार केले, व त्यामुळें मला जी भीति वाटली व माझी जी तारंबळ उडाली ती, माझ्या व त्यांच्या आकृतींत आणि गतींत जो भिन्नपणा होता ( व जो त्या पंखांमुळें माझी आश्चर्यजनित जिज्ञासा जागरुक करून त्यांचा उपयोग करतांना पाहिल्यामुळें मला अधिकच स्पष्टपणानें व्यक्त झाला होता. ) त्यामुळें झाली असावी, असा जो

त्यानें समंजस तर्क बांधला त्याचें, व त्यानें स्मित हास्य करून माझी भीति दूर करण्याकरितां पंख जमिनीवर टाकून, व ते कळसूत्रानें तयार केलेले होते असें दाखविण्याचा जो त्यानें यत्न केला त्याचें, मला किंचित् स्मरण आहे. या त्वरित झालेल्या रूपांतरानें तर माझी भीति अधिकच वाढली; आणि जसें मनस्वी भय अतिशयित धिटाईनें दिसून यावें, तसें मी वन्यपशूसारखा तद्दिशीं उडून त्याच्या मानगुटीस हात घातला. तत्क्षणीं विद्युल्लतेच्या प्रहारासारखा प्रहार करून त्यानें मला भुईवर पाडिलें. पूर्णपणें शुद्धीवर येण्याच्या पूर्वीं, माझ्या दृष्टीसमोर ज्या अखेरी अखेरीस अस्पष्ट आकृति दिसल्या, त्यांपैकीं माझा यजमान माझ्या कपाळावर एक हात ठेऊन, गुडघे टेंकून उभा राहिलेला होता, व त्याच्या कन्येचें तें सुंदर शांत वदन, आपले मोठे, खोल व दुर्बोध नेत्र माझ्या नेत्राकडे टक लावून पाहत आहेत, असें दिसलें.

---

## भाग ६.

या बेशुद्ध स्थितींत मी फार दिवस, किंबहुना आपल्या कालमापाप्रमाणें कांहीं आठवडेपर्यंत, होतों असें मला पुढें कळून आलें. जेव्हां शुद्धीवर आलों, तेव्हां मी एक्या निराळ्या खोलींत आहें, व मज सभोंवार माझ्या यजमानाचें कुटुंब जमा झालेलें आहे, असें मी पाहिलें. परम आश्च

र्ये हें कीं, त्याच्या कन्येनें, पारदेशीय आघात ज्यांत होता अशा, पण माझ्या भाषेनें मला पुसलें, " आतां कसें काय आहे? "

हें माझें आश्चर्य इतकें अनावर झालें कीं, कांहीं काळपर्यंत माझा शब्द उमटेना. शेवटीं मी जेमतेम विचारलें—" माझी भाषा तुम्हांस येते ! तर कशी बरें ? आपण कोण आहां बरें?"

माझ्या यजमानास हसूं आलें. त्यानें आपल्या एका पुत्रास खूण करतांच त्यानें एका मेजावरून कांहीं धातूचे पत्रे आणले. त्यांजवर निरनिराळ्या आकृतींचीं चित्रें कोरलेलीं होतीं, त्यांत एक घर होतें, झाड होतें, व एक पक्षी होता व एक मनुष्य होता. याप्रमाणें आणखीही आकृती होत्या.

या चित्रांत माझें वळण मला ओळखतां आलें. ऐकेका चित्राखालीं त्याचें नांव, माझ्या भाषेंत, माझ्या हातचें लिहिलेलें होतें. व त्याच्या खालीं दुसऱ्या कोणाच्या हातचा एकेक शब्द लिहिलेला होता. पण तो मला समजला नाहीं.

माझा यजमान म्हणाला " हें पाहिलें, या रितीनें आम्ही सुरवात केली, आणि ही पंडितांच्या विल्द्यायांतील माझी कन्या, झी, ही तुमची व आमचीही उपदेष्ट्री आहे."

झीनें मजपुढें दुसरे धातूचे पत्रे मांडले. त्यांजवर माझ्या हातचे प्रथम शब्द लिहिलेले असून, पुढें पुढें वाक्यें होतीं. प्रत्येक शब्दाखालीं व वाक्याखालीं दुसऱ्या

कोणाच्या हातचीं कांहीं तऱ्हेवाईक अक्षरें लिहिलेलीं होतीं. मग बुद्धि स्थीर करून, मी ताडिलें कीं, याप्रकारें त्यांनीं एक ग्राम्य शब्दकोश तयार केला होता. मी स्वभावस्थेंत असतांना हा बनविला असेल काय? झीस असें मी म्हटलें, तेव्हां अधिकारयुक्त स्वरानें तिनें मला म्हटलें "तें असो आतां; विश्रांती घ्या आणि जेवा."

---

## भाग ७.

या विस्तीर्ण भुवनापैकीं एक खोली माझ्या सुपुर्द केली होती. तिच्यांतील सामान सुंदर व विचित्र तऱ्हेनें मांडलेलें होतें. पण तींत धातूचें काम अथवा हिरे माणकें यांची मखलशी केलेली नव्हती. ती अधिक प्रसिद्ध ठिकाणच्या दालनांत होती. गवत व झाड्यांच्या देठांतील तंतू यांच्या बनविलेल्या चित्रविचित्र रंगाच्या हंऱ्या भिंतींवरून सोडलेल्या होत्या, व तक्तपोशीवर पसरलेल्या होत्या.

पलंगा सभोंवार पडदे नव्हते. त्याच्या लोखंडी खांबाखालीं स्फटिकाचे गोळे मांडलेले होते. पलंगपोस कापसासारख्या पातळ पदार्थाचे बनविलेले होते. पुस्तकें भरलेलीं कांहीं किरकोळ कपाटें होतीं. एका कोंपऱ्यांतुन पाक्षिशाळेंत जाण्याची वाट होती, तिजवर पडदा टाकलेला होता; ती पक्षिशाळा, गायन करणाऱ्या पक्ष्यांनीं भरलेली होती. परंतु पृथ्वीवर जे मी पक्षी पाहिले आहेत, त्यांसारखा ए-

कहीं पक्षी त्यांत मला दिसला नाहीं. पारव्याची एक सुंदर जाती तेथें होती खरी, पण तिच्यांत देखील आपल्या पारव्यापेक्षां एवढें अधिकच होतें कीं, त्यांच्या माथ्यावर उंच व निळ्यारंगाचे तुरे होते. या सर्व पक्ष्यांस तऱ्हे तऱ्हेच्या मधुर ताना घेण्यास शिकविलेलें होतें. त्यांचें कर्तृत्व आपल्या कडील कोकिळेपेक्षां फारच सरसें होतें, कां कीं, कोकिळेस तरी दोन पेक्षां अधिक ताना थोड्याच घेतां येतात. आणि त्या देखील साथी बरोबर असला तर घेतां येतच नाहींत अशी माझी समजूत आहे. या माझ्या पक्षिशाळेंतील गुंजारव ऐकून, एखाद्याला वाटलें असतें कीं, आपण संगीत नाटकच जणुं ऐकतों आहों. त्या पक्ष्यांपैकीं दोघांनीं, तिघांनीं, चौघांनीं अगर अधिक जणांनीं मिळून तानबाजी सुरू करावी, आणि भास तर असा व्हावा कीं, एकच गाणें सगळे मिळून गाताहेत. त्यांनीं गाणें बंद करावें असें माझ्या मनांत आलें तर, त्यांच्या पक्षिशाळेवरील पडदा पाडला म्हणजे झालें, अंधेर झाला कीं, सगळे गप्प होत. दुसरा एक झरोका होता, त्याची खिडकी बनविली होती. तिला तावदानें नव्हतीं, पण खिळीस स्पर्श करतांच वरून एक झांपण खालीं येई. तें कांचेपेक्षां कमी पारदर्शक अशा पदार्थानें केलेलें होतें, तरी तें इतपत पारदर्शक होतें कीं, बाहेरील देखावा मंदपणें त्यांतून दिसे. या खिडकीस जोडून एक सज्जा होता; किंवा लोंबता बगीचा

होता म्हणाना; त्यांत पुष्कळ रमणीय वाटिका व प्रफुल्लित पुष्पें उगवलेलीं होतीं. या प्रकारें या खोलींतील व आजुबाजूच्या भागांचा प्रकार, किरकोळ बाबदींत विचित्र खरा, पण ठोकताळ्यानें पाहतां, अर्वाचीन षोकाविषयीं जी समजुत आहे, तिला अनुरूप असा होता. तो इंग्लंडांतील डचेस अगर फ्रान्स देशांतील प्रतिष्ठित ग्रंथकाराच्या खोलीस जोडून जर पाहण्यांत येता, तर त्याजविषयीं वाहवा झाली असती. मी येण्यापूर्वीं ही खोली झीची होती. तिनें पाहुणवाण म्हणून मला दिली होती.

मागच्या भागांत वर्णिल्याप्रमाणें, मी जागा झाल्यावर, कांहीं काळानें आपल्या कोंचावर एकटाच एकाग्रचित्तानें विचार करीत पडलों होतों कीं, ज्या लोकांत मी येऊन प्रविष्ट झालों होतों, त्यांच्या स्वभावाविषयीं कांहीं अटकळ बसेल तर पाहवी. इतक्यांत, माझे यजमान व त्यांची कन्या अशीं दोघेंजणें आंत आलीं. त्यानें माझ्याच भाषेंत बोलून, मोठ्या सभ्यपणानें पुसलें कीं, ‘तुम्हांस संवाद करणें रुचेल किंवा एकाकी असण्यांत बरें वाटेल?’ मी उत्तर केलें कीं, “या पराय परदेशांत मी नवखा असतां, मला जें आदरआतिथ्य प्राप्त झालें आहे, त्या विषयीं माझी कृतज्ञा प्रदर्शित करण्याची, व गैरमाहितगारीमुळें मजकडून कोणास रोष येण्याचें टाळण्या पुरत्या येथील रीतिभाती शिकून घेण्याची, ही मला संधी मिळाल्यानें माझाबहुमान

झाला असें मी समजून, आपले उपकार लेखतों."

मी बोलत असतां, अर्थात् कोंचावरून उठून उभा झालों होतों. पण झीनें मला थोडक्यांत आज्ञा केली कीं, तसाच कोंचावर पड, तेव्हां मी गांगरून गेलों. आणि तीचे ते डोळे व तो स्वर सौम्य खरा, पण त्यांत असलें कांहीं एक सामर्थ्य होतें कीं, त्यांमुळें तिचें म्हणणें मला कबूल करणें भाग झालें. मग ती निष्काळजीनें माझ्या पलंगाच्या पायथ्याशीं बसली, व तिचे वडील कांहीं हाताच्या अंतरावर दुसरी एक बैठक होती तिजवर बसले.

माझ्या यजमानानें मग विचारलें " कां हो, जगाच्या अशा कोणत्या भागावरून तुम्ही इकडे आलां आहां कीं, तुम्हांस आम्ही, व आम्हांस तुम्ही, इतके विचित्र दिसत आहों? आमच्या जातीहून जितक्या भिन्न जाती आहेत, त्या बहुतेकांचे व्यक्तिपूर्वक मासले मी पाहिले आहेत; नाहीं म्हणायला जे आद्यस्थितीतले जंगली लोक, शिक्षणातीत सृष्टीच्या अतिशय ओसाड व मनस्वी दूरच्या दऱ्याखोऱ्यांतून राहतात, व जे भूगर्भ ज्वालांच्या प्रकाशाखेरीज इतर प्रकाश माहीत नसल्यानें, अंधःकारांत शेंकडों सर्पटणाऱ्या, तडातड उडणाऱ्या व भरारी मारणाऱ्या जीवांप्रमाणें चांचपडत असतात, ते मी पाहिले नाहींत. पण, खरोखर, त्या रानटी लोकांपैकीं तुम्ही असाल असें तर कांहीं दिसत नाहीं; आणि एखाद्या सुधारलेल्या

लोकांपैकीं असाल असें म्हणावें, तर तसेंही वाटत नाहीं."

हे अखेरचे शब्द मला कांहींसे चुणचुणले; मी उत्तर केलें कीं "पृथ्वीवर जीं उत्तम सुधारलेलीं राष्ट्रें आहेत, त्यांपैकींच एका राष्ट्रांतील असणें हें माझें सुभाग्य आहे, असें मी समजतों. प्रकाशाविषयींच जर म्हणणें असेल, तर सूर्य रश्मींचा रिघाव ज्यांत होत नाहीं, अशा या प्रदेशांत प्रकाश पाडण्याची जी युक्ति आपण केली आहे, तिजसंबंधानें आपल्या देशबांधवांच्या चतुरपणाबद्दल, व खर्चाविषयीं मागें पुढें न पाहण्याबद्दल, मी वाहवा करतों खरी, पण ज्यानें आकाशांतील गोल (चंद्रसूर्यादि नक्षत्रें) एकदां पाहिले आहेत, त्याला ह्या मनुष्यांच्या अनुपपत्ती भागविण्याकरितां शोधून काढलेल्या कृत्रिम प्रकाशाचा, त्यांच्या ज्योतीपुढें पाड काय वाटणार आहे? आपल्या म्हणण्यांत आलें कीं, आपल्या जातींहून भिन्न ज्या जाती आहेत, त्यांतील ते भिकार जंगली लोक खेरीज करून, बहुतेक सर्व मासले आपल्या पाहण्यांत आले आहेत, तर मग असें तर नसेल ना कीं, पृथ्वीच्या पृष्ठभागावर आपलें अजून जाणेंच झालें नसेल, व तिच्या पोटीं राहणाऱ्या समाजांविषयींच फक्त आपण निर्देश करीत असाल?"

कांहीं काळपर्यंत माझे यजमान बोलेनासे झाले. त्यांच्या चेहऱ्यावर विस्मयाची इतकी झांक दिसली कीं, कितीही विलक्षण प्रसंग असला, तरी त्या सृष्टींतील लोक

तितकी क्वचितचें प्रकट करितात. परंतु झी अधिक बुद्धिमान, ती म्हणाली "पाहिलें बाबा, आपण जें जुन्या दंतकथेंत ऐकलें आहे त्यांत सत्य आहे. सर्व काळीं सर्व लोकांत ज्या हरएक दंतकथेवर सामान्यतः विश्वास बसलेला असतो, त्यांत नेहमी सत्य असतें."

माझे यजमान सौम्यतेनें म्हणाले—"झी, तूं आहेस पंडितांच्या पाठशाळेंतील, तेव्हां मजपेक्षां अधिक शहाणी असलीच पाहिजेस, परंतु मी आहें प्रकाश संरक्षक सभेंतील; माझ्या इंद्रियांस प्रतीति आल्याखेरिज कोणतीच गोष्ट गृहीत घेऊं नये, हें माझें कर्तव्य आहे." मग मजकडे वळून, त्यानीं मला भूपृष्ठाविषयीं व आकाशांतील नक्षत्रांविषयीं अनेक प्रश्न केले. त्यांचीं उत्तरें माझ्या वकुबी प्रमाणें मी दिलीं, पण त्यांच्यायोगें त्यांचें समाधान झालें नाहीं, व त्यांची समजूतही पटली नाहीं. त्यानीं शांतपणानें आपलें डोकें हालविलें, आणि पटकन् विषयांतर करून विचारलें—"तुम्ही त्या दुसऱ्या जगतावरून (हे त्यांचेच शब्द होत) या जगीं आलांत कसे?" मी असें उत्तर दिलें कीं, "पृथ्वीच्या पृष्ठाखालीं, आमच्या गरजा पुरविण्याकरितां, व आमच्या कलांचें व उद्योगांचें वर्धन होण्याकरितां, अत्यावश्य जे खनिज पदार्थ व धातू आहेत त्यांच्या खाणी असतात." असल्या खाणींपैकीं एकीचा शोध करीत असतां मी व माझा हतभाग्य मित्र यांस ज्या

प्रदेशात आम्ही येऊन पोंहोंचलों होतों, त्याची झुळुक नजरेस पडल्यामुळें, अमुक अमक्या तऱ्हेनें आम्हीं खालीं उतरलों, व तसें करीत असतां, त्याचा प्राण अमक्या प्रकारें खर्चीं पडला, हें मी त्यांस थोडक्यांत कळविलें. व या हकीगतीच्या प्रत्ययाकरितां, ज्या घरीं माझें प्रथम स्वागत झालें होतें, तेथें मूळची जी दोरी व अडकणारे हुक त्या मुलानें आणून टाकले होते, तेच ग्वाही देतील असें कळविलें.

नंतर पृथ्वीच्या वरच्या भागावर जे लोक राहतात त्यांच्या रीती व आयुष्यक्रमाच्या पद्धती, यांजविषयीं प्रश्न करण्याचें माझ्या यजमानानीं सुरू केलें. त्यांत जे लोक सुधारणेंत फारच सरसावले म्हणून समजतात, त्यांजविषयीं विशेषें करून त्यांनीं विचारपुस केली. सुधारणा या शब्दाची व्याख्या त्यानीं अशी केली कीं, सद्गुणी व व्यवस्थित कुटुंबाचें जें शांतसुख, तें सगळ्या समाजांत प्रसृत करण्याची जी कला ती. ज्या जगांतून मी आलों होतों, तें फारच चांगलें आहे असें कळविण्याची माझी साहजीक इच्छा होती. तेव्हां जी प्रतापशाली अमेरिकेंतील लोकसत्ताक राज्यपद्धती युरोपांतील लोकांस वाटते कीं, आपणांस अनुकरणीय आहे; जी केव्हां प्राप्त होईल असा ते हेवा करीत असतात, आणि जी पुढेंमागें आपलें पर्यवसान आहे अशी त्यांस चळचळां भीति वाटते, तिच्या विद्यमान वैभवाविषयीं, व भावी सर्वोत्कटतेविषयीं, अधिक खुला-

शानें बोलतां यावें म्हणून, मी थोडक्यांत, पण गौरवानें, युरोपांतल्या जुनाट आणि ऱ्हास होत चाललेल्या व्यवस्थांबद्दल प्रथमतः भाषण केलें; नंतर संयुक्त संस्थानांतील ज्या शहरांत प्रचलन फारच त्वरित वेगानें सरसावतें, अशा न्यूयॉर्क शहरांतील समाजपद्धती लक्षणाकरितां उपलक्षून, तेथील नीतिविषयक प्रचारांचें तिखटमीठ लावून वर्णन केलें. पण त्यांचा जितका अनुकूल अभिप्राय व्हावा अशी माझी अटकळ होती, तितका झाला नाहीं, असें माझ्या श्रोत्यांच्या चर्येवरून ताडतां, मला खेद होऊन, मी आपल्या चर्चेचा विषय अधिक उच्च प्रकारचा व्हावा अशी योजना केली. लोकसत्ताक व्यवस्थेच्या उत्कृष्टतेविषयीं बोलून, नंतर त्याच्या योगें, *पक्षपूर्वक राज्य नियमन झाल्यानें, शांतसुखें कशीं वृद्धिंगत होतात, हें मी सांगितलें. तसेंच, अधिकार चालविण्याकरितां, व पदव्यांनीं विभूषित करण्याकरितां, मालमत्तेनें, विद्येनें व लायखीनें हीन असे जे नागरीक असतात, तेच निवडले गेल्यानें, असलें सुख, त्या व्यवस्थांमुळें सर्व समाजांत कसें प्रसृत होतें, ती रीति मी त्यांस कळविली. तसेंच, कोणी एका वक्तृत्वसुगर सभासदानें ( जो सभासद निवडला जावा म्हणून माझे दोघे भाऊ ज्या रेल्वे कंपनींत आहेत तिनें २०,००० डालर नुकतेच भरले होते ) 'अमेरिकेंतील लोकसत्ताक राज्यप-

* Government of party.

द्धतींत त्या शोधन करण्याचा गुण, व त्याचा सर्व जगावर निश्चयात्मक विस्तार' या विषयावर भाषण केलें होतें, त्याचा उपसंहार मला सुदैवानें आठवला. त्यांत, स्वतंत्रतेचा ध्वज सर्व खंडांवर फडकूं लागला म्हणजे, व वीसकोट सुबुद्ध नागरिक प्रजा, जिला लहानपणापासून अग्न्यस्त्रांचा उपयोग करण्याची संवय झालेली आहे, ती देशाभिमानी मॉनरो याचें मत, भयभीत झालेल्या सृष्टीसमोर गाजवूं लागली म्हणजे, मानवी प्राण्यांवर जो सुकाळ भविष्यकाळीं उगवेल म्हणून रसभरित भाकितें केलीं होतीं, तीं सांगून मी अटोपतें घेतलें.

माझें बोलणें संपल्यावर, माझ्या यजमानानें हळूच आपलें डोकें हलविलें, व विचार करण्यांत तो निमग्न झाला. आणि त्यानें मला व आपल्या कन्येला खूण केली कीं, त्याचा विचार चालला असतां आम्ही गपचुप बसावें. मग कांहीं काळानें, मोठ्या कळकळीच्या व गंभीरयुक्त वाणीनें त्यानें म्हटलें:—"तुमचें म्हणणें आहे कीं, तुम्ही परस्थ असूनही मजकडून व माझ्या आप्तांकडून तुमचें आदरआतिथ्य चांगलें झालें आहे. हीच जर तुमची समजूत खरी असेल, तर मी अर्जवून सांगतों एवढें करा कीं, ज्या जगांतून तुम्ही आलां आहां, त्याविषयीं, मी विचार करून तुम्हांस परवानगी देई तोंपावेतों, आमच्या लोकांपैकीं कोणास ब्र ह्मणून काढूं नका. ही विनंति मान्य करण्यास तुमची संमति आहे काय?"

" हें काय विचारावें? एक शब्द ही काढणार नाहीं, हें माझें वचन समजा " असें मी उत्तर केलें, व कांहींसा आश्चर्य पावलों. मग त्याचा हात आपल्या हातांत घेण्याकारितां म्हणून मी माझा उजवा हात पुढें केला. पण त्यानें तो आपल्या कपाळावर नेऊन त्याचा उजवा हात माझ्या वक्षस्थळीं लावला. वचन अथवा तोंडीं झालेला करार पाळण्याच्या बाबदींत हीच या सर्व लोकांत रीति आहे. मग आपल्या कन्येकडे वळून तो म्हणाला, "झी, या परक्या गृहस्थानें मजजवळ व तुजजवळ जें जें भाषण, आपल्या या जगाहून भिन्न जगाविषयीं केलें आहे, अगर इतःपर ते करतील, तें तूं कोणासही सांगू नयेस, समजलीस ?" झीनें उठून आपल्या तीर्थरूपांच्या कपाळाचें चुंबन केलें; व हास्य वदन करून ती म्हणाली "( गाय ) बायकोची जीभ वळवळ करणारी खरी, पण प्रेमपाशानें तिचें तात्काळ दृढ बंधन होतें. आणि, बाबा, कदाचित् तुमच्या अगर माझ्या तोंडून एखादा शब्द चुकून निघाल्यानें, आपली मंडळी दुसऱ्या जगाच्या शोधास लागण्याच्या इच्छेनें आपणावर संकट ओढवतील, असें तुह्मास भय वाटत असलें, तर योग्यपणें भारलेला व्हिललचा एक तरंग सोडतांच, त्यायोगें या परक्या गृहस्थानें जें म्हटलें आहे त्याची स्मृति आपल्या मेंदूच्या पटावरून देखील समूळ धुऊन नाहीं कां जाणार ?"

" व्हिल तें हो काय? " असें मी विचारलें, तेव्हां झीनें स्पष्टीकरण करण्यास आरंभ केला; पण त्यांतील मला समजलें थोडेंकेंच. कारण, मला ज्या भाषा अवगत आहेत, त्यांत व्हिल याचा नक्की पर्यायार्थ प्रदर्शक शब्द नाहीं. मी त्या शक्तीला विद्युत् म्हटलें असतें. पण तिच्या अनेकविध शाखांत ज्या प्रकृतीच्या इतर शक्तींचा ही समावेश होतो, त्यांला आपल्या शास्त्रीय परिभाषेंत आकर्षकशक्ति, विद्युदाकर्षणशक्ति, वगैरे निरनिराळीं नावें दिलेलीं आहेत. या लोकांत असें समजतात कीं " व्हिल " शक्तींत प्रकृतीच्या प्रचोदक शक्तींचा समुच्चय साधला गेला आहे. असल्या समुच्चयाविषयीं पृथ्वीवरील तत्ववेत्त्यांनीं तर्क बांधलेला आहे. त्यास फराडे नामक तत्ववेत्त्यानें सावधान पूर्वक " परस्पर संबंध " असें नांव दिलें आहे, व त्या विषयीं त्या विख्यात प्रयोगकारानें असें लिहिलें आहेः—

"इतर अनेक प्रकृतिविषयक ज्ञाननिरतां प्रमाणेंच माझेंही बहुत दिवस असें मत, किंबहुना असा निश्चय, झालेला आहे कीं, जडाच्या शक्ती अनेक प्रकारानें प्रकट होतात, त्या सर्वांत सर्व साधारण असें एक बीज आहे; म्हणजे काय कीं, त्या इतक्या प्रत्यक्ष संबद्ध आणि परस्पराधीन आहेत कीं, त्यांचा जणु एकमेकांत विपर्यय होऊं शकतो, आणि त्यांजपासून घडणाऱ्या क्रियेंत त्यांची सत्ता समतुल्य असते."

हे अंतर्भौमी तत्ववेत्ते असें म्हणतात कीं, या व्हिल ( चिद्विभूती ) च्या एका तरंगानें ( याला फराडे कदाचित् अंतरिक्षीयआकर्षकशक्ति म्हणतील ) हवेंतील उष्ण परिमाणांत विकृती करतां येईल; म्हणजे हवा बदलतां येईल. तसेंच, तिच्या इतर क्रिया ( ज्या *मेस्मेरिझ्म, †इलेक्ट्रोबायऑलोजी, ‡ओडिक फोर्स यांशी संलग्न आहेत ) पण ज्या या चिद्विभूतीच्या प्रवाहकद्वारें शास्त्रीयरीत्या घडवून आणल्या असतां त्यांस मनावर, व प्राणिवर्गाच्या आणि उद्भिज्ज वर्गाच्या शरीरावर इतकें जबर वशीकरणसामर्थ्य प्राप्त होतें कीं, आपणांतील गूढचरितांच्या आख्यायिकांत ज्यांची अतिरिक्तता झाली नाहीं, असल्या सर्व कारकांस ते व्हिल हेंच सामान्य नांव देतात. झीनें मला प्रश्न केला कीं, समाधींत अगर स्वप्नदर्शनांत मनाच्या सर्व शक्ती इतक्या उद्दीपन

---

*मेस्मेरिझम= मेस्मर या नांवच्या एक्या फ्रेंच तत्ववेत्त्यानें असा एक प्रयोग शोधून काढला आहे कीं त्यामुळें एक प्राणी दुसऱ्याच्या ज्ञानतंतूंचें इतकें वशीकरण करूं शकतो कीं त्या दुसऱ्यानें कोणतें कृत्य करावें अगर करूनये आणि आपल्या मनाशीं प्रत्यक्ष संबंध राखावा, असें सामर्थ्य त्यास प्राप्त होतें.

† इलेक्ट्रोबायऑलोजी=जीवशक्तीच्यायोगें नुसत्या इच्छेनें अगर मनानें दुसऱ्याच्या कृतीचें अगर मानसिक अवस्थेचें जें वशीकरण तो.

‡ओडिक फोर्स=जर्मनींत रिकेनबाक यानें व इतर तत्त्ववेत्त्यांनीं असा तर्क केला आहे कीं ही एक प्राकृतिकशक्ति मनुष्यमात्रांत असते, व ती आकर्षक मण्यांनीं, ऊष्णतेनें, व प्रकाशानें वाढवितां येते.

पावतात कीं, जागृतावस्थेंत त्यांची ही पराकाष्ठा अगदीं अनश्रुत असते, हें तुमच्या जगांत माहीत नाहीं काय? तसेंच, त्या दशेंत एका मेंदूवरील विचार दुसऱ्यावर पाठवितां येतात आणि ज्ञानाची अदलाबदल त्वरेनें करतां येते, हें तुम्हांस नाहींका ठाऊक? मी उत्तर केलें कीं, आमच्यांत असल्या समाधीच्या व स्वप्नदर्शनाच्या कथा सांगत असतात; त्यांविषयीं मीं पुष्कळ ऐकलें आहे, व कृत्रिम प्रकारें घडवून आणलेलीं ( समाधी व स्वप्नदर्शनें ) थोडींशीं, पाहिलेलीं आहेत. उदाहरणार्थ मेस्मरिक स्पष्टदर्शन. परंतु, हे प्रकार फार विलुप्त आहेत व त्यांची अवहेलना होत असते. याचें अंशतः असें कारण आहे कीं, त्यांचा उपयोग गर्ह्य कपटें साधण्याकरितां करितात, व अंशतः असेंही आहे कीं, ज्या कांहीं असाधारण शरीरावस्थांवर त्यांचे परिणाम खरोखरी घडून येतात, ते परिणाम, निःपक्षपातानें शोधिले अगर त्यांचें पृथक्करण केलें तर फारच असमाधानकारक असतात. एखाद्या पद्धतशीर सत्य शोधनांत अगर व्यवहारिक अर्थांत, त्यांजवर विश्वास ठेववत नाहीं. आणि त्यांच्या योगें जें वेडगळ धर्मभोळेपण उत्पन्न होतें तें श्रद्धाळू माणसांस फार अपायकारक होतें. माझीं उत्तरें झीनें मोठ्या सदय अवधानानें ऐकून घेतलीं. ती म्हणाली " आम्हांस हें ज्ञान प्राप्त होण्याच्या आरंभीं व सिद्धिभूतीच्या गुणांविषयीं गैरसमज

होता तो पावेतों अशीं अन्यथोपयोगाचीं व श्रद्धालुत्वाचीं उदाहरणें आमच्या शास्त्रीय प्रतीतींत ही आढळत असत. पण याविषयीं आणखी विवाद करणें तो तुम्ही वाद करण्यास अधिक योग्य झाल्यावर करूं." या प्रसंगीं ती इतकेंच आणखी म्हणाली—" या चिद्विभूतीच्या द्वारेंच, तुम्ही त्या समाधींत असतां, आमच्या भाषेतील उपक्रम तुम्हांस कळून आला. आमच्या कुटुंबापैकीं मी व हे माझे तीर्थरूप यांनीं मात्र तो प्रयोग लक्ष्य लावून केला, यामुळें तुमच्या भाषेचें ज्ञान प्रमाणतः आम्हांस अधिक झालेलें आहे, तितकें तुम्हांस आमचीचें नाहीं. याचें कारण अंशतः हें कीं, तुमच्या भाषेंत आमची पेक्षां कमी मिश्र कल्पना आहेत, आणि अंशतः तुमच्या पेक्षां आमचीची घटना परंपरागत प्रबुद्धपणानें ज्ञानसंपादनांत अधिक वश्य, व अनायासें सामर्थ्यवान् आहे." याविषयीं माझ्या मनांत मला शंका वाटली; आणि व्यवहारिक प्रवृत्तींत, घरीं आणि दारीं, कुशाग्रबुद्धी करण्याचे प्रसंग मला आलेले होते, म्हणून ह्या दिव्याच्या ज्योतीनें जन्म घालविणाऱ्या लोकांहून माझ्या मस्तिष्क संबंधी घटनेंत अधिक मंदता असेल हें मला संमत होईना. परंतु, हे विचार मनांत चालले असतां, झीनें आपली तर्जनी माझ्या कपाळासमोर धरून मला झोंपी जाण्यास लाविलें.

## भाग ८.

पुनः जेव्हां मी जागा झालों, तेव्हां ज्या मुलानें दोर व अडकविण्याचे हुक प्रथम ज्या घरीं माझें स्वागत झालें तेथें आणले होते, तो माझ्या बिछान्याच्या बाजूस बसलेला मी पाहिला. सदर्हू घर या जातीच्या मुख्य न्यायाध्यक्षाचें होतें, असें मला मागाहून कळून आलें. तो मुलगा-त्याचें नांव ताइ ( उच्चार करतांना तार–ई असें म्हणतात) या न्यायाध्यक्षाचा ज्येष्ठ पुत्र होता. गेल्या निद्रेंत, अगर समाधींत, या देशच्या भाषेंत माझा अधिकच ज्ञानागम झाला असून, मला (मागच्याशीं) तुलना केली असतां यथेच्छ व जलद बोलतां येऊं लागलें होतें, असें दिसून आलें.

या सुंदर जातींत देखील हा मुलगा अद्वितीय लावण्यवान् होता. त्याच्या वयाच्या मानानें त्याचा चेहरा फारच पराक्रमसंपन्न दिसे. त्याची चर्या त्या स्तिमित व विकारशून्य पुरुषांच्या मुखांवर दिसते त्याहून फारच उत्साहपूरित व प्रफुल्लित होती. ज्या कपट्यावर खालीं उतरण्याच्या प्रकाराचें, व माझ्या मित्राच्या प्रेताजवळून त्या भयप्रद सर्पटणाऱ्या जनावरानें मला भयानें पळवून लावलें त्याच्या शिराचें मी चित्र काढलें होतें, तो कपटा त्यानें आणला होता. चित्राच्या या भागाकडे बोट दाखवून ताईनें मला त्या विक्राळ प्राण्याच्या आकारा विषयीं, आकृती विषयीं, आणि कोणत्या गुहेंतून अगर भुयारांतू-

न तो बाहेर आला या बदल प्रश्न केले. माझ्या उत्तरांत त्यास इतकी गोडी लागली कीं त्यांयोगें तो गंभीर होऊन मजविषयीं व माझ्या पूर्वकथेविषयीं त्याची जिज्ञासा क्षणभर संचार पावली. तुम्ही कोठून आलां, असें तो नुकर्तेंच मला विचारूं लागला होता, व माझ्या यजमानास जें मी वचन दिलें होतें त्या अन्वयें या प्रश्नानें मला व्याकुलता प्राप्तहोत होती,इतक्यांत सुदैवें करून झी आंत आली.

त्याचा प्रश्न तिच्या कानीं पडला होता.त्याचें उत्तर तिनें असें दिलें "ताई, या पाहुण्यास जी लागेल ती माहिती आपण द्या, पण त्यांजवळून परत मात्र विचारूं नकाहो ! तुम्ही कोण आहां, कोठून आलां, व कोणत्या कामाकरितां आलां, हे प्रश्न या आमच्या घरीं विचारणें बाबांच्या आज्ञे विरूद्ध आहे, समजलांत." 'बरें तर' असें म्हणून ताईनें आपला हात वक्षस्थळीं नेला. या मुलाची माझी मोठी गट्टी पडली, पण त्या क्षणापासून तों त्याच्या अखेर भेटी पर्यंत या निषिद्ध प्रश्नांपैकीं एकही प्रश्न पुनः मला म्हणून त्यानें केलाच नाहीं.

---

## भाग ९.

ही अंतर्भौमी लोकवस्ती अना नामें एका मोठ्या जातीचा एक भाग असून, त्यांच्या मूलोत्पत्ती विषयीं व

इतिहासाविषयीं खालीं नमूद केलेला विस्तार मला समजून येण्यास बराच काळ लागला. तसेंच, समाधीच्या (याला समाधीच म्हणावयाची असेलतर) अनेक आवृत्ती करून माझ्या आतिथेयांच्या कल्पना मला अधीक पूर्णपणें कळूं लागण्या इतकें माझें मन सिद्धहोई पर्यंत, त्यांच्या रितीभाती माझ्या अनुभवास इतक्या भिन्न वाटत कीं, त्यांतील भिन्नता माझ्या बुद्धीस उमगत नसे; आणि त्यांतील भिन्नता मला कळूं लागण्यांतही बराच काळ निघून गेला.

फार प्राचिन दंतकथां प्रमाणें पाहतां, या जातीचे जुनाट पूर्वज, ज्या पृष्टभागावर त्यांची संतती वास करीत होती त्याहून उच्च लोकांत राहत असत; या लोकांविषयीं कथा त्यांच्या पुराणांतून लिहून ठेवलेल्या आहेत, व त्या पुराणांतून अशा आख्यायिका आहेत कीं, विवरांतील अर्धगोलाकृति शिखरांत मानवेतर हातांनीं दिवे लागत असत. परंतु बहुतेक व्याख्याकार या आख्यायिका लाक्षणिक कथा आहेत असें मानतात. ज्या पूर्व काळास अनुलक्षून या दंतकथा आहेत, त्या अन्वयें पृथ्वी देखील कांहीं आद्यस्थितींत आहे असें मानीत नसत, पण विकासाच्या एका संस्कारांतून दुसऱ्यांत जातांना होणाऱ्या अवस्थांतराच्याप्रसवक्लेशांत ती मग्न असून, प्रकृतीच्या प्रचंड परिवर्तनाधीन ती आहे असें समजत. असल्या एका परिवर्तनांत, उच्चलोकांतील ज्या भागावर या जातीचे पूर्वज राहत, तेथें

पूर येऊन, उत्तरोत्तर वाढणाऱ्या पण निरर्गल अशा त्या पुरांत अल्पावशेष वर्ज्य करून सर्व गडप होऊन नष्ट झाले. आतां आपणांतील इतिहासप्रसिद्ध व *पवित्र जलप्रलयाविषयींच हा वृत्तांत असावा, किंवा भूतत्वज्ञ ज्याविषयीं विवाद करतात तसा तत्प्राक् झालेला हा प्रलय असावा, हा तर्क करीत मी बसत नाहीं. पण या लोकांतील कालनिर्णयविषेशीं न्यूटनची गणना ताडून पाहिली तर, नोहाच्या हजारों वर्षांपूर्वीं हा प्रलय झाला असावा. अन्यत: पाहतां, या इतिहासकारांचा वृत्तांत व भूतत्वज्ञांतील अग्रणींचीं जी मतें उपलब्ध आहेत त्यांत मेळ मिळत नाहीं. कारण, भौमिकी घटनेंत सस्तन्य प्राण्याच्या प्रवेशास जो काल योग्य असा मानला आहे, त्याच्या बहुत पूर्वे कालीं मानवी प्राण्याचा संभव भूलोकीं होता, असें या वृत्तांतावरून होतें. पुरानें गहजब केलेल्या या दुर्दैवी लोकां पैकीं एक टोळी पाण्याच्या प्रवाहा बरोबर गुहांत शिरून, तेथील उंच उंच टेकडांवर आश्रय धरून राहिली होती, ती पुढें भुयारांतून फिरत फिरत जाऊन पृथ्वीस निरंतर मुकली; फार काय सांगावें, या महदापत्तीमुळें पृथ्वीची दशा सगळीच बदलली. भूमीचा समुद्र बनला, व समुद्राची भूमी झाली. अजून देखील या अंतर्गत भूमीच्या पोटीं मनुष्य वस्तीचा अवशेष उपलब्ध होतो अशी

---

* Sacred Deluge.

साक्षात् प्रतीती असल्याचें मला कळलें. ही वस्ती झोपड्या झुपडयांतून व गुहेंतून राहणारी नसून, मोठ्या विस्तीर्ण शहरांतून राहत असे. या विषयीं त्या शहरांच्या विध्वंस झालेल्या अवशिष्टांवरून, नोहाच्या मनू पूर्वी कांहीं जाती भरभराटींत होत्या अशी साक्ष पटत आहे. पण तत्वनिरूपणांत गारेचा वापर करणारे व लोखंडाची ज्यांस माहिती नव्हती असे प्राणिवर्ग सांगीतले आहेत, त्यांत मोडल्या जाणाऱ्या या जाती अर्थातच नव्हत्या.

या कृतपलायनांनीं पृथ्वीवर असतांना ज्या उन्नतीच्या व सुधारणुकीच्या कला ते आचरीत, त्यांचें ज्ञान समागमें आणिलें होतें. त्यांची पहिली न्यूनता म्हणजे पृथ्वी वरील ज्या प्रकाशास ते मुकले होते तो पुरविणें ही असली पाहिजे. आणि कोणत्याच काळीं, दंतकथेच्या मनूंत देखील, या जातींत (ज्यांजमध्यें माझा निवास होता ते यापैकीं एक वर्ग होता) धुरापासून, लोहकांताच्या भस्मानें, व शिलातेलांतून प्रकाश उत्पन्न करण्याची कला माहीत नव्हती असें नाहीं. त्यांच्या आद्यस्थितींत, प्रकृतीच्या असंस्कृत सैन्यासमवेत युद्ध करण्याची त्यांस संवय होती. आणि वास्तवीकच आहे कीं, शेंकडों वर्षें ज्याचा विस्तार होत होता अशा समुद्राशीं जी त्यांनीं बहुत काळ पर्यंत टक्कर दिली, त्या योगें, धरणें घालून व पाट बांधून पाणी कसें नियंतृत करावें, यांत त्यांचें कौशल्य कु-

शाश्र झालें होतें. या नव्या वसतींत त्यांचें जें संगोपन झालें तें तरी या कौशल्या मुळेंच. कांहीं एक प्रकारच्या तिरस्कारानें व भीतीनें माझ्या यजमानानें म्हटलें: " बहुत पिढ्यापर्यंत आमच्या त्या आद्य वंशजांनीं, जनावरांच्या ज्या अनेकविध जाती आम्हां प्रमाणेंच जलप्रलयांतून बचून पृथ्वीच्या पोकळींत आश्रय धरून राहिल्या होत्या, त्यांचें मांस सेवून, आपल्या कुलोत्कर्षास नीचता आणिली, व आपल्या आयुष्याची हानी करून घेतली. जीं जनावरें उच्चलोकांत माहीत नाहींत अशी कल्पना आहे, ती या पोकळींतून उत्पन्न झाली."

दंतकथेच्या संधिप्रकाशा आलीकडे जेव्हां, आपण ज्याला ऐतिहासिक काल असें म्हणतों, त्याचा आरंभ झाला, तेव्हां या आनाजातींत निरनिराळे समाज बनून गेले होते, व पृथ्वी वरील अधिक उत्कर्ष पावलेलीं राष्ट्रें ज्याप्रकारच्या सुधारणुकींचा उपभोग हल्लीं घेत आहेत, त्याच्या अगदीं तुल्यरूप सुधारणुकीची कोटी त्यांस प्राप्त झाली होती. आपणांतील शिल्प व यंत्र शास्त्रांतील बहुतेक शोध, वाफेच्या व वायूच्या प्रयोगां सहित, त्यांस परिचित होते. हे समाज एकमेकांशीं उग्र स्पर्धा करीत. त्यांच्यांत त्यांचे श्रीमंत होते व दरिद्री होते; वक्ते होते व जिंकणारे होते; प्रदेशस्वामित्वाकारितां अगर मनोगत हेतु कारितां ते लढाया करीत. निरनिराळ्या संस्थानांत नि-

रानिराळ्या राज्याचे प्रकार त्यांनीं अंगीकारले होते खरे, पण त्यांत स्वतंत्र संस्थांचे प्राधान्य सुरू झालें होतें. लोक संमत सभा सामर्थ्यानें बलिष्ठ होत होत्या. लोक सत्ताक राज्यें अल्पकाळांत सर्वत्र झालीं होतीं. ज्या वर्णाकडे मी पाहुणा गेलों होतों, त्या आनानामें उन्नत वंशास वाटेकीं, प्रजासत्ताक राज्य, ज्यास युरोपांतील अतिप्रतिवुद्धराजकार्यधुरंधर राजनीतीची परमावधी समजतात, ती म्हणजे राज्यशासन शास्त्राच्या आद्यदशेंत अपरिणत व अनभिज्ञ जे प्रयोग करितात, त्यांपैकीं एक प्रयोग असून, ज्या अंतर्भौमी जातींत त्यांचा प्रचार होता, त्यांस ते रानटी व निकृष्ठ मानीत असत. हें युग मत्सराचें व द्वेषाचें; तीव्र मनोविकाराचें; नित्य समाजिक कर्मी फार पण साहसी उलाढालींचें, जाती जातींतल्या कलहाचें, व राज्या राज्यांतल्या युद्धाचें होतें. परंतु ही सामाजिक स्थिती कांहीं पिढ्यांपर्यंत चालून अखेरीस तिचा अंत, निदान अधिक कुलीन व बुद्धिमान लोकांत तरी, ज्यास ते व्हिल (चिद्विभूती) म्हणतात त्या सर्वव्यापी रसांतल्या अदृश्य गुणाचा उत्तरोत्तर शोध होत गेल्यानें झाला होता.

झी ही पंडितांच्या पाठशाळेंत विद्याविशारद आध्यापिका होती. तिनें असल्या विषयांचा अभ्यास माझ्या यजमानाच्या कुटुंबांपैकीं सर्व मंडळीहून अधिक लक्ष्य लावून केला होता, तिच्या म्हणण्या प्रमाणें हा रस इत

का उत्थित अगर शिक्षित करणें शक्य आहे कीं, त्या योगें जडाच्या सर्व रूपांवर, मग ते सजीव अगर निर्जीव असोत, मोठें बलवत्तर साधन प्राप्त होऊं शकतें. विजेच्या सपाट्या प्रमाणें, त्या योगें नाश करितां येतो, पण भिन्नप्रकारें प्रयोग केला असतां जीवाचें पुनःसंपूरण अगर बलवर्धन करतां येतें, उपशम करतां येतो, अगर रक्षण करतां येतें. रोगाच्या प्रतीकारांत मुख्यत्वें त्याजवर त्यांची श्रध्दा असते. प्रतीकार म्हणण्यापेक्षां शारीरिक घटनेच्या स्वभाविक शक्तींचा योग्य समतोल पुनः साधण्यास हा रस समर्थ करतो, व त्यायोगें प्रतीकार आपोआप होतो हें म्हणणें अधिक प्रशस्त. त्याच्या योगें ते अतितम घन पदार्थ फोडून विभागतात, व भूगर्भांतर्गत अरण्यांत पेर करण्याकरितां दऱ्या पाडतात. त्यांच्या दिव्याकरितां ज्यापेट घेणाऱ्या द्रव्यांचा पूर्वी ते उपयोग करीत असत, त्याच्याहून याचा प्रकाश अधिक धिमा, मऊ व आरोग्यकारक असतो, तो ही ते त्याजपासून उत्पन्न करितात.

परंतु चिद्विभूतीच्या आंगीं जे अधिक दारुण धर्म आहेत त्यांचे प्रेरण करण्याच्या युक्तीचा शोध लागल्याचें म्हणूं लागल्यानें जे परिणाम झाले, त्यांचा सामाजिक व्यवस्थेवर बसलेला पगडा विशेषतः स्मरणार्ह होय. हे परिणाम जसजसे सर्वत्र अवगत होतगेले, व त्यांचा उपयोग जसजसा कौशल्यानें लोक करूं लागले, तसें युद्ध

म्हणून या चिद्विभूती शोधून काढणारांतून बंद पडलें; कारण नाश करण्याची कला इतक्या पूर्ण दशेस त्यांनीं आणली कीं, संख्येचें, रणशिक्षणाचें, व संग्रामिककलेचें श्रेष्ठत्व तिच्यापुढें सर्व विलयास जाई. एखाद्या काठीच्या पोकळींत बार भरून, तो लहान मुलाच्या हातानें सोडला पुरे, कीं मनस्वी अगाध जरी किल्ला असला तरी त्याची धूळधाण उडे; अगर त्याच्या त्या प्रज्वलिज लोळानें, झेंड्या पासून तहत पिछाडी पर्यंत व्यूहाकृती सेनेंत आग पेटे. सैन्या सैन्याची गांठ पडून, दोघांच्याही ही सामुग्री स्वाधीन असली, म्हणजे प्रत्येक 'समूलं च विनश्यति' असेंच व्हावयाचें. तेव्हां युद्धाचा मनु अर्थातच गत झाला होता. पण युद्धाच्या मनुसमाप्ती बरोबर, सामाजिक व्यवस्था संबंधीं इतर परिणाम लवकरच अभिगत झाले होते. इच्छा होतांच तत्क्षणीं गांठ पडेल त्यास ठारकरण्याचें सामर्थ्य असल्यानें, एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याच्या इतका पूर्णपणें आधीन झाला होता कीं, तरवारीच्या जोरावर राज्य करणें ही समज राजनितीशास्त्र पद्धतींतून व व्यवहार विधींतून उत्तरोत्तर विनाश पावली होती. मोठ्या दूरदूर अंतरावर पसरलेले असंख्यात समाज एका बलाच्या सामर्थ्यानें मात्र एकत्र ठेवतां येणें शक्य आहे, पण आतां स्वसंरक्षणाचीही गरज उरली नाहीं, व एक्या संस्थानास दुसऱ्याहून अधिक लोकसं-

ख्या असण्याच्या इच्छेनें उत्पन्न होणारा स्वोन्नत्तीचा गर्वही राहिला नाहीं.

या प्रमाणें या चिद्विभूतिनिरूपकांत, थोड्या पिढ्या उलटल्या नाहींत तोंच, प्रशांततेनें, बेतावाताच्या संख्येचे समाज बनून गेले होते. ज्यांच्यांत मी पडलों होतों, ती जात १२,००० कुटुंबांत होती. प्रत्येक जातीनें आपल्या गरजा पुरवतील एवढ्या प्रदेशावर वस्ती करावी, व विवक्षित काळीं, त्यांच्यांतील अतिरिक्त संख्येनें दुसरें राज्य हुडकण्याकरितां जावें. या देशपर्यटणास निघणाऱ्यांची निवड हुकमतीनें करण्याची गरज पडत नसे. कारण, आपखुपीनें जाणाऱ्यांची उपयुक्त संख्या नेहेमी तयार असे.

हीं प्रविभक्त संस्थानें, प्रदेशाच्या व लोकसंख्येच्या मानानें पाहतां, चिमुकलीं होतीं, पण तीं सर्व एका सर्वव्यापक कुलांतील होतीं. त्यांच्या उपभाषांत कांहीं थोडी भिन्नता असे—पण ते सर्व एकच भाषा बोलत. परस्परांत विवाह व्यवहार करीत. एकच धर्मनीति व रूढी त्यांच्यांत सामान्यतः चालत असे. चिद्विभूतीचें व तिच्या नियोजनाच्या प्रयोगाचें ज्ञान हें या भिन्नभिन्न समाजाचें इतकें महत्वाचें बंधन होतें कीं, अव्हिल व उन्नती हे दोन्ही शब्द तुल्यार्थ समजत. व्हिल ( चिद्विभूती ) चा उपयोग करणारे समाज, आना जातींतील जे लोक अजूनही रानटी स्थितींत होते, त्यांच्याहून आपण भिन्न

आहेंत हें दाखविण्याकरितां आपणांस ञ्हिूलया म्हणजे उन्नत राष्ट्रें हें सामान्य नांव घेत.

ञ्हिूलया जातीची राज्य पद्धती बाह्यतः फार संमिश्र दिसे, पण वस्तुतः ती फारच सोपी होती. पृथ्वीवर जें तत्व उपपत्तिद्वारा अंगीकारलें आहे, पण प्रयोगतः क्वचित्च आचरण्यांत येतें, तें त्या राज्यपद्धतीचा पाया होता. म्हणजे, तत्वज्ञानाच्या सर्व दर्शनांच्या हेतूंचा कल अद्वैतप्राप्तीकडे असतो, अथवा सर्व मधल्या घोटाळ्यांतून निवून निर्विकार जें एक बीज अथवा तत्व तेथपर्यंत अधिरोहणकरण्याकडे असतो. उदाहरणार्थ, राज्यनितींत, प्रजाप्रभुत्व वाद्यांत देखील असें एकचित्त आहे कीं, साम्राज्य जर परोपकारशील असेल, तर राज्य व्यवहार उत्तम चालेल, मात्र तें अव्याहत चालेल अशा विषयीं अथवा तें चालविणारा आपल्या अधिकराचा दुरुपयोग करणार नाहीं अशा विषयीं कांहीं विश्वास असला पाहिजे. सबब, या अद्वितीय समाजानें एकच श्रेष्ठ न्यायाधीश निवडलेला होता. त्यास ते " तूर " म्हणत. याजकडे अधिकार ताहयात चालावयाचा असें म्हणत मात्र, पण प्रथम वार्धक्य समीप आल्यावर तो आपणाकडे रहावा असा क्वचितच उत्साह राही. हें खरें आहे कीं, अधिकारापन्न चिंता लावून घेण्याची वांछा होण्यासारखें यासमाजांत कांहींच नसे. म्हणजे, सत्कार अगर कांहीं उच्चपदवी प्रदर्शक लक्षणें या

अधिकार पदास नेमून दिलेली नव्हती. तो श्रेष्ट न्यायाधीश म्हणून त्यास वरीष्ट प्रतीचें वसतीस्थान अगर आद्रा अशी विशिष्ट योजना नव्हती. वरें, पण त्याजकडे असलेलें काम जर पाहिलें तर तेंही विस्मय होण्या इतकें थोडें व सोपें असे, व तें करण्याला गुरुतर उत्साह अगर बुद्धिमत्ता लागत असे असें नाहीं. युद्धाविषयीं भयच नव्हतें, म्हणून सेना बाळगाव्या लागत नसत. बलाच्या हिमतीवर राज्यपद्धती नव्हतीच, तेव्हां पोलिसाची नेमणुक करणें, व त्यांस हुकुम देणें, यांचीही गरज नव्हती. ज्याला आपण गुन्हा म्हणतों, तो या व्हिूलया जातीस अगदीं अनश्रुत. अपराध्यांस दंडकरण्याचीं कोडतें अर्थातच नसत. दिवाणींत क्वचित प्रसंगीं जे वाद उत्पन्न होत, ते उभयपक्षीं मित्रांनीं निवडलेल्या मध्यस्थाकडे सोंपवीत, अगर पुढें जिजाविषयीं वर्णन केलेलें आहे त्या पंडितांच्या सभेंत निवाडा करून घेत. त्यांच्यांत वकिलीचा व्यवसाय करणारे व्यवहारज्ञ नव्हते. फार कशाला, त्यांच्यांत व्यवहारविधी (कायदे) म्हणजे कायते स्नेहशीलतेनें ठरविलेले संकेत. कारण, ह्या विधिभंग करणाऱ्या (अपराधयांच्या) काठींत न्यायाधिशास ठार करणाऱ्याचें जर साधन आहे, तर त्याजविरुद्ध कायद्याची बजावणी करण्यास कोणाचेंच सामर्थ्य नसे. त्यांच्यांत कांहीं रूढी व नियम होते, त्यांचे अनुकरण मुकाट्यानें करण्याची त्यां-

नीं कित्यक पिढ्या पासून संवय लावून घेतली होती. जर कोणास असलें अनुकरण करणें कठीण वाटलें, तर त्यानें समाज सोडून इतरत्र जावें. सारांश, या संस्थानांत, आपणांतील खासगी कुटुंबांत जसा नियम असतो तसलाच त्यांच्यांत होता; म्हणजे आपणाकडे जर स्वतंत्र व प्रौढवयांत आलेला आपल्या कुटुंबांतील कोणी आला व त्याचें आपण आगत स्वागत केलें तर त्याला आपण वस्तुतः असें म्हणतो "या आमच्या रूढी व हे आमचे नियम तुम्हाला पसंत अगर नापसंत पडत असतील त्या प्रमाणें रहा किंवा जा." ज्यांना आपण कायदे म्हणतों, तसले जरी त्यांच्यात नव्हते, तरी त्यांच्या इतकी (कायदे) विधिनिष्ट जात पृथ्वीवर एकही नाहीं. समाजानें केलेल्या नियमांचें अनुकरण हें जणु प्रकृतोत्पादित ज्ञाना इतकें त्यांस सहज असतें. प्रत्येक घरांत देखील तेथील मुख्य जो नियम अनुवर्तनाकारितां म्हणून करितो, त्या विरुद्ध त्या कुटुंबापैकीं जे असतील ते कधींहीं आचरण करावयाचे नाहींत, अगर त्याची टरही उडविणार नाहींत. त्यांच्यांत एक म्हण आहे, तिचें रहस्य शब्द विस्तारानें हरपतें, ती अशी कीं "व्यवस्थे विना सुख नाहीं, अधिकाराविना व्यवस्था नाहीं, व एकी विना अधिकार नाहीं." त्यांच्यांतील सामाजिक व गृहसंबंधीं निग्रह पद्धतीचें सौजन्य, वाग्व्यवहारांत ते अमुक अमकें विधि

विरुद्ध अगर निषिद्ध आहे असें जें ते म्हणतात, त्या सं-प्रदायावरून स्पष्ट होईल, म्हणजे "अशी विनंती करण्यांत येते कीं अमुक अमकें करूंनये." अपराध जसा आना जातींत अनश्रुत तसेंच दारिद्र्यही त्यांत अनुश्रुत. यावरून मालमत्ता सार्वलौकिक असते असें, अगर त्यांच्या स्वतांच्या विस्तारांत आणि घरादाराच्या आकारांत व विलासांत सगळे सारखेच असतात असें, समजूं नये. परंतु संपत्तीच्या अनुरोधानें व धंद्यांतील निवडीनें त्यांच्यां पदवींत अगर स्थितींत भेद नसल्यानें, मर्जीनुरूप आचरण प्रत्येकजण करितो, व त्यामुळें हेवा व स्पर्धा उत्पन्न होत नाहीं. कांहींस बेताबेतानें राहणें आवडतें व कांहींस दिमाकाचें आवडतें. प्रत्येकजण अपापल्यापरी सुखी होऊन राहतो. याप्रमाणें स्पर्धा नसल्यानें, व लोकवस्ती विषयीं मर्यादा असल्यानें, कोणत्याच कुटुंबाची अन्नान्न दशा होणें कठीण असतें. फार द्रव्याच्या अभिलाषानें धोक्याचे व्यापार करणें त्यांच्यांत नाहीं. व वरिष्ट प्रकारची संपत्ती व पदवी प्राप्त होण्याची स्पर्धा बाळगणारे ही त्यांत नाहींत. प्रत्येक वसाहतींत, प्रथमतः आलेल्या सर्वांस सारख्याच प्रमाणानें जमीन वांटून दिलेली असेल यांत संशय नाहीं. पण त्यांतील इतरांपेक्षा जे अधिक साहसी होते, त्यांनीं आपला बस्तरा थेट रानाच्या सीमे पर्यंत घुसविला होता; आपल्या शेतांची पिकें अधिक समृद्धफलप्रद व्हावीं अशा सु-

धारणा केल्या होत्या; व व्यापारांत व वाणिज्यांत प्रवेश करून होते. याप्रकारें, अर्थातच, इतरांपेक्षा कांहीं अधिक संपन्न होते. पण अगदींच दरिद्री अगर यथारुची लागणारे पदार्थहीन ते नव्हते. ही हीनता त्यांस भासली तर, स्थलांतर करणें नेहमी त्यांच्या हातीं असे. अथवा फार झालें तर द्रव्यवाना जवळ मदत मागीतली पुरे कीं त्यांस लाज न वाटतां, मदत खात्री पूर्वक मिळे. कारण, आपण बंधू असून एकाच प्रेमकर व अविभक्त कुटुंबाचे अवयव आहोंत असें ते सर्व मानीत. या विषयाविषयीं या माझ्या कथानकांत प्रसंगवशात् लिहिण्यांत येईल.

मुख्य न्यायाधिशाचें विशिष्ट अवधान हें कीं, ज्या बजावणी करणाऱ्या शाखांकडें विशेष कामाचा निर्वाह सोंपला असेल त्यांजशीं त्यानें व्यवहार ठेवावा. असल्या विशेष कामांपैकीं अतिमहत्वाचें व आवश्यक काम म्हणजे प्रकाशाचा पुरवठा करणें हें असे. या शाखेचा अध्यक्ष हा माझा यजमान–आफलिन–हा होता. दुसरी एक शाखा होती तिला "पारदेशीय" म्हटलें तरी चालेल. तिनें आसपासच्या सजातीय संस्थानांशीं व्यवहार ठेवावा, तो मुख्यत्वें करून नवीन युक्त्या निघाल्या असतील त्यांजविषयीं माहिती मिळविण्या करितां ठेवावा. तिसरी एक शाखा असे, तिजकडे असल्या युक्त्या व यंत्रांतील सुधारणा परीक्षणा करितां सोंपवीत असत. या

शाखेस जोडून पंडितांची पाठशाळा होती. या पाठशाळेंत मुख्यशः येणारे, जे आना गतभर्तृक अगर निपुत्रिक असतील ते, आणि तरुण अविवाहित मुली. या सर्व मुलींतील ह्मी ही फार उद्योग करणारी होती. आणि जर या लोकांत कीर्ती व प्रतिष्ठा माहीत असती ( ही त्यांस माहीत नव्हती असें मी पुढें सिद्ध करीन ) तर त्यांतील महत्कीर्तीलब्ध व महत्प्रातिष्ठितांपैकीं ती होती. व्यवहारांत ज्यांचा अत्यल्प उपयोग होतो, असले अभ्यास, उदाहरणार्थ शुद्ध काल्पनीक तत्वशास्त्र, पुराण कालीन इतिहास, आणि असलीं शास्त्रें म्हणजे क्षुद्र जंतुशास्त्र*, कंबु शास्त्र†, इत्यादी, हे असक्त होऊन संपादन करणाऱ्या आध्यापिका होत्या. ह्मीचें मन अॅरिस्टाटलासारखें मोठें व्यवसायी होतें. त्यांत कल्पनेच्या अत्यंत गहन विषयाविषयीं व अत्यंतसूक्ष्म विस्ताराविषयीं सारखा समावेश होत असे. तिनें ⁽वाघाच्या पंज्याच्या केशांतील तदुपजीवजंतूविषयीं

---

* Entomology is that part of Zoology, which treats of insects; the science or natural history and discription of insects.

† Conchology is the doctrine or science of shells and the animals that inhabit them.

⁽ उच्च लोकांत जो वाघ सांपडतो त्यांत व या प्राण्यांत बहुत अंशीं भिन्नता आहे. तो अधिक मोठा, रुंद पंज्याचा, व आम्रभाग आंत

दोन ग्रंथ लिहिले होते,ते त्या मौंजिच्या विषया वरील उत्तम प्रमाणरूप ग्रंथ असें मानीत. पण पंडितांच्या अनुपरीक्षणाचें पर्यवसान असल्या सूक्ष्मदर्शी व सुरस अभ्यासा पुरतेंच असतें असें नाहीं, त्यांच्यांत इतर अधिक महत्वाच्या अभ्यासांचा, व मुख्यत्वेंकरून चिद्विभूतीच्या ( व्हिूलच्या ) गुणांविषयीं, समावेश होतो. त्यांच्या अधिक नाजुक स्नायुघटनेमुळें, या गुणांची समजुत करून घेण्यांत आध्यापिका ( स्त्रिया ) अत्यंत तीक्ष्ण असतात. संगत वैचित्र्यामुळें अगर विषय वैचित्र्यामुळें ज्या क्वचित् प्रसंगीं आपली अवधारणा भ्रमण पावते, तेव्हां तूर अथवा मुख्य न्यायाधिश ज्या उपदेशकांची–(तीन पर्यंत निवडण्याची मर्यादा आहे )–निवड करतो ते या पाठशाळें पैकींच असतात.

या खेरीज इतर कमी मातबरीच्या शाखा आहेत, पण त्यांतील कामें इतकीं धिमेपणानें व शांततेनें चालतात कीं, राज्यपद्धतीचें प्रमाण त्यांत अगदीं अदृश्य

---

गेलेला असा असतो. तळ्याच्या व डबक्याच्या बाजूस राहून मुख्यत्वें माशावर उपजीवन करतो. पण शक्तिहीन भूचर प्राणि आलाच तर त्यांचा यास मत्सवाय नसतो. वन प्रदेशांतून देखील तो नाहींसा होत चालला आहे, कारण तेथील अजस्र सर्प त्याचा स्वाहा करीत आहेत. मला वाटतें तो व्याघ्र जातीपैकींच खचित असावा, कारण त्याच्या पंज्यांत जो तदुपजीवी जंतू सांपडतो, तो एशिया खंडांतील वाघाच्यांत सांपडतो व त्याचीच ही छोटेखानी प्रतिमा असते.

होतें, व सामाजिक व्यवस्था इतकी सुयंत्रित व अबाधित असतें कीं, जणु काय प्रकृतीनेंच लावून दिलेला तो विधी आहे. यंत्रांची योजना घरीं दारीं होणाऱ्या सर्व व्यापारांत इतकी करतात कीं, त्यांच्या व्याप्तीची कल्पना करतां येत नाहीं. ज्या शाखेकडे यांत्रीक व्यवहार सोंपविला आहे, तिचा सतत हेतु यंत्रांच्या नैपुण्याचा विस्तार करावा हा असतो. यांच्यांत मजूरदारांचा अगर चाकरांचा निराळा वर्ग नाहीं, पण यंत्रें चालविण्यांत मदत करण्यास अगर त्यांचे संनियमन करण्यास जे मजूर लागतात तीं सर्व मुलें असतात. आईच्या संगोपनांतून निघाल्यापासून तीं विवाहास योग्य असें वय प्राप्त न झालेलीं अशीं असतात. विवाहास योग्य वय म्हणजे जाई ( स्त्रिया ) असतील तर १६, व आना ( पुरुष ) असतील तर २०, असें ते समजतात. या मुलांच्या टोळ्या व विभाग बनलेले असून, त्यांतलेच त्यांत प्रमुख आहेत. ते आपल्या खुषीस वाटेल ते, अगर जे करण्यास आपण बहुत योग्य आहों असें त्यांस वाटतें ते, व्यवसाय करितात. कांहीं हस्तलाघवाचीं शिल्पकामें करितात; कांहीं शेती करितात; कांहीं गृहसंबंधीं कामें करितात, व कांहीं जी यालोकांत एकच साहासिक सेवा आहे ती करितात; म्हणजे या वर्णास ज्या मुख्य संकटांनीं आसन्न केलें आहे त्यांत पहिलें भूगर्भात जे कधींकधीं कंप होतात ते— ( यांजविषयीं अगोदर भ-

विप्य करून त्यांचें निरसन करण्याकरितां अत्यंत कल्पकपणा योजावा लागतो ) अग्नि व आप ( पाणि ) यांचे उपद्रव, जे भूगर्भांतील वाताचे व निसटणाऱ्या वायूचे क्षोभ होत. या प्रदेशाच्या सीमेवर आणि इतर सर्व ज्या जागीं हें संकट येण्याची भीति असते, तेथें तेथें जागरूक निरीक्षक स्थानापन्न आहेत. त्यांच्यांत व ज्या दिवाणखान्यांत निवडक पंडित पाळीपाळीनें नित्यशः बसत असतात, तेथवर विद्युद्यंत्रानें संदर्श करतां येतो. प्रौढवया समीप आलेल्या वयोज्येष्ठ मुलांपैकीं हे निरीक्षक निवडतात, व त्यांत असा ही हेतु असतो कीं, सर्व आयुष्यांत इतर वयाहून त्या वयांत अवलोकन शक्ती अधिक तीव्र असते आणि शारीरिक सामर्थ्य अधिक जागरूक असतें. दुसरी साहसिक सेवा कमी धिटाईची असते. तींत आनांच्या आयुष्यास, त्यांच्या उन्नतीस, व त्यांच्या सुखास जे प्राणी बाधक असतील, त्या सर्वांचा नाश करणें हें काम असतें. या प्राण्यांपैकीं अतितम भयप्रद म्हणजे ते बृहत्सर्प (ज्यांचे विश्वप्रलयाप्राग् अवशेष आपल्या पदार्थसंग्रहागारांत मांडलेले आहेत) आणि कांहीं अजस्त्र सपक्ष प्राणी, अर्धवट सर्प अर्धवट पक्षी, हे होत. हे व आपणांमधील वाघांच्या व सर्पांच्या तोडीचे दुसरे हिंस्त्र पशु, यांची पारध करून मारण्याचें काम लहान लहान मुलांकडे सोंपलें असे. कारण, आनांच्या समजुतीप्रमाणें, याकामीं

निर्दयपणाची गरज लागते. जसें जसें मूल लहान, तसें तसें अधीक निर्दयपणानें तें नाश करूं शकतें. आणखी एक पशूंचा वर्ग आहे, तो मारण्यांत तारतम्य पाहवें लागतें. त्यांजवर मध्यम वयाच्या मुलांचीं योजना केलेली असते. या पशूंकडून मनुष्याच्या जीवास धोका नसतो, पण ते मनुष्यानें श्रमानें तयार केलेल्या उत्पन्नाचा उच्छेद करीत असतात. हा पशु हरिण आणि मृगजातीपैकीं एक भेद आहे. आणखी एक लहानगा प्राणी असतो तो आपणांमधील सशाच्या जातींतला, पण पिकाचा नाश करण्यांत त्याहून अपरिमित घातुक आणि अपहाराच्या प्रकारांत त्याहून फारच धूर्त असतो. याप्रमाणें ज्या लहान मुलांची योजना केलेली असते, त्यांचें पहिलें काम हें कीं कुत्र्याला जसें मांसागाराकडून जाण्यास अगर यजमानाचा माल राखण्यास शिकवितात, तसें या पशूंपैकीं जे अधिक समंजस असतील त्यांना कुंपणाला पाहून भिण्यास शिकवावयाचें. हीं कुंपणें दर्शविण्याकरितां स्पष्ट सीमाचिन्हें केलेलीं असतात. जर ह्या प्राण्यांस ही शिक्षा नच लावतां आली तर मात्र त्यांचा नाश करितात. भक्ष्याकरितां अगर क्रीडेच्या निमित्तानें ते जीवाची हानी कधीं करीत नाहींत. पण शिकविल्यानंतर जर ते प्राणी आना जातीस विरोधी राहिले तर त्यांची उपेक्षा कधींही करीत नाहींत. ही शारीरिक सेवा व कामें चाललीं असतां, यामुलांचें मानसिक शिक्षण त्यांचें

बाल्य संपेपर्यंत त्या समवेत चाललें असतें. नंतर अशी सामान्य रूढी आहे कीं, मुलांनीं पंडितांच्या पाठशाळेंत राहून, नियमित विषयांचा अभ्यास करावा. त्यांत सामान्य विषयां खेरीज, ते आपण होऊन जे व्यवसाय पसंत करतील, अगर जिकडे त्यांची मती चालेल, त्या विषयांचें विद्यार्थ्यांस विशेष शिक्षण देण्यांत येतें. पण कांहीं जणांस हा परीक्ष्यमाण काळ प्रवासांत काढण्याचें, अगर परदेशीं जाण्याचें, अथवा एकदमच ग्रामवास अगर व्यापाराचे व्यवसाय करण्याचें, अधिक पसंत पडतें, ते तसें करतात. व्यक्तींच्या चित्तप्रवृत्तीवर कोणताही बलात्कार करीत नाहींत.

---

## भाग १०

आना हा शब्द ( त्याचा उच्चार दीर्घ आ- र- ना असा करितात ) आपणांतील पुरुष ( अनेकवचनी ) शब्दाच्या तोडीचा आहे. व आन ( उच्चार आ- र- न ) एकवचनी "पुरुष" याजसारखा आहे. स्त्रीवाची शब्द (Gy) गाय आहे ( उच्चार करतानां इंग्रजींतील Guy प्रमाणें G चा उच्चार ( तीव्र प्राण (ग) करावा). त्याचें अनेकवचन Gy-ei जाई असें होतें. यांतील, हें G अक्षर अनेकवचनीं मृदु ( अल्पप्राण ) होतें, जसें जाई. त्यांच्यां:

एक म्हण आहे, तिचा आशय असा कीं हा जो उच्चारांत फरक होतो तो सूचक आहे. कारण स्त्री जाती समुच्चयतः मृदु आहे, पण व्यक्तितः व्यवहारास तीव्र आहे. ज्यांजविषयीं पृथ्वीवरील कांहीं तत्वज्ञ चर्चा करीत आहेत, ते पुरुषाच्या बरोबरीचे सर्व हक्क तेथील स्त्रिया पूर्णपणें उपभोगीत आहेत.

बाल्यावस्थेंत, श्रमाचे व मेहनतीचे व्यवसाय त्या आंग न चोरतां मुलांबरोबरीनें करितात. आणि वास्तविकपणें असें आहे कीं, जे प्राणी आनाशीं असन्नित विरोधी असतात, त्यांच्या नाशाकरितां ज्या आद्यवयाची योजना लावून दिलेली आहे, त्यांत भय व द्वेष यांच्या आधीन असतां, या मुली, प्रकृतिवशात्, अधिक क्रूर असतात, म्हणून त्यांनाच या कामीं बहुधा पसंत करितात. बाल्य व विवाहास योग्य जो काल, त्यांतील अवधींत, स्त्रीपुरुषांत आदरहीन अन्योन्य संसर्ग उद्बद्ध ( महकूफ ) असतो. उद्वाहोचित समयीं त्याचा पुनः प्रारंभ होतो. पण त्यामुळें विवाहजन्य परिणामाहून निकृष्टतर परिणाम होत नाहींत. ज्या सर्व कला व जे व्यवसाय एका [पुरुष किंवा स्त्री] जातीस लावून दिले आहेत, ते आचरण्याची दुसरीस मोकळीक आहे. आणि जशा आपल्या जगांतील तरुण स्त्रिया, ईश्वरवादी मतांतील अतितम सूक्ष्म विषयांविषयीं आम्ही प्रमाण आहोंत, असें मानतात, व संसारकृत्यांत सतत गुंतल्यामुळें ते विषय

जाणण्याची पुरतीशी विद्या व संस्कृतबुद्धि थोड्याच पुरुषांस असते असें प्रपादतात, त्या प्रमाणेंच जाई ( स्त्रिया ) या तर्कशास्त्राच्या सर्व दुर्बोध व गहन शाखांत आपणाकडे वरिष्ठत्व गर्वानें स्वीकारतात; कारण, त्या म्हणतात कीं, आना हे त्यांच्या बुद्धिगांभीर्याच्या मंदतेनें, अथवा रोख ठोक व्यवसायाच्या नित्यकर्मामुळें, त्या शाखा समजण्यास अयोग्य असतात. पूर्ववयांत तालमीची कसरत केल्यानें म्हणा, अगर त्यांच्या शारीरिक घटनेमुळें म्हणा, जाई या बहुशः आनाहून शारीरिक बळानें सरस असतात ( स्त्रियांच्या हक्का विषयीं विचारांत व ते चालू ठेवण्यांत हा महत्वाचाच मुद्दा होय. ) त्या पुरुषाहून उंच होतात, व त्यांच्या अधिक गरगरित अवयवाखालीं इतर जाती ( पुरुषा ) प्रमाणेंच दणगट स्नायू व शिरा ठांसलेल्या असतात. फार काय सांगावें, ते म्हणतात कीं, प्रकृतीच्या मूळ व्यवस्थेप्रमाणें, स्त्रियांनीं पुरुषाहून स्थूलतर असावें असाच संकेत आहे. आणि हें स्वमत सिद्ध करण्यासाठीं ते असें प्रपादतात कीं, सूक्ष्म जंतूंत जीवाच्या* आद्यतम घटनेंत व पृष्ठवंशीय प्राण्यांतील फारच फार प्राचीन जातींत म्हणजे माशांत, ( या दोन्हीवर्गीयांत ) तशी इच्छा झाली तर, नराचा स्वाहाकार करण्या एवढ्याल्या मोठ्या मा-

* सृष्ट्यारंभीं जंतूंत जो जीव उत्पन्न होतो, त्यांत नराहून मादी मोठी असते.

द्या बहुधा असतात. हें विशेष आहे कीं, या जाईची ( स्त्रियांची ) सत्ता, नाशाची बीजें ज्यांत आहेत, त्या दुर्बोध रसावर अगर कर्तृत्व शक्तीवर अधिक सुकर व एकाग्रताभूत असते; तसेंच, ज्या धूर्ततेंत कापट्याचा समावेश होतो त्याचा ही अधिक मोठा भाग त्यांजमध्यें ( स्त्रियांत ) वसत असतो. याप्रमाणें, नराकडून होणाऱ्या सर्व अतिक्रमांपासून त्या आपणास बचावितात इतकेंच नव्हे, तर हव्या त्या क्षणीं अपराधी नवऱ्यांच्यिा जीवाचा, तो संकटाविषयीं यत्किंचित शंका धरीत नसतांना, अंत करूं शकतात. पण या नाश करण्याच्या कलेंतील त्यांच्या घोर वरिष्ठत्वाचा दुरुपयोग केल्याचें उदाहरण कैक युगांत घडल्याचा लेख नाहीं, हें त्यांस भूषणास्पद आहे. मागें जें उदाहरण झालें तें, ज्या समाजाविषयीं मी लिहीत आहें, त्यांच्या काल निर्णय विद्येप्रमाणें, दोन हजार वर्षांपूर्वी घडून आलें. एका गाईनें ( स्त्रीनें ) मत्सराच्या आवेशांत, आपल्या नवऱ्यास ठार केलें. या गर्हणीय कृत्यानें पुरुषांत इतकें भय जागरूक झालें कीं, त्यांचा समुदायचा समुदाय जाईस (स्त्रियांस ) एकट्याच टाकून परागंदा झाला. याविषयीं अशी कथा आहे कीं, या प्रमाणें त्या विधवा जाईनीं निराश होऊन, ती खून करणारी निद्रित (व म्हणून शस्त्र रहित) असतां, तिला ठार केलें. व आपणांत निश्चयपूर्वक अशी प्रतिज्ञा केली

कीं, हा विवाहप्राप्त घातुक अधिकार कधींच उपयोगांत आणावयाचा नाहीं; व पुढें होणाऱ्या कन्या संततीस या प्रतिज्ञेचा नेहेमी उपदेश करावयाचाच. या सामोपचारा-च्या योगें, त्यांनीं प्रेषित केलेल्यांनीं जाऊन त्यांच्या कृतपलायन नवऱ्यांपैकीं पुष्कळांस परत येण्याविषयीं वळविण्याचें यश घेतलें; पण जे आले ते बहुधा वयोवृद्ध होते. तरुणांनीं आपल्या सहचरींविषयीं भेकडपणाच्या कांक्षेनें, अगर आपल्या गुणांविषयीं गर्वयुक्त गणनेनें म्हणा, सर्व वंचनेचा अनादर केला, आणि दुसऱ्या समुदायांत राहून, दुसऱ्या कोणी सहचरींच्या ते गळीं सांप-डले. तेथें अधिक सुखांत असतील कीं नाहीं हा वानवाच आहे. परंतु तरुण पुरुषांपैकीं एवढा मोठ्या संख्येची हानी झाली, ती जायांस एक हितावह अद्दल घडली, आणि त्यांनीं पतिव्रत नियम करून जी शपथ घेतली होती, तीस सुस्थिर करती झाली. फार काय सांगावें, आनावर जें जाईचें अपकार करण्याचें व संरक्षणाचें वर्चस्व एकदां असे, तें दोन्ही प्रकारचें श्रेष्ठत्व, परंपरागत विलोपामुळें, आतां नष्ट झालें असें लोक समजतात. भूलोकावरील कनिष्ठ प्राण्यांतील मूळ रचनेंत जे अनेकविध विशेष धर्म प्रकृतीनें त्यांच्या संरक्षणार्थ योजिले आहेत, ते जसे अवस्थांतर झाल्यानें उत्तरोत्तर लुप्त होतात, अगर अका-र्यकर होतात, तसलेंच हें उदाहरण होय; तत्रापि, जो आन

एखाद्या गाईला, ती दणगट की तो दणगट ही प्रतीति पाहण्यास उद्युक्त करील, त्याजबद्दल मला खेदच वाटेल.

वर जो वृत्तांत सांगितला आहे, तो घडून आल्या दिवसापासून, आनांच्या विवाहरुढींत कांहीं फरक झाले असें ते लेखतात. ते फरक कदाचित् पुरुषांस कांहींसे हितकारक आहेत. हल्लीं, ते आपणास विवाह पाशानें तीन वर्षेपर्यंत बहूत करून बद्धकरून घेतात. प्रत्येक तिसरें वर्ष संपलें कीं पुरुषास अथवा स्त्रीस काडी मोडून देतां येते, व पुनः लग्न करण्यास मोकळीक असते. दाहा वर्षांच्या अंतीं, पहिल्या पत्नीस सर्व संगपरित्याग करूं देऊन, दुसरी पत्नी करण्याचा हक्क अनास असतो. हे नियम बहुतांशीं लुप्तार्थ वचनें आहेत; काडी मोडणें व अनेक पत्न्या करणें हें फारच क्वचित घडतें; आणि हल्लीं विवाह स्थिती या चमत्कारिक लोकांत अपूर्व सुखकर व प्रशांत झाली आहे. कारण, जरी जाईचें शारीरिक बलांत व बुद्धि प्रभावांत आत्मश्लाघापर वर्चस्व आहे, तरी आपणास विभक्त व्हावें लागेल, अगर सवत तयार होईल, या भयानें त्यांना सुशीलतेनें आचरण करणें भाग होतें. आणि आना हे रुढीचे बंदे गुलाम असून, त्यांस ज्या मुखाशीं व चर्येशीं नित्याभ्यासानें संघट्टण पडलें असतें, तीं (फारच प्रकोप उत्पन्न झाला तर निराळी गोष्ट ) सोडून त्यांच्या ऐवजीं संकटास्पद अदृष्ट पूर्ववस्तु ( नवी नवरी )

ते घेऊं इच्छित नाहींत. परंतु एक हक्क मोठ्या दक्षतेनें जाई राखतात. तो संपादण्याची इच्छा हाच कदाचित पृथ्वीवरील स्त्रियांचे हक्क प्रतिपादन करणारांपैकीं बहुतेकांचा गुप्त हेतू असेल. तो हक्क पृथ्वीवर पुरुषांनीं बळकावला आहे; तो असा कीं, आपलें प्रेम प्रकट करणें व आपली प्रार्थना कबूल होण्याकरितां आग्रह करणें; म्हणजे काय कीं, विवाह यांचित होण्याबदला विवाह याचक होणें. वृद्ध असून अविवाहित स्त्री, असलें अद्भुत जाईंत तर असत नाहींच. ज्याजवर आपलें मन जडलें तो आन, इतरत्र दृढानुरक्त नसेल तर, एखाद्या गाईला (स्त्रीला) मिळाला नाहीं, असें वस्तुतः फारच क्वचित घडतें. आरंभीं कितीही लाजाळू, निष्काम आणि मिथ्याविनयेच्छु असा प्रार्थित पुरुष असला तरी, तिचा सतत उद्योग; तिचें कुतूहल; तिचा सानुनय गौरव, आणि तिचें ठिह्लच्या (चिद्विभूती) गुप्त शक्तीवर आधिपत्य, या योगें ज्याला आपण "प्राणहारक* कंठपाश" असें म्हणतों त्यांत त्याची प्रायशः मान अडकावयाचीच. पृथ्वीच्या पृष्ठभागीं पुरुषाच्या अंध निष्ठुरतेनें जो (स्त्रीपुरुष) जातींत संबंध चालू आहे तो विपर्यस्त करण्याविषयीं ते जी उपपत्ती करतात ती निरुत्तर दिसते, व तिचा इतक्य प्रांजलपणें ते उपन्यास करतात कीं, तिचा निष्पक्षपातीपणा-

---

* The fatal noose.= (मराठींत) पायांतली बेडी.

नें विचार करण्यास ती उपपत्ती योग्य आहे असें अभिनंदन करणें रास्त होईल. ते म्हणतात कीं, दोहों जातींपैकीं स्त्री ही पुरुषाहून स्वभावतःच अधिक प्रेमळ स्वभावाची असते; तिच्या विचारांतील पुष्कळ अंश प्रेम व्याप्त करतो, व तो प्रेम तिच्या सुखाला अत्यावश्य आहे. तेव्हां अर्थातच( विवाहाची ) प्रेमाची याचक ती असावी. नाहींतर पुरुष हा सलज्ज व संशयी प्राणी आहे; त्याला अविवाहित राहण्याची स्वार्थपर बुद्धी बहुधा असते; कोमल कटाक्ष व ललित सूचना यांचा मिथ्याबोध झाला असें कपट तो प्रायशः करतो; सारांश काय कीं त्याची दृढनिश्चयानें पाठ घेऊन, त्याला पकडला पाहिजे. ते असें ही आणखी म्हणतात कीं,आपल्या पसंतीस जो आन(पुरुष) पडला, तो आपलासा कायम झाल्याविना, आणि अवघ्या जगतांतून गाईनें ( स्त्रियेनें ) निवडलेला आन ( पुरुष ) पती झाल्यावांचून, ती जितकी सुखीव्हावी त्याहून कमी सुखी असते इतकेंच नाहीं,पण तिच्या अंतःकरणाच्या वृत्ती पुरतेपणें परिपक्व न झाल्यानें, जितकी सज्जन ती असावी तितकी होत नसते. बरें, आन पाहिला तर असला प्राणी आहे कीं एकाच विषयावर त्याचें प्रेम कमी चिरस्थायी जडतें; जी पसंतीस उतरली ती गाई ( स्त्री ) नच मिळालीतर, दुसरीशीं संधी तो सुलभ रीतीनें जोडतो; आणि अखेरीस फारच निंद्य त्यांत असें असतें कीं त्याजवर प्रेम

केलें व त्याची जपणूक केली तरी, त्यानें प्रेम करणें व करून घेणें हें त्याच्या जीवितास कमी आवश्य असतें. खाण्या पिण्याच्या सुखांत व विचाराचे जे अनेक व्यवसाय तो आपणाकरितां उत्पन्न करतो, त्यांत त्यास समाधान वाटूं लागतें.

या पक्षाविषयीं कांहीं ही म्हटलें तरी, पुरुषापुरती ही पद्धती चांगली चालते; कारण, याप्रमाणें आपणावर खरें व उत्कट प्रेम आहे, व आपण जसजसे अधिक लाजाळू व निष्काम दिसूं, तसतसा आपल्या प्राप्ती विषयीं निश्चय वळावतो आहे, अशी खात्री असल्यानें, तो प्रायशः ज्या संकेतांनीं आपलें जीवित आनंद मय राहिलें, पण प्रशांत होईल,अशी त्यास अटकळ असते, ते संकेत कबूल झाले तर अनुमोदन देतो. आनाच्या प्रत्येक व्यक्तीस त्याचे स्वतःचे छंद, स्वतःच्या चाली, व स्वतःची आवड नावड असते; मग ते कांहीं ही असोत, त्यांचा पूर्णपणें व यथार्थ अंगीकार केल्याचें वचन तो मागतो; तें गाई ( स्त्री) आपल्या वस्तु लाभाकरितां सौकर्यानें देते. आणि सत्याच्या ठायीं निःशंक भक्ती हें याविलक्षण लोकांचें ब्रीद असल्यानें, आणि एकदां दिलेलें वचन कितीही चंचलतम बुद्धीची गाई ( स्त्री ) असली तरी मोडावयाचें नाहीं असें असल्यानें, जे संकेत ठरले असतील ते धार्मिकपणें पाळले जातात. सारांश काय कीं, त्यांचे अमूर्त सर्व हक्क व

शक्ती कशाही असल्या तरी, जाई (स्त्रिया) या, मी पृथ्वीवर जीं आजपर्यंत अतितम सुखी कुटुंबें पाहिलीं आहेत, त्यांत सुद्धां उत्तम सुशील, अनुरंजक आणि सविनय अशा पत्न्या असतात. त्यांच्यांतलें हें सूत्रच आहेकीं जेथें गाईचें जडे प्रेम, तेथें आज्ञेचें घडे सुख. हें लक्ष्यांत येईलच कीं (स्त्री पुरुष) जातींच्या परस्पर संबंधाविषयीं लिहितांना मी फक्त लग्नाविषयींच लिहिलें आहे. याचें कारण असें आहे कीं, या समाजांत नीतीनैपुण्य इतक्या योग्यतेस आलेलें आहे कीं लिनेट* नांवाच्या पक्ष्यांनीं जोड्यानीं रहाण्याचें ठरविल्यावर, त्यांच्या जोडप्यांत अधर्म्य संसर्ग जितका कमी शक्य आहे तितकाच यांच्यांतही तो कमी शक्य होय.

## भाग ११

पृथ्वीच्या पृष्ठ भागाखालीं विस्तीर्ण प्रदेश असून, त्यांत प्राण्यांस वस्ती करतां यावी, व ते प्राणी कांहींसे भिन्न खरे, पण मुख्यांशीं ऊर्ध्व लोकांतील प्राण्यांशीं सजातीय असावे, यामुळें बहुतेक भूगर्भवेत्ते व तत्ववेत्ते यांचें जें एक मत असल्याविषयीं मला माहित आहे, त्याशीं जो

* हा एक पक्षी आहे, त्यांत नराची मादी विषयीं अव्यभिचारी भक्ती असते असें जीवादिशास्त्रवेत्ते म्हणतात. भारतांतील कपोत.

विरोध माझ्या दृष्टीस पडला, त्यांत व माझ्या समजुतींत सांगड घालण्याहून अधिक कठीण कोडें कोणतेंच नव्हतें. तें मत असें आहे कीं पृथ्वीवर जरी सूर्य हें ऊष्णतेचें थोरलें उद्गमस्थान आहे, तरी पृथ्वी पटलाच्या अंतर्भागीं जसजसें खोल जावें, तसतशी ही उष्णता वर्धिष्णु होत असते, व असें म्हणतात कीं पृष्ठाच्या अंतर्भागीं ९० फुटी खालीं आरंभ होऊन, प्रत्येक फुटास एक अंश, या प्रमाणानें वाढत जाते. पण ज्या जातीविषयीं मी लिहीत आहें, त्यांचा प्रदेश उंचवट्यावर होता, व म्हणून तारतम्यानें पृथ्वी पृष्ठाच्या नजीक होता, सबब त्यांत इंद्रियवान प्राण्याला माफक पडणारी उष्णता होती असें घटकाभर जरी समर्थन केलें, तरी त्या प्रदेशांतल्या दऱ्या व खोऱ्या देखील, तत्ववेत्ते एवढ्या खोलीवर जितक्या उष्ण असणें शक्य मानतील, त्याहून फारच कमी उष्ण होत्या. आणि फ्रान्स देशाच्या, निदान इटलीच्या, दक्षणेपक्षां तरी त्यांची तप्तता खचित अधिक नव्हती. आणि मला जी माहिती मिळाली त्याप्रमाणें पाहतां, त्या पृष्ठाच्या अथाक खोलीवर, जेथें उष्णता सहन करणाऱ्या पाली* मात्र जगणें शक्य आहे असें एखाद्यास वाटेल तेथें, आपणांप्रमाणेंच. सुव्यवस्थित अशा असंख्य जातींच्या वसाहती झालेल्या होत्या. शास्त्रानें अंगीकृत नियमांशीं जो इ-

* Salamanders.

तका विरोधी प्रकार आहे, त्याचें समर्थन करण्याचा मी डौल घालीत नाहीं, व ह्मीसही त्याच्या उपपत्तींत मला फारसें सहाय्य करतां आलें नाहीं. तिची आपली अशी अटकळ होती कीं, आपल्या भूगर्भवेत्त्यांनीं, पृथ्वीच्या अंतर्यामीं जें मनस्वी रंध्र बाहुल्य आहे, त्यांतील विवरांच्या व अवडधोबड पणाच्या अतिशयत्वा मुळें त्यांत वायूचे अप्रतिहत प्रवाह व वात नेहमी नेहमी उत्पन्न होत असतात, या गोष्टीकडे, व ज्या नानाविध प्रकारांनीं उष्णता बाष्परूपानें विलय पावते व उडून जाते, त्याकडे पुरतेंसें लक्ष्य पोंचविलेलें नाहीं. पण हें ती कबूल करीत असे कीं, व्हिल्यांना जे सृष्ट प्राणी अवगत आहेत, त्यांस ही उष्णता जेथें दुःसह होईल असें पातालोदर असणें शक्य आहे. तरी देखील त्यांच्यांतील तत्ववेत्ते समजतात कीं, अशा जागीं त्यांचा प्रवेश झालाच तर, तेथें सुद्धां कांहीं एका तऱ्हेचे इंद्रियधर्मवान आणि बुद्धि विषयक प्राणी विपुल व वर्धिष्णु असे उपलब्ध होतील. ती म्हणाली "जेथें म्हणून सर्वभद्र (परमेश्वर) रचना करतो, तेथें वास करणारे प्राणी तो स्थापित करतोच, ही खात्री असूंद्या. त्यास रिकामी घरें आवडत नसतात." परंतु तिनें आणखी असें म्हटलें कीं, उष्ण परिमाणांत व हवेंत व्हिल्यांच्या कौशल्यानें पुष्कळ फेर पालट घडून आले आहेत, आणि हे फेरपालट घडून आणण्यांत व्हिल (चिद्विभूती)च्या निर्मातृत्वाचा उप-

योग सुश्रेयस्कर रीतीनें करून घेतला आहे. तिनें एका अतिसूक्ष्म व चेतना द्योतक साधनाचें वर्णन केलें, त्यास ते लई( Lai)म्हणतात. तें व डाक्टर ल्युइन्स यांणींआकाशस्थ प्राणवायु( Ethereal oxygen ) लिहिला आहे, तो एकच असावा असा माझा तर्क आहे. त्या साधनांतर्भूत, व्हिल या संज्ञेखालीं येणाऱ्या सर्व परस्परसंबद्धशक्तींचा समावेश होतो. ती म्हणे, जेथें जेथें हें साधन, व्हिलच्या नानाविध निर्मातृत्वाची यथेष्ट लीला घडण्यापुरतें (जणुं काय ) प्रसृत करतां येईल, तेथें तेथें प्राण्यांच्या उत्तमा*-कृतीस सुखद असें उष्ण परिमाण साधतां येईल. ती आणखी असें ही म्हणे कीं, आमच्या पदार्थ विज्ञान्यांची अशी समजूत आहे कीं, पुष्पें व तृणादि प्रथमतः जे उत्पन्न झाले (मग त्यांचीं बीजें प्रकृतीच्या आद्यविक्षोभाच्या प्रसंगीं पृथ्वी पृष्ठावरून आलेलीं असोत, किंवा गुहेसारख्या पोकळीचा प्रथमतः जे आश्रय धरून राहिले, त्यांनीं समागमें आणलेलीं असोत ) ते त्या बीजांवर नित्य प्रकाश पडत गेला या प्रक्रियेनें, व उत्तरोत्तर त्यांच्या पेरणींत सुधारणा झाल्यानें. ती आणखी असें ही म्हणे कीं, व्हिलपासून प्रकाश प्राप्त होऊं लागल्यापासून, दुसऱ्या सर्व प्रकाशक वस्तू लुप्त होऊन, पुष्पांचा व पल्लवांच

---

* Highest forms of life.

वर्ण अधिक तेजःपुंज झाला आहे, आणि तृणादींच्या वाढींत अधिक विस्तार झाला आहे.

या बाबदींत विचार करण्याचें काम मजहून जे या कामीं अधिक निष्णात असतील त्यांजवर सोंपवून, व्हिल्ल्यांच्या भाषेसंबंधीं जे सुरस विषय आहेत त्यांजकडे थोडीशीं पानें खर्च घालूं.

---

## भाग १२ वा.

व्हिल्ल्यांची भाषा अद्वितीय मनोहर आहे, कारण, भाषा म्हणून जी आहे, तिच्या रूपाच्या पूर्णतेस येण्याकरितां जे तीन मुख्य विकार व्हावे लागतात, त्यांच्या अनुधारणा तिच्यांत फार स्पष्ट रीतीनें दर्शविल्या आहेत, असें मला वाटतें.

अर्वाचीन भाषाभिज्ञांत उत्तम विश्रुतांपैकीं एकानें, म्हणजे म्याक्स मुल्लर साहेबानें, भाषेच्या व पृथ्वीच्या थरांतील (स्तरांतील) साम्यते विषयीं उपपादन करतांना हें परम मत लिहून ठेविलें आहेः—"संधिस्तर व विग्रहस्तर या (स्तरांतून) थरांतून निसटून आल्यावांचून, एखाद्या भाषेंत विभक्त्यादि कार्यें आढळतील, हें कोणत्याही भाषेंत कोणत्याही प्रकारें शक्य नाहीं. निगूढ विग्रह स्तराशीं, मूळांनीं (धातूंनीं) अनुबद्ध झाल्यावांचून,

कोणत्याही भाषेंत विभक्त्यादि कार्यें होत नसतात."
(भाषास्तरीकरणाविषयीं ग्रंथ पृ. २० पहा.)

आद्य विग्रह स्तरांचें उत्तम व विद्यमान प्रतिरूप चिनी भाषेंत आहे. त्या भाषेंत मनुष्यानें आपण "पांगुळ गाड्याच्या आश्रयानें (अग्रसूत्रांनीं) चालण्याच्या स्थितींत असतां, मनाच्या स्नायूंशीं झटापट करून, रस्ता चाचपडत, पहिलीच उडी कृतार्थ करणारी झाल्याबद्दल आनंद मानून, पुनः पुनः तिचें संधान करीत असल्याप्रमाणें, हुबेहुब तसबीर दिसत आहे.*" तशीच, आपणांस व्हिल्ल्याच्या भाषेंत "निगूढ विग्रह स्तराशीं मूलांनीं (धातूंनीं) अनुबद्ध झाल्याचीं" आद्य विग्रहांची प्रमाणें आढळतात. तिच्यांत एकाक्षरी शब्द, जे भाषेचा मूलाधार होत, ते विपुल आहेत. संधिरूप विकारानें विक्षित जो अवधी गेला, तो अनेक युगें पर्यंत क्रमशः पुरवला असेल. त्या अवधींतील लिखित विद्यापुस्तकें कायतीं लाक्षणिक पुराणें, आणि कांहीं थोडींशीं चुटकेदार वाक्यें (जीं लोकप्रसिद्ध म्हणी झाल्या आहेत), यांत अवशिष्ट आहेत. व्हिल्ल्यांच्या उपलब्ध विद्यापुस्तकांत विभक्तिस्तरास आरंभ होतो. त्या काळीं, कांहीं अनुषंगिक कारणांची प्रक्रिया होऊन, कोणी प्रबल लोकांनीं जाती

---

* म्याक्स मुल्लर कृत भाषा स्तरीकरण पृ. १३

जातींचा संकर केल्यानें, आणि कांहीं एक विद्याविषयक थोर अद्भुत उत्पन्न झाल्यानें, त्यांची भाषा निरुद्ध व व्यवस्थित झाली असावी, यांत संशय नाहीं. जसजसा संयुक्त अवस्थेंत, विभक्त्यादि कार्यांचा प्रचार अधिकाधिक होत चालला, तसतशीं भाषातलाखालीं झांकलेलीं भाषेचीं आदि मूळें कितीतरीं झपाट्यानें सरसावत चाललीं, याचें आश्चर्य वाटतें. पूर्वगत अवस्थेंतील जुन्या अवशिष्टांत व म्हणींत ज्या एकाक्षरी शब्दांचीं तीं आदिमूळें झालीं आहेत, तीं अतिविस्तृत व मोठमोठाल्या शब्दांत अदृष्ट झालीं. व त्या शब्दांत सगळ्या वाक्याचा समावेश होऊं लागला. त्यांतील एक भाग दुसऱ्यांतून निराळा करतां येईनासा झाला, व त्याचा निराळा उपयोग करतां येईनासा झाला. परंतु विभक्त्यादि कार्यानें भाषेचें रूप जेव्हां तिच्यांतील पंडित व वैय्याकरणी तयार होण्या इतकें सरसावलें, तेव्हां त्यांनीं आदी रूपाचा स्वाहाकार करणारीं हीं असलीं बहुसंयोगात्मक व बव्हक्षरी विद्रूपें नाहींशीं करण्याविषयीं एकोपा केला असावा असें दिसतें. तीन अक्षरांहून अधिक अक्षरांचे शब्द अशिष्ट, म्हणून गाळीव, असें समजूं लागले. आणि ज्या प्रमाणानें भाषा अशा प्रकारें सोपी होत गेली, त्याच प्रमाणानें ती सत्वानें, प्रौढीनें व गोडीनें वाढत चालली. तिचा उच्चार जरी अगदीं संकुचित आहे, तरी त्या संकुचितपणानेंच तिला व्यक्तता प्राप्त झाली आहे. जें व्यक्त करून सांग-

ण्यास आपल्या या ऊर्ध्व लोकांतील सुधारलेल्या राष्ट्रांस कधीं कधीं अनेक अक्षरें, कधीं कधीं वाक्येंचीं वाक्यें म्हणावीं लागतात, तें एकाच अक्षरास अमुक एकस्थल देऊन ते समजावितात. एक दोन उदाहरणें देऊन हें अधिक स्पष्ट करतों. जसें आन ( याचा अर्थ मनुष्य ), आना (मनुष्यें). त्यांच्यांत सकाराचा अर्थ त्याच्या स्थाना अन्वयें समुच्चयवाची असतो. साना म्हणजे मनुष्यसमुच्चय (मनुष्य जाती ).आन्सा म्हणजे मनुष्यांचा समुदाय. कांहीं अक्षरांच्या उपसर्गावरून नेहमी त्यांत संयुक्त अर्थ असावयाचाच. जसें शब्दारंभीं ग्ल (हें त्यांच्यांत एक अक्षर आहे, जसें ग्रीक लोकांत th [थ] )असतां,तज्जातीय अगर भिन्नजातीय वस्तूंचा समुदाय अगर एकवटा असा अर्थ असतो. जसें "ऊन" म्हणजे घर, ग्लून म्हणजे शहर (म्हणजे घरांचा समुदाय). आटा म्हणजे दुःख; ग्लाटा म्हणजे सार्वजनिकसंकट. औरआन म्हणजे मनुष्याचें आरोग्य अगर कुशल.ग्लौरान म्हणजे राज्याचें स्वास्थ्य,समाजाचें हित. त्यांच्या तोंडीं हा शब्द फारच आहे. अग्लौरन हा शब्द त्यांजमध्यें राज्यतत्व जें मानतात त्याचा सूचक आहे, म्हणजे "सर्वांचें हित हें समाजाचें मुख्यतत्व होय." औब म्हणजे शोध. सिला हा एक गाण्यांतील स्वर आहे; ग्लौब सिला=ज्यांत शोधाच्या व गानांतील स्वराच्या बोधाचा समावेश आहे, हा त्यांच्यांत पद्याला संस्कृत शब्द होय, तो सामान्य

भाषणांत ग्लौक्स असा संक्षिप्त म्हणतात. "ना" हें ग्ल प्रमाणें एक अक्षर असून, आदिस्थानीं असतां, आरियन भाषेंतल्या "नक्" धातूचा अर्थ जसा क्षय होणें अगर नाश होणें, तसा जीवाला, हर्षाला अगर सुखाला विरोधी, असणें असा त्याचा नेहेमी अर्थ असतो. नाक्स म्हणजे अंधःकार. नार्ल=मृत्यु; नारिआ म्हणजे पाप अगर दुःख. नास= पापाची व दुःखाची अत्यंत पायरी-पूतता. लिहिण्यांत परमेश्वराचा उल्लेख कांहीं विशेष नांवानें करणें हें अनादराचें असें ते लेखतात. पिरमिदाकृती Λ गूढचिन्हानें त्याची संज्ञा ते करीत असतात. प्रार्थना करतानां ज्या नांवानें त्यास विनवितात, तें नांव इतकें पवित्र मानतात कीं, तें परक्यास कळवीत नाहींत. मला तें ठाऊक नाहीं. संभाषणांत साधारणतः सर्वभद्र असलें वहुपद-विशेषण ते वापरतात. V हें अक्षर पिरमिदाच्या विपर्यासाचें सूचक आहे. तें जेथें जेथें आरंभीं येतें तेथें तेथें प्रायशः श्रेष्ठता व सत्ता दर्शक असतें. जसें Vril व्हिल, ज्या विषयीं वर मी बरेंच लिहिलेलें आहे. Veed व्हीद म्हणजे अनश्वर आत्मा; (Veedya) व्हीद्या=अनश्वरता; कुम (याचा उच्चार वेल्सप्रांतीं Cwm याचा उच्चार केल्यासारखा ऱ्हस्व करतात) हा शब्द पोकळीच्या कांहीं एक वस्तूचा दर्शक आहे. कुम म्हणजेच गाढ शून्यता. लाक्षणिक त्याचा अर्थ विवर. कुमिन

म्हणजे भोंक. झिकुम म्हणजे दरी. कुमाझि, म्हणजे शून्यता अथवा पोकळी, बोध–कुम म्हणजे अज्ञान ( शब्दशः ज्ञान शून्यता ). कुमपोश हें त्यांच्यांत बहुसमाजाचें राज्य अथवा फार अज्ञानी अगर पोकळ लोकांचें प्राधान्य याचें नांव आहे. पोश याचा शब्दरूढीचा अर्थ इतर भाषेंत करतां येणें मुष्किल आहे. तो शब्द तिरस्कार दर्शक आहे असें पुढें वाचकास कळून येईल. त्याचा उपशब्द इंग्रजींतील हलक्या लोकांत Bosh ( बाश ) " छीः " म्हणतात तो होय. अर्थात्, कुम–पोश याचें जेमतेम भाषांतर म्हणजे "Hollow-bosh पोकळ-छीः" असलें होतें. पण जेव्हां प्रजा प्रभुत्व अथवा कुम-पोश याचा सामाजिक अज्ञाना पलीकडे जाऊन, त्याच्या लयाची अग्रसर जी सामाजिक तीव्रता अगर क्रूरता यांत अपकर्ष होतो,–जसें ( आपल्या वरील लोकांतून उदाहरणार्थ घेतां ) फ्रान्स देशांत "रेन आफ टेरर " म्हणजे ( संत्रस्त राज्यपद्धती ) अथवा आगस्टस राज्य पदारूढ होण्यापूर्वी रोमन रिपब्लिक (म्हणजे रोमचें प्रजा सत्ताक राज्य )–तेव्हां त्या वस्तुस्थितीस ते ग्लेकनास हें नाव देतात. (Ek ) एक म्हणजे भांडण. ग्लेक म्हणजे सार्वत्रिक भांडण. नास हें वर सांगीतलेंच आहे कीं पूततेचें अथवा दुर्गंधीचें नांव. तेव्हां ग्लेकनास याचा अर्थ सार्वत्रिक भांडण–दुर्गंधी. त्यांच्यांतील समास मोठे अर्थ सूचक

असतात. जसें बोध म्हणजे ज्ञान, आणि तू हा प्रत्यय सावधपणें सन्निध जाण्याची क्रिया हा अर्थ शर्दक असल्यानें तू-बोध हा शब्द ते तत्वज्ञानास योजतात. पाः हा तिरस्कारवाची उद्गार होय. तो इंग्रजींतील "stuff and nonsense" [ मसण माती, धूळधमासा ) या वाक्यरूढीशीं मिळता आहे. पाःबोध ( शब्दशः मसण मातीचें ज्ञान ) हा शब्द निष्फळ अगर खोट्या तत्वज्ञानाचा उपशब्द होय, तो ते पूर्वी आत्मविषयक व काल्पनिक वितर्कवाद करण्याचा जो प्रचार असे, म्हणजे ज्या प्रश्नांचीं उत्तरें देतांच यावयाचीं नाहींत व जे प्रश्न करण्यांत कांहीं हांशील नाहीं, त्यास लावीत. उदाहरणार्थ "मनुष्याच्या पायास चार अगर सहा बोटें नसून, पांचच हो कां असतात? सर्वभद्रानें जो प्रथम मनुष्य निर्माण केला, त्याच्या संततीस बोटांची जी संख्या असते, तितकीच त्या आदि पुरुषास होती कीं नाहीं? ज्या भावी स्थितींत मनुष्य आपल्या मित्रास ओळखील, त्या स्थितींत त्यास बोटें असतील कीं नाहीं? असतील म्हणाल, तर तीं आधिभौतीक कीं अध्यात्मिक?" हीं जीं पाःबोधाचीं उदाहरणें मी सांगीतलीं, तीं व्याजोक्तीनें अगर थट्टेनें घेतलीं आहेत असें नाहीं पण हेच प्रश्न त्या "शास्त्रांत" ४,०००वर्षां पूर्वीं जे आधुनिक व्युत्पन्न होऊन गेले त्यांच्या वादांचें विषय बनलेले होते.

माझ्या असें ऐकण्यांत आलें कीं, पूर्वी नामांच्या आठ

विभक्ती असत ( संस्कृत व्याकरणांतील विभक्तींहून एक अधिक ); परंतु कालवशात् या विभक्ती कमी होऊन, हे बदलणारे प्रत्यय जाऊन, त्यांच्या जागीं अर्थवाचक उपसर्ग वाढले आहेत. प्रस्तुत, ज्या व्याकरणावरून मी अभ्यास केला, त्यांत नामाला चार विभक्ती असतात. त्यांत तिहींस निरनिराळे प्रत्यय आहेत, व चौथीस भेद सूचक उपसर्ग असतो:—

| एकवचन. | | | अनेकवचन. | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रथमा, | आन | पुरुष | प्रथमा, | आना | पुरुष |
| चतुर्थी, | आनो | पुरुषाकारणें | चतुर्थी, | आनाँई | पुरुषांकारणें |
| द्वितीया, | आनम् | पुरुषास | द्वितीया, | आनंदा | पुरुषांस |
| संबोधन, | हिलआन | हे पुरुषा. | संबोधन, | हिलआनंदा | अहो पुरुषांनों. |

वरिष्ठ प्रतीच्या सविकारक ( विभक्त्यादि कार्यें ज्यांत आहेत त्या ) विद्यापुस्तकांत द्वितीय वचनाचीं रूपें उपलब्ध आहेत. परंतु तीं पुस्तकें लुप्त होऊन फार दिवस झाले. षष्ठी ( जनक ) विभक्ती ही त्यांच्यांत लुप्तप्रचार झाली आहे. तिचें स्थान चतुर्थीकडे आलें आहे. मनुष्याचें घर म्हणण्या ऐवजीं मनुष्याकारणें घर असें ते म्हणतात. ( कधीं-कधीं कवितेंतून ) जेव्हां षष्ठीचा उपयोग ते करितात, तेव्हां तिचा व प्रथमेचा प्रत्यय एकच असतो. त्या प्रमाणेंच पंचमीचें झालें आहे. तिचा दर्शक जो उपसर्ग अस-

तो, तो मर्जीनुरूप आदीं अगर अंतीं लावतात, व नामाच्या ध्वनी प्रमाणें कर्णास जें गोड लागेल त्या प्रमाणें प्रायशः त्याच्या स्थानाचा निर्णय होतो. हें लक्षांत आलेंच असेल कीं "हिल" हा उपसर्ग संबोधनास लावतात. घरांतील अतिपरिचित आप्तां खेरीज इतर सर्व प्रसंगीं दुसऱ्याशीं बोलतांना तो ते वापरीत असतात. तो गाळला म्हणजे अशिष्टत्व येतें. जसें इंग्रजी भाषेंतील जुन्या पद्धती प्रमाणें नुसतेंच "राजा!" हें म्हणणें अनादराचें गणीत असत, व "हे राजा!" असें संबोधन करणें सादरपूर्वक मानीत. वास्तवीक असें आहे कीं, त्यांच्यांत सन्मान दर्शक पदव्या नाहींतच, तेव्हां अहो हें संबोधन त्यांच्या जागीं लेखतात, व तें आवड निवड न करतां सर्वांस लावतात. हा हिल हा उपसर्ग ज्या शब्दांचा अर्थ दूर दूरचे पंथ असला असतो, त्याच्या रचनेंत घालीत असतात. जसें हिल्‌ऱ्या म्हणजे प्रवास करणें.

त्यांच्या क्रियापदांच्या रूपांत ( येथें या विषयाचा विचार करीत बसलें तर फारच विस्तार होईल ) "या" म्हणजे "जाणें" हें साहाय्य क्रियापद, संस्कृतांत जसें बहुतांशानें योजतात, त्या प्रमाणेंच दिसून, त्याच्या समतुल्य कामीं पडतें, जणू कीं कोण्या एक्या भाषेपासून या दोन्ही ही भाषा अवतीर्ण होऊन, त्यांतील हा सामान्य धातु असावा असें दिसतें. या खेरीज आणखी दुसरें एक साहा-

य्य क्रियापद वरच्याशीं विपरीत अर्थाचें त्याच्या समागमें असतें, व त्याच्याशीं श्रमविभाग करितें. तें कोणतें म्हणाल तर ङ्गि, म्हणजे थांबणें अगर थबकणें. "या" हें भविष्यकाळीं, आणि ङ्गि हें भूतकाळीं, ज्या सर्व क्रियापदांस साहाय्य क्रियापदें लागतात, त्यांत योजितात. याम्=मी जातों, यिआम्=मी जावें, यानि-या=मी जाईन ( शब्दशः मी जाण्यास जातों ) ङ्गाम पु-यान्- मी गेलों आहें ( शब्दशः गेलेला असल्यानें—मी थांबतों. ) या हा प्रत्यय असतां, तो सादृश्यें करून, प्रचलन, गती, प्रस्फोटन दर्शक असतो. ङ्गि अंतीं असतां, ज्या शब्दाशीं त्याचा संधी झाला असेल त्या प्रमाणें— चांगल्या अगर वाईट अर्थाची—स्थीरता दर्शवितो. इवा-ङ्गि=सनातन सौजन्य. नान- ङ्गि=अक्षय अरिष्ट. पु ( पासून ) हा उपसर्ग ज्या शब्दाचा अर्थ विराग, अथवा ज्या वस्तू पासून आपण पराङ्मुख असावें, असल्या शब्दाच्या आदीं योजितात. पु-प्रा=तिटकारा. पु- नारिआ=लबाडी, अतिनीच प्रकारचें अरिष्ट. पुश अथवा पोश याचें शब्दशः भाषांतर करणें मुष्किल आहे हें मी वर कबूल केलेंच आहें. करुणेचें मिश्रण ज्यांत नाहीं असें नसतें, त्या तिरस्काराचें व्यंजक हा शब्द आहे. या धातूची उत्पत्ती, ओष्ठांचा यत्न, व ज्या भावानें तो प्रेरित झाला त्याच्यांत जें अंतर्गत साधर्म्य आहे, त्या पासून झाली असावी असें दिसतें.

कारण, पु हा उच्चार असा आहे कीं, त्यांत कमी जास्ती वेगानें ओठावाटें श्वासाचा स्फोट होत असतो. याच्या उ-लट, झ जेव्हां आदिस्थानीं असतो तेव्हां त्याचा ध्वनी असा असतो कीं त्यानें श्वास आंत चोखला जातो. या प्रमाणें झु-ज्याचा झू असा उच्चार होतो-( तें त्यांच्या भाषेंत एक अक्षर आहे )-हें ज्या शब्दांचा अर्थ कांहीं एक वस्तू आकर्षिते, संतोष देते, अगर हृदयास भेदते, अ-सल्या अर्थवाची शब्दाच्या उपसर्ग स्थानीं असतें. झूमर= प्रेम करणारा; झूत्झे=प्रेम; झूझूलिआ=आनंद. वास्तवि-कच हा झचा आंत ओढलेल्या ध्वनी लाडिवाळपणास स्व-भावतःच युक्त आहे असें दिसतें. जसें इंग्रजी भाषेंत, आई आपल्या तान्ह्यास, व्याकरण गुंडाळून* म्हणत असते "झू डार्लिंग" "झू लाडक्या". आणि बोस्टन एथील एक विद्या गुरु ( प्रोफेसर ) आपल्या ( त्याचें लग्न हो-ऊन एकच महिना झाला होता ) पत्नीला 'झू लिटूल पेट' "झू, चिमुकले छबकडे" असें म्हणतांना मी ऐकलें आहे.

हा विषय पुरा करण्यापूर्वी एवढें सांगितलेंच पाहिजे कीं, याच जातीच्या निरनिराळ्या उपजातींनीं ज्या प्रा-कृत भाषांचा आदर केला आहे, त्यांत यत्किंचित फेर-बदल झाल्यानें मूळांतला अर्थ व ध्वनी यांचें माधुर्य संकुलित

---

* झू हें नाम धरलें तर विशेषणानंतर असावें, यांत व्याकरण सुटलें हा अभिप्राय.

होऊन विद्रूप झालें असतें. ह्रीनें मला मोठ्या क्रोधानें सांगितलें कीं ह्रूमर ( प्रेम करणारा—हा शब्द तिनें ज्या प्रकारें उच्चारला, त्यांत असें भासलें कीं जणु हृदयाच्या थेट तळीं तो उतरवीत नेत आहे—) ठिकाण्यापासून फार दूर नव्हेत अशा समाजांत असा अपभ्रंश पावला आहे कीं, अर्धवट सीत्कार, व अर्धवट अनुनासिक, व सर्वस्वी कर्णकटु Subber सूब्बर असा ध्वनी त्याचा झालेला आहे. मी मनांत म्हटलें, त्यांत u च्यापूर्वीं n हें घालण्याची उणीं आहे, तेवढें अक्षर घातलें म्हणजे इंग्रजी भाषेंत असल्या अर्थाचा शब्द तयार झाला असता* कीं कोण्याही प्रेमशील गाईला ( स्त्रीला ) आपल्या प्रियकरांत तो गुण असावयाची कधींच इच्छा न होती.

या भाषेंत, ज्याच्या योगें तिच्या उक्तिरूपांत सारखेंच सत्व व अल्पत्व प्राप्त होतें, असला आणखी एकच विशेष धर्म सांगूं.

आपणांप्रमाणें त्यांच्यांत अ हें वर्णमालेंतील आद्याक्षर आहे, त्याचा प्रसंगविशेषीं उपसर्गासारखा स्वतंत्र शब्द योजतात, तेव्हां प्रभुत्व, अगर मुख्यत्व, अथवा अभिमानी तत्व, असा संकीर्ण अर्थ असतो. उदाहरणार्थ, (Iva) इव्हा=सौजन्य; Diva दिव्हा=सौजन्य व सुख

---

* Subber यांतील u च्या पूर्वीं n घातला म्हणजे Snubber शब्द होतो; त्याचा अर्थ हृदयास टोंचण्या सारखें बोलणारा.

यांचा संयोग; अ–दिव्हा=यथार्थ व केवल सत्य जें तें. अ–ग्लौरन, या शब्दांत अर्चे महात्म्य किती आहे हें मी वर लिहिलेंच आहे. तसेंच व्हिल्यामध्यें (प्रस्तुतच्या सुधारणुकीची स्थिती त्या रसाच्या गुणामुळें आली आहे असें ते मानतात ) अ–व्हिल याचा अर्थ, वर सांगितल्याप्रमाणें, सुधारणा असाच आहे.

आरियन अथवा इंडो–जर्मनिक भाषांशीं व व्हिल्याच्या भाषेशीं किती सजातित्व आहे, हें भाषातत्वज्ञांस वर लिहिलेल्या वरून कळून येईलच; पण इतर सर्व भाषां प्रमाणें त्यांच्यांत देखील असे कांहीं शब्द व अशीं रूपें आहेत कीं तीं अगदीं विपरीत उगमांतून याच्यांत संचरलीं आहेत. फार कशाला, तूर हीच पदवी घ्या, ती ते आपला जो मुख्य न्यायाधीश असतो त्याला लावतात. तो शब्द टुरेनिअन भाषेशीं सजातीय अशा एका वाणींतून येऊन, त्याचा अर्थ चोरी असा आहे. ते स्वतःच म्हणतात कीं, हा परकीय शब्द असून, आमचे ( व्हिल्याचे ) पूर्वज बहुत कालापूर्वीं ज्या एका राष्ट्राशीं सलोखीनें होते, त्यांच्यांतील अधिपतीस लावीत असत, असें आमच्या ऐतिहासिक लेखावरून दिसतें, ( पण तें राष्ट्र लुप्त होऊन बहुत काल झाला, ) त्यांजपासून घेतलेला आहे. आणि ते असें म्हणतात कीं, व्हिल (चिद्विभूती )चा शोध लागल्यानंतर, जेव्हां त्यांनीं राज्यपद्धतीचीं पुनःसंस्था

केली, तेव्हां मुख्य न्यायाधिशाकारितां ही पदवी त्या नष्ट झालेल्या लोकांतून व त्या लुप्त भाषेंतून मुद्दामच घेतली. त्यांतील हेतू असा कीं, त्या हुद्यास लागणाऱ्या सर्व पदव्या टाळाव्या; कारण, त्या अधिकाराविषयीं कांहीं पूर्वगत साहचर्यें ( जुन्या समजुती ) असत.

माझी आयुर्मर्यादा अधिक असली तर, व्हिल्यामध्यें माझा निवास असतानां, या भाषेचें जें ज्ञान मी संपादिलें आहे, तें पद्धतवार रूपानें एकत्र करावें असें मी म्हणतों. परंतु जें वर लिहिलेलें आहे त्यावरून खरे जे भाषातत्वाभ्यासी आहेत, त्यांजला कळून येण्यास कदाचित बस आहे कीं, ज्या भाषेंत इतकी मूळची धातूंचीं रूपें कायम राहिलीं आहेत, व सन्निहित, पण क्षणिक जी बहुसंयोगिक अवस्था ती तिला आली असतां, तिचे अनेक भार चट सारे दूर करून, जिच्या अंत्य विभक्तीच्या रूपानें इतका सोपेपणा व परिमितता प्राप्त झाली आहे, तें असंख्यात युगांचें व नानाविध मनांच्या प्रकारांचें अल्पाल्पशः झालेलें कार्य असलें पाहिजे; तसेंच, त्या भाषेंत सजातीय लोकांत जो संकर झाला त्याचें प्रमाण असून, तो संकर, त्या मनस्वी विचारी लोकांस, जें स्वरूप तिला प्राप्त झाल्याची मी उदाहरणें दिलीं आहेत, तें मिळण्याकरितां अविश्रांत परिशीलन करण्याचें अगत्य पाडता झाला असावा, असें दाखवितो.

असें असतांनां ही, या भाषेंत जें विद्याभांडार लिहिलेलें आहे तें गतकालीन आहे, व प्रस्तुत जी परमसुखकर स्थिती आनांस प्राप्त झाली आहे, ती उत्तरोत्तर विद्येची अभिवृद्धि होण्यास, विशेषें करून काल्पनिक व ऐतिहासिक या दोन मुख्य विषयांची अभिवृद्धि होण्यास, प्रतिषेध करते आहे, हें दाखविण्याचा मला पुढें प्रसंग येईल.

---

## भाग १३.

ह्या लोकांत एक धर्म आहे, आणि त्याच्या विरुद्ध कांहीं जरी म्हटलें, तरी त्यांत हे विलक्षण विशेष गुण आहेत, १ ला. हा कीं जें ज्यांचें स्वीकृत मत आहे असें ते म्हणतात, त्यावर त्या सर्वांचा विश्वास असतो. २ रा. त्या स्वीकृत मतांत ज्या आज्ञा पाळल्या पाहिजेत असें सांगितलें असतें, त्याप्रमाणें ते आचरण करीत असतात. सृष्टीचा एकच जो स्रष्टा व पालन कर्ता आहे, त्याची आराधना केली पाहिजे असें त्यांचें एकमत आहे. सर्वव्यापि चिद्विभूती (व्हिल)चा हा एक विशेष धर्म आहे असा त्यांचा विश्वास आहे कीं, जीव मात्राला जी जी कृती करतां येते, ती ती कृती, ती चिद्विभूती, चेतनेचें व बुद्धीचें जें मूलस्थान त्यांत नेऊन पोंचविते. आणि ईश्वराविषयीं भावना स्वभावजन्यच असते असें जरी ते प्रपादीत नाहींत, तरी ते म्हणतात कीं, प्रकृतीचें

जें अवलोकन त्यांनीं केलेलें आहे त्यावरून, आन ( मनुष्य ) या प्राण्यास मात्र ती भावना अवधारण करण्याची योग्यता, व तिजपासून आविष्कृत होणाऱ्या विचार सरणीचा प्रसाद, प्राप्त झाला आहे. ही योग्यता हा जो विशेषाधिकार, तो कांहीं निरर्थक दिला नसेल आणि म्हणून दैविक जो स्रष्टा आहे त्याचा स्तव व धन्यवाद त्यास मान्य असून, मानवी प्राण्यांच्या परिपूर्ण विकासास अगत्याचा आहे. ते आपली उपासना जमलेल्या समाजांत व एकाकीं असतांना, अशी दोन्ही प्रकारें करतात. मी त्यांच्या जातीपैकीं नसल्यामुळें, ज्या इमारतींत अगर देवळांत सार्वजनिक उपासना होत असते, तींत माझा प्रवेश झाला नाहीं, पण मला असें कळलें आहे कीं, ही उपासना फारच थोडक्यांत होत असते, व त्या विधीसमवेत कांहींच अवडंबर नसतें. व्हिहूल्यांतील हें एक मत आहे कीं एकाग्र भक्ती अगर या वास्तविक प्रपंचांत फलद्रूप होण्यासारखी ध्यानैकाग्रता करणें, ती या मानवी मनानें एकाच पद्धतीनें फार वेळ टिकत नाहीं, त्यांत विशेषें करून समुदायांत तर तशी टिकतच नाहीं, आणि तसे टिकविण्याचे जे यत्न होतात, त्यांजपासून धर्मोन्माद तरी घडतो, अगर दांभिकपणा घडतो. जेव्हां ते एकांतांत प्रार्थना करतात, तेव्हां ते एकाकी असतात, अगर त्यांचीं लहान मुलें त्यांसमागमें असतात.

ते म्हणतात कीं, जुन्या काळांत, ईश्वराच्या गुणांविषयीं ज्यांत तर्क केलेले आहेत, व ज्यांत कोणत्या प्रकारचा विश्वास अगर आराधना त्यास मान्य आहे या विषयीं लिहिलेलें आहे, असे अनेक ग्रंथ होते, परंतु त्यांच्या योगानें असले दाहक व रागयुक्त विवाद झाले कीं समाजाची शांतता त्यांजपासून बिघडली; जीं घराणीं फारच एकोप्यानें असत तीं विभक्त झालीं; तसेंच, ईश्वराच्या गुणांविषयीं वादविवादांत, ईश्वराचें अस्तित्व या वाक्कलहांमुळें एकबाजूसच राहिलें, पण याहून निकृष्टतर हें कीं या मानवी वाद करणरांच्या मनोवृत्तिवैगुण्याचा ईश्वरावर आरोप होऊं लागला. याविषयीं माझे यजमान म्हणाले, " याचें कारण असें आहे कीं मनुष्यासारख्या सान्त प्राण्याला त्या अनन्ताचें लक्षण बांधणें अशक्यच; तेव्हां ईश्वराची भावना निश्चित करण्याचा जो तो यत्न करतो, त्यामुळें त्या ईश्वरास आपणाप्रमाणेंच मनुष्य बनवितो. " म्हणून, आलीकडील काळांत ईश्वर ज्ञानाविषयीं वितर्क जरी अगदीं निषिद्ध नाहींत, तरी त्यांना उत्तेजन मिळण्याचें इतकें कमी झालें आहे कीं, त्यांचा विलोप होत चालला आहे.

प्रस्तुत पेक्षां सुखतर व उत्कृष्ठ तर अशी आवस्था पुढें खचित येणार आहे, हा विश्वास सर्व व्हिूल्यांचा आहे. ( पूर्व संचिताप्रमाणें ) प्रतिफल व शासन ( सुखदुःख )

याविषयीं जें मत आहे त्याजबद्दल त्यांची समजुत फारच अनिश्चित आहे; याचें बीज कदाचित् असें असेल कीं, त्यांच्यामध्यें प्रतिफल देण्याची व शासन करण्याची रीतच नाहीं, कारण शासन करण्यास अपराधच नाहींत; आणि त्यांची नीति इतक्या समान योग्यतेस आली आहे कीं, ठोकताळ्यानें पहातां, एक मनुष्य ( आन ) दुसऱ्याहून अधिक गुणवान् आहे असें ते मानीत नसतात. यथा कथंचित् एक दुसऱ्याहून एका गुणांत अधिक असला, तर दुसरा आणखी एखाद्या गुणानें त्याहून अधिक असावयाचा; एखाद्यांत एखादा साधारण दोष असला, अगर वैगुण्य असलें, तर दुसऱ्यांत ही तसें असतेंच. वस्तुतः त्यांच्या व्यवहाराची अशी लोकोत्तर सरणी आहे व अधर्म करण्यास इतके थोडे मार्ग (लालची ) आहेत कीं, प्राणधारी आहेत हेंच ते त्यांची जी सौजन्याची समजुत आहे त्याप्रमाणें ते सुजन असण्याचें कारण आहे. एकदां प्राणप्रतिष्ठा झाली, मग ती उद्भिज कोटींत कां होईना, म्हणजे ती सतत चालू राहावयाची, अशी त्यांची एक मनःकल्पित समजुत आहे, तिजविषयीं पुढच्या भागांत वाचकांस कळून येईल.

---

## भाग १४.

परमेश्वराच्या गुणाविषयीं तर्क करण्यास जरी व्हि-

ल्या हे मी वर सांगितल्याप्रमाणें उत्तेजन देत नाहींत, तरी पापाच्या अस्तित्वाविषयीं ज्या मोठ्या प्रश्नानें उर्ध्व-लोकच्या तत्वज्ञानांत घोटाळा करून सोडला आहे, त्याचा उलगडा, कांहीं एक विश्वास सर्वांनीं मानून, ते करूं पाहतात. ते मानतात कीं, जेथें जेथें ईश्वरानें प्राण-प्रतिष्ठा केली आहे व त्या प्राणानें ग्रहण करण्याचे धर्म दि-लेले आहेत, मग ते कितीका अल्पसत्व असेनात, ( उदाहर-णार्थ एखाद्या रोपांतील प्राण ) तो प्राण कधींही नाश पावत नाहीं. तो नव्या व उन्नत रूपांत जातो, मग तीं रूपें याच ग्रहांत नसेनात कां; ( येथें तेवढें पुनर्जन्माविषयीं साधारण जें मत आहे त्यांत फरक होतो ); आणि जीव म्हणून ज्या वस्तूस आहे तिला स्वत्वाविषयीं नेहेमी बोध राह-तो. यामुळें गत जन्मांत व आगामी जन्मांत संबंध जो-डतां येऊन, आनंदाच्या परंपरेंत जी उत्तरोत्तर उन्नती होत असते तिचें त्याला ज्ञान असतें. "कारण," ते म्ह-णतात कीं, "हें गृहीत मानल्यावांचून, ज्या मानवी वि-चारणा शक्तीचा प्रसाद त्यांस प्राप्त झाला आहे, त्याप्रमा-णें पाहतां, परम न्यायता दिसून येत नाहीं, आणि ही परम न्यायता ही तर त्या सर्वज्ञ व सर्वभद्रा ( ईश्व-रा )चा घटक गुण असला पाहिजे." ते म्हणतात, अन्याय काय तो तीन कारणांपासून उत्पन्न होतोः—न्याय काय

* पृथ्वी.

हें समजण्या इतक्या शहाणपणाची न्यूनता; त्याविषयीं वांछा करण्या इतक्या उदारतेची न्यूनता, व तो साधण्या इतक्या बलाची न्यूनता. आणि तिन्ही न्यूनतेपैकीं प्रत्येक न्यूनता ही जो सर्वज्ञ, सर्वभद्र आणि सर्वशक्ती परमेश्वर त्यांत असणें हें असंगत आहे. पण परमेश्वराचें शहाणपण, उदारता व बल हीं जरी याच जन्मांत आपणाकडून कबूल करणें अवश्य असण्या इतकीं व्यक्त आहेत, तरी या गुणांपासून निष्पन्न होणारा जो अवश्यभावी न्याय, त्याला दुसऱ्या जन्माची सर्वथा अपेक्षा असते. ती केवळ मनुष्यासच असते, असें नाहीं तर निकृष्ट जातीच्या प्राणवान् वस्तुमात्रास ही असते. जीवसृष्टी व उद्भिजसृष्टी या दोन्हींत असेंच आपण पाहतों कीं एक व्यक्ती त्याच्या शेजाऱ्याशीं ताडून पाहतां, त्याच्या सत्ते पलीकडील कारणामुळें, अत्यंत दीन होते— पहिली दुसऱ्याचें आमिष म्हणूनच जणु जीव धरून असते.* एक रोप ध्याना, तें रोगानें ग्रस्त होऊन अकालीं नाश पावतें; त्याच्या शेजारीं जें दुसरें असतें, तें आपल्यांतील जीवाचा आनंद मानीत, वेदना विरहित, आपलें आयुष्य निश्चित क्रमित असतें. कोणी म्हणतात कीं, परमेश्वर हा सामान्य नियमांनीं वागतो, आणि त्या मुळें त्याचीं जीं उपकारणें आहेत तीं इतकीं बलवान् बनतात कीं, आदिकारण जो

---

* जीवो जीवस्य जीवनं.

परमात्मा त्याची सारभूत कृपा त्या उपकारणां मुळें लोप पावल्ये. पण हें मानवी वैगुण्यांतून घेतलेलें सादृश्य भ्रांति मूलक आहे. त्या सर्वमंगल परमात्म्याविषयीं याहूनही नीचतर व अनभिज्ञतर समजूत अशी आहे कीं, त्यानें कोटिशः रूपांत जो प्राण संचार केला आहे, त्या प्राण्यांस न्याया विषयीं विचार करा असें म्हटलें म्हणजे संक्षिप्त रीतिनें तिरस्कार करून, झिडकारून टाकावयाचें, आणि असें ग्रहण करावयाचें कीं न्याय हा केवल त्यानें निर्मिलेल्या (आन) मनुष्य या एकत्याच प्राण्यास योग्य आहे. त्या ईश्वरी प्राणदात्याच्या दृष्टीला कांहींच लहान नाहीं व मोठें नाहीं; पण एवढें एकदां कबूल केलें कीं कोणतीही वस्तु कितीही क्षुद्र असली, तरी तिला आपल्या प्राणा विषयीं व दुःखा विषयीं बोध जर असला तर ती नाश होणें शक्य नाहीं, म्हणजे मग या जन्मा पासून दुसऱ्या रूपांत संचार होई तों पावेतों जीं सर्व दुःखें होतात, तीं सनातनत्वाशीं तुलना केल्यानें इतकीं अल्प दिसतात कीं, मनुष्याच्या सर्व आयुष्याची तुलना नुकत्याच उपजलेल्या मुलाच्या एका टयांहांशीं केली तर त्यांतही तितकी अल्पता नाहीं. तसेंच असें एकदां मानलें कीं, ही जीवमान वस्तु आपल्या स्वत्वाचा बोध इतर रूपांत संचार झाल्यावर देखील धारीत असते ( त्या बोधा वांचून आगामी जन्मा विषयीं सावधान असणें शक्यच नाहीं ) म्हणजे जरी ईश्व-

री न्यायाची पूर्तता झाली कीं नाहीं हें आपल्या दृष्टी आगळें आहे, तरी असें मानण्याचा आपणांस हक्क आहे कीं, तो न्याय समान रूप व सार्वत्रिक असावा आणि भेदरूप व एक देशीय नसावा; ( जर सामान्य उपनियमांप्रमाणें वागणें होतें तर तसा भेदरूपी व एक देशीय न्याय असता. ) कारण, हा इतका संपूर्ण न्याय अवधारण करण्या पुरती ज्ञानाची पूर्णता, वांछा करण्या पुरती वात्सल्याची पूर्णता, व तो सर्वांस प्राप्त होईल असें करण्या इतकी शक्तीची पूर्णता, यां पासून अवश्यंकरून उत्पन्न होतो.

हा हिंदूल्यांचा जो विश्वास सांगीतला, तो कितीही विलक्षण असला, तरी राज्य शासन शास्त्राप्रमाणें पाहतां, ज्या राज्य पद्धती त्यांच्यांत चालू आहेत, व ज्यांत संपत्तीनुरूप निरनिराळ्या कोट्या जरी मानल्या जातात तरी प्रतिष्ठेत पूर्ण समानता, सर्व संसर्गांत आणि संघट्टणांत मनस्वी मार्दव ,व समाजाच्या कल्याणा करितां ज्यांस मारून टाकणें अवश्य नाहीं अशा सर्व जीवमान वस्तूं विषयीं सदयता, संस्थित झाली आहे, त्या पद्धती दृढ होण्यास हा विश्वास किंबहुना साधनी भूत होतो. आणि त्यांच्यांत अशी एक समजूत आहे कीं दुखावलेल्या प्राण्यास अगर चिरडलेल्या फुलास, दुखविणारा कडून व चिरडणारा कडून पारितोषिक मिळालें पाहिजे, ती आपणांपैकीं कांहीं जणांस जरी मोठें

मनस्वीच अयुक्तिक असें त्याचें मनोलौल्य दिसलें, तरी तें अपकारशील तरी निदान नसतें. आणि पृथ्वीच्या पोटीं, जेथें प्राकृतिक तारागणांचा एक देखील रश्मि प्रकाश पाडता झाला नाहीं, त्याठिकाणीं जगत्कर्त्याच्या अवर्णनीय सौजन्याविषयीं इतका तेजोमय विश्वास असावा, हा विचार करावयास लागलेंच तर, असंतोष देणारा विषय नव्हे. कोण तरी त्यांची ती निश्चल कल्पना कीं, ज्या सामान्य नियमानें ईश्वर कार्यें घडवितो, त्यांत एकदेशीय अन्याय अगर पाप असावयाचेंच नाहीं; आणि म्हणून ते नियम, जीं कार्यें सर्व महाकाशावर घडतात व सर्व कालीं घडत असतात, त्या सर्वांचा निर्देश झाल्या खेरीज समजणारच नाहींत. आणि या भूगर्भगत लोकांच्या मानसिक अवस्थांत व सामाजिक पद्धतींत, ज्याअर्थीं मोठमोठ्या व सकृद्दर्शनीं विरोधी दिसणाऱ्या अशा तत्वज्ञानविषयक मतांच्या अनेक प्रकारांचा, आणि या उर्ध्वलोकीं चिंतकांनीं अगर असंभवकल्पकांनीं वेळोवेळीं उपस्थित केलेल्या, विवाद केलेल्या, झिटकारलेल्या व पुनः उपलब्ध झालेल्या वितर्कांचा समावेश होतो आहे व मेळ पडतो आहे, असें पुढें मला दाखविण्याचा प्रसंग येईल, त्या अर्थीं हा व्हिल्यांचा जो विश्वास मी सांगीतला, कीं आत्मबोधवान् अगर सचेतन जीव एकदां प्राप्त झाला म्हणजे तो मनुष्यांत, तसाच नीच प्राण्यांत, अविनाशी असतो—त्याची प-

रिसमाप्ती करणें ती व्हिल्यांच्या आचाराविषयीं मला जें आठवत होतें, त्याचें कागदीं टिपण करण्यानंतर (त्या टिपणाची हल्लीं सुव्यवस्था लाविली आहे, व त्यास आकार दिला आहे) बहुत वर्षांनीं त्या विख्यात जीवादि शास्त्रवेत्त्या, लुईस आगाझिझ, याच्या पुस्तकापैकीं शब्द-चतुर असा एक उतारा जो माझ्या नुकाच पाहण्यांत आला आहे, तो देणें कदाचित युक्त आहे, व तसें करून हा भाग आटोपूं. तो म्हणतोः—"प्राण्याच्या व्यक्तिमात्रांत जे परस्पर संबंध असतात, ते अशा प्रकारचे असतात कीं, कोणताही निर्मित प्राणी अस्तित्वांत येतो तो बुद्धियुक्त व विचारशील अशा मनाच्या प्रत्यक्ष मध्यस्थ्यतेवांचून इतर निर्मातृत्वानें उपजणें शक्य नाहीं याचें विपुल प्रमाण आहे, असें फार काळापूर्वीं मानलें गेलें पाहिजे होतें. मनुष्यांस जें चैतन्य, त्यांतील उत्कटतेमुळें व श्रेष्ठ गुणांमुळें, इतर प्राण्याहून अनेकशः वरिष्ठ पद देतें, त्याजसारख्याच एका निरवयव चैतन्याचें अस्तित्व प्रत्येक प्राणिमात्रांत असावें. याचें वर सांगितलेली मध्यस्थता ही बलवत्तर प्रमाण आहे. निरवयव खरें, पण तें असतें हें निःसंशय आहे. मग त्याला तुम्ही बुद्धि म्हणा, अथवा विवेक म्हणा किंवा उपजत बुद्धि म्हणा. तें चैतन्य निर्मित प्राण्यांच्या अवघ्या वर्गांत एकमेकांशीं सन्निकृष्ट ग्रथित अशी दर्शनांच्या पंक्तीच्या पंक्ती उत्पन्न करतें. आणि

त्याजपासून मनाच्या विशिष्टतर आविष्करणांची उत्पत्ती असते इतकेंच नाहीं, तर प्रत्येक घटकावयवांत जी जातिविशिष्ट लक्षणाची शाश्वतता असते त्यांतील भेदाचें मूल त्यांतच असतें. मनुष्याच्या (आत्म्याच्या) अमरत्वास अनुकूल अशा ज्या कोट्या आहेत, त्यांतील प्रायशः सर्व कोट्या इतर जीवमान प्राण्यांतील हें जें चैतन्य आहे त्याच्या शाश्वततेला सारख्याच लागू आहेत. आणि ज्या आगामी जन्मांत, मनुष्यास इंद्रिय विशिष्ट सृष्टीच्या एकतानतेचा विचार, हा जो सौख्याचा व बुद्धिविषयक व नीतिविषयक उन्नतीचा उगम, तो लुप्त होणार ही त्या आगामी जन्मांत एक शोचनीय हानी त्यास होणार हें मी सांगूं नको काय? तसेंच, एकीभूत झालेल्या सर्व लोकांचे व त्यांतील सर्व निवासस्थांचें त्यांच्या स्वच्छापुढें आध्यात्मिक संगीत होणार आहे ही स्वर्ग सुखाची परमोत्कट भावना होय असें आपण मानूं नये काय?" वर्गीकरणाविषयीं निबंध, भाग १७–पृ. ९७–९९

---

## भाग १५ वा.

या कुटुंबपरिवारांत मजवर सर्व प्रेम करीत हें तर खरेंच, पण त्यांतून ही आमच्या यजमानाची तरुण मुलगी आपल्या प्रेमानें मजविषयीं सर्वांहून फारच आदर व विचार दर्शवीत असे. तिच्या सूचनेवरून, मी उर्ध्वलोकां-

तून ज्या वस्त्रांनिशीं त्यांच्यांत उतरलों होतों, तीं सोडून, ठिहूल्यांचा पोषाख पतकरला, पण ज्या कृत्रिम पंखांचें ते पदाति असतां त्यांस सुबक आच्छादन शोभत असे, ते मात्र मी लावूं लागलों नाहीं. परंतु या वर्जनामुळें, माझ्यांत व ज्या जातींत मी संचार करीत होतों त्यांच्यांत, लक्ष्यांत येण्याजोगा भेद होत नसे, कारण ठिहूल्यांपैकीं बहुत लोक नागरिक व्यवसायांत असतां, हे पंख घालीत नसत. यामुळें असुखकर जिज्ञासा त्यांत उत्पन्न न करतां, मला शहरांत जातां येत असे. मी उर्ध्वलोकांतून आलेला आहें, अशी कुटुंब परिवारांत कोणास ही शंका आली नाहीं. ते समजत कीं हा कोणी नीच व रानटी जातीपैकीं असून, आफ-लिन हे आपला पाहुणा म्हणून त्याचें आतिथ्य करीत आहेत.

सभोंवारच्या प्रदेशाच्या मानानें पाहतां, हें शहर मोठें होतें. तो प्रदेश म्हणजे एखाद्या इंग्रजी अगर हंगेरिअन सरदाराच्या इस्टेटाहून अधिक विस्तीर्ण होता असें नाहीं. पण तो समग्र थेट ज्या खडकापर्यंत त्याची सीमा मानीत, त्याच्या पायथ्यापर्यंत तुकडान् तुकडा पेरून काढला होता. जीं निरुपद्रव जनावरें घरगुती उपयोगाकरितां नव्हे तर उगीच त्यांनीं पाळलेलीं होतीं त्यांच्या उपजीविकेकरितां जे डोंगराचे गुरचरणीचे भाग त्यांनीं दयार्द्र होऊन नेमून टाकलेले होते त्यावर काय ती

पेरणी झालेली नव्हती. या दीन जीवांविषयीं ते इतकें प्रेम वाळगतात कीं, त्यांच्या जन्मभूमींत जी गुरचरणी त्यांस लावून दिलेली असते, तिजवर निर्वाहा न होण्या इतकी त्यांची संख्या वाढतांच, ज्या व्हिूल्यांच्या इतर समाजांची ( मुख्यत्वें नव्या वसाहतींत ) त्यांस घेऊन जाण्याची खुषी असेल त्यांजकडे पोंहोचविण्याकरितां सार्वत्रिक (सरकारी) खजिन्यांतून कांहीं रकम खर्ची घालितात. पण या जनावरांची संतती आपल्या सृष्टींत ( मांस मिळण्यासाठीं ) संहार करण्याकरितां जीं जनावरें उत्पन्न करितात त्यांच्या वाढीशीं तुलना करण्याइतक्या प्रमाणानें वाढत नाहीं. हा सृष्टींतील नियमच दिसतो कीं, मनुष्यास जीं जनावरें उपयोगी नाहींत तीं मनुष्यांनीं व्यापिलेल्या प्रदेशांतून उत्तरोत्तर पीछेहाट करतात, अथवा किंबहुना नष्ट होतात. ज्या अनेक प्रमुख संस्थानांतून व्हिूल्यांच्या जातीची वस्ती पसरली आहे, त्यांतही एक जुनाट रीतच पडली आहे कीं, प्रत्येक संस्थानाच्या दरम्यान मध्यस्थ एक बिन पेरलेला जमीनीचा भाग सीमा—भूमी म्हणून सोडावयाचा. ज्या समाजाविषयीं मी हें वर्णन लिहिलें आहे, त्यांची ही सीमा—भूमी एक अबडधोबड खडकाचा कडा होता. त्यावरून पायांनीं जात येत नसे. पण तेथील रहिवाशांच्या पंखांनिशीं, अगर ज्या विमानाविषयीं मी पुढें लिहिणार आहें, त्यांच्यायोगें, ओलांडून जाणें

सुलभ होतें. त्यांतून (व्हील) चिह्नभूतीनें चालणाऱ्या वहनांस जाण्याकरितां रस्ते फोडून काढले होते. हे परस्पर व्यवहाराचे मार्ग नेहमी प्रकाशित असत, आणि त्यांस प्रकाशित करण्याचा खर्च भागण्याकरितां एक विशेष कर घेत असत, त्यास व्हील्या संज्ञाधारक सर्व समाज निश्चित प्रमाणानें वर्गणी देत. या योगें जवळच्या व दूरच्या संस्थानांत व्यापार संबंधी घडामोड बरीच घडत असे. या विशेष समाजाची अतिरक्त दौलत मुख्यत्वें कृषिकर्म संबंधीं असे. या समाजाचा कृषि विद्येच्या कलेस लागणारी सामुग्री तयार करण्यांत कौशल्याचा ही बाणा असे. असल्या सामुग्रीच्या मोबदल्यांत ते आवश्य लागणाऱ्या पेक्षां चैनीचे पदार्थ अधिक मिळवितात. आयात मालापैकीं ज्या पक्ष्यांस इतरांसमवेत कर्णमधुर ताना मारण्यास शिकविलें असेल त्यांस जी ते किंमत देतात त्याहून अधिक किंमत थोडक्याच पदार्थांस देत असतील. हे पक्षी फार अंतरावरून आणितात, आणि त्यांचें गायनाचें व पिसाऱ्याचें सौंदर्य विस्मयकारक असतें. माझ्या समजण्यांत असें आलें कीं, त्यांचे उत्पन्न करणारे व शिकविणारे हे निवड करण्यांत विलक्षण सावधगिरी ठेवतात, आणि गेल्या थोड्या वर्षांत त्यांच्या अवलादींत अद्भुत सुधारणा झाली आहे. या खेरीज इतर आवडीचीं जनावरें या मंडळींत दिसलीं

नाहींत; परंतु स्थल–जल चर जातीचे एक मोठ्या गमतीचे व खिलाडू प्राणी, बेडकासारखे दिसणारे पण मनस्वी चलाख चेहेऱ्याचे, असत त्यांचा मुलांस फार नाद असे, व त्यांस ते आपल्या खासगी बागांत ठेवीत असत. आपणांतील कुऱ्यांप्रमाणें अगर घोड्यांप्रमाणें त्यांत प्राणी नसतात असें दिसलें, पण ती विद्वान पदार्थशास्त्रज्ञ स्त्री मला म्हणाली कीं, असले प्राणी कोणे एकेकाळीं या प्रांतीं उपलब्ध असत, पण आतां ते व्हिूल्याहून इतर जातीची ज्या ठिकाणीं वसाहत आहे तेथें आढळतात. ती म्हणाली "व्हिूलचा शोध लागल्यापासून ते प्राणी या सुधारलेल्या लोकांतून उत्तरोत्तर नाहींसे झाले आहेत, आणि ह्या शोधाच्या सिद्धीनें त्यांच्या उपयोगाचें प्रयोजन राहिलें नाहीं. यंत्रसामुग्री व पंखाचा शोध यामुळें घोड्याचा ( धुरी ) वहनासारखा उपयोग विलुप्त झाला; आणि व्हिूल्या यांचे पूर्वज ज्या काळीं आपल्याच जातीकडून अतिक्रम होण्याचें भय बाळगीत असत अगर हलक्या प्राण्यांची भक्ष्याकरितां म्हणून शिकार करीत असत, तेव्हां जशी संरक्षणाकरितां अथवा शिकारीकरितां कुऱ्याची जरूर लागत असे तशी आतां त्यांची गरज लागत नसते." वास्तवीकच आहे कीं हा मुलुख, घोड्याच्या संबंधानें पाहतां, इतका खडकाळ होता कीं, तेथें त्याच्याशीं विलास करणें अगर वहनासारखा घो-

ज्याचा उपयोग होणें मुष्किल होतें. ज्या एकाच प्राण्याचा वहन नेण्याआणण्याच्या कामीं ते उपयोग करितात, तो एक जातीचा मोठ्या पिंडाचा बकरा आहे. त्यास ते शेतींत फार कामास लावतात. या प्रांतींच्या असमंताद्भागीं जी जमीन आहे तिच्या प्रकारावरून प्रथमतः पंखाचा आणि आकाशगामी नौकेचा शोध सूचित झाला असावा, असें म्हटलें तरी चालेल. ज्या जानपद प्रदेशावर शहर वसलें आहे, त्याच्या प्रमाणानें प्रदेशाचा जो मोठा विस्तार खुला राहिला आहे तो प्रत्येक घरा सभोंवती निराळा बगीचा असावयाचाच, या चालीमुळें राहिला आहे. ज्या रुंद राजमार्गावर आफ-लिन हे राहत असत, त्याचा पुढें एक विस्तीर्ण चौक बनला होता. त्यांत पंडितांची पाठशाला व सर्व सार्वजनिक (सरकारी) कचेऱ्या असत, व मध्यभागीं त्या तेजोमयी प्रवाही पदार्थाचा एक मोठा हौद असे. त्यास मी नगतेल म्हणतों, पण त्याचें खरें नाव मला माहीत नाहीं. या सगळ्या सार्वजनीक इमारतींत हें एक सर्वसामान्य लक्षण असे कीं, त्या भल्लच्या भक्कम आणि भरींव दिसत. त्यांस पाहून मला *मार्टिन याच्या शिल्पाच्या चित्रांची आठवण झाली. प्रत्येकाच्या वरच्या मजल्यास जोडलेला एक सज्जा किंवहुना गच्ची केलेला बाग असे, त्याच्या खालीं आ-

* John Martin—English Painter, 1754.

धाराकरितां खांब दिलेले असत; वर फुललेल्या पुष्पांच्या कुंड्या ठेवून त्यांत नानाप्रकारचीं पाळलेलीं पाखरें विहार करीत असत. या चौकांतून अनेक रस्ते निघत ते सर्व रुंद व लख्ख प्रकाशलेले असत व दोन्ही बाजूच्या उंचवट्यावर जात. गावांत पर्यटण करण्यास मला कधीं ही एकटें जाऊं देत नसत; आफ–लिन अगर त्यांची मुलगी मजबरोबर सोबतीस बहुधां येत. या समाजांत प्रौढवयास आलेल्या गाई (स्त्री) बरोबर कोणीही भलता आन (पुरुष) अशा सलोख्यानें चालतांना दृष्टीस पडतो कीं त्यांत जणुं जातिभेद नाहींच.

किरकोळ विक्रीचीं दुकानें फारशीं नाहींत. गिऱ्हाइकास माल देण्यास जे चाकर असतात, तीं सर्व निरनिराळ्या वयाचीं मुलें असतात. तीं मनस्वी बुद्धिमान व सभ्य असतात, पण पदार्थ घ्याच असा आग्रह करण्याचें अगर हांजी हांजी करण्याचें त्यांच्याकडून लेशभर देखील होणें नाहीं. दुकानदार कधीं हजर असतो अगर नसतो. असलाच तर, आपल्या धंद्यासंबंधीं एखाद्या कामांत गुंतलेला असणें विरळा. असें असतांही त्यानें जो धंदा पतकरलेला असतो तो त्या धंद्याची विशेष अभिरुची म्हणून पतकरलेला असे, आणि त्याची संपत्तीची प्रायीक साधनें असत त्याजशीं त्या धंद्याचा अर्थाअर्थी संबंध नसे.

या समाजांतल्या कांहीं विपुल धनसमृद्धांनीं अस-

ली दुकानदारी पतकरली असे. पूर्वी मी सांगितलेंच आहे कीं दरजांत न्यूनाधिक्य भाव मानला जात नसे, आणि म्हणून सर्व धंदे करणारांची सामाजिक योग्यता सारखीच असे. एका अना जवळून मी आपले जोडे विकत घेतले, तो तूर अथवा मुख्य न्यायाधीश या अधिकाऱ्याचा भाऊ होता; आणि त्याचें दुकान जरी ब्रॉडस्ट्रीट अगर ब्रॉडवे (हीं लंडन शहरांतल्या रस्त्यांचीं नावें आहेत) एथील एखाद्या बूट विकणाऱ्याच्या दुकानाहून मोठें होतें, तरी तो राजवाड्यांत राहणाऱ्या त्या (तूर) न्यायाधिशाच्या दुपटीनें श्रीमंत होता असें म्हणत. तथापि त्याला (शहरापासून अंतरांवर मोकळ्या हवेवर) वतनवाडी असे यांत कांहीं संशय नाहीं.

एकंदरींत, या समाजांतले आना (पुरुष) हे बाल्यावस्थेच्या सोद्योगी वया नंतर, एक आळशी प्राण्यांचा समूह बनलेले असतात. स्वभाव प्रवृत्तीमुळें म्हणा किंवा विज्ञानतः म्हणा, ते विश्रांती हें आयुष्यांतील परम सुखांतील एक सुख असें मानतात. वास्तवीकच आहे कीं, लोभ अगर ऐश्वर्याकांक्षा हीं जीं उद्योगाचीं प्रवर्तकें आहेत, तीं मानवी प्राण्यापासून काढून घेतलीं तर त्यानें स्वस्थ असावें यांत आश्चर्य नाहीं.

सामान्य गतींत, पंखाहून आपल्या पायांचा उपयोग करण्याचें त्यांस अधीक पसंत असतें, पण त्यांच्या क्री-

ऱ्हेंत अथवा त्यांच्या लोकांसमक्ष होणाऱ्या ( संज्ञांचा साहसिकी अनन्योपयोग केला तर ) विहारांत ते पंखाचा उपयोग करतात. तसेंच, वर वर्णिलेल्या आकाशांतील नृत्यांत व शहराबाहेरील प्रदेशांत जे त्यांचे वाडे प्रायशः उंच उंच प्रदेशावर असतात, तेथें जातांना ते पंखांचा उपयोग करतात. आणि तरुणावस्थेंत आहेत तों आनांच्या इतरत्र प्रदेशांत प्रवास करतांना वाहक यानाहून पंखांनीं जाण्याचें त्यांस अधिक पसंत असतें.

उड्डाण करण्याची जे आपणास संवय लावून घेतात ते, कांहीं पक्ष्यांहून कांहीं कमी वेगानें खरें, पण एका कलाखांत पंचवीस पासून तीस मैल पावेतों उडूं शकतात. आणि हा वेग एकेका प्रसंगीं पांच अगर सहा कलाख पर्यंत सारखा चालवितात. परंतु सामान्यतः आना हे वयाच्या मध्यमावस्थेस प्राप्त झाल्यावर, ज्या तीव्र गतींत प्रचंड परिश्रम होतात, तसल्या गतीचे शोकी राहत नाहींत. आपणांतील वैद्यांस जें निःसंशय पसंत पडेल असें त्यांच्यांत एक मत आहे कीं, आरोग्य साधण्याकरितां त्वचेच्या छिद्रांतून नियमानें घाण निघून जाणें आवश्य आहे; आणि या कारणास्तवच ते कदाचित् घाम आणणाऱ्या खोलींत स्नान करीत असतात, त्यास इंग्रजींत कोणी

†"टर्किश अथवा रोमनबाथ" असें म्हणतात. व त्या स्नानानंतर सुगंधित पाण्याचा वर्षाव करून घेत असतात. कांहीं सुवासांच्या आरोग्यकर गुणांविषयीं त्यांच्यांत पूर्ण भरंसा आहे.

त्यांच्यांत अशीही चाल आहे कीं कांहीं ठरीवलेल्या पण क्वचित् प्रसंगीं—प्रकृती साफ असली तर कदाचित् एकावर्षांतून चारदां,—व्हिनूलानें भरलेल्या स्नानागाराचा उपयोग करावयाचा. * हा प्रवाही पदार्थ नेमस्त पणानें योजिला तर आयुः सत्वाचें संवर्धन करणारा आहे; पण प्रकृतीच्या सामान्य स्थितींत असतां त्याचा फाजील उपयोग केला तर अपकार घडून जीवशक्ती निःसत्व करतो. असें असूनही त्यांच्या बहुतेक सर्व रोगांच्या चिकित्सेंत, रोग-

---

† टर्किश अथवा रोमनबाथ घेण्याकरितां एक खोली केलेली असते, तेथें शरीरावरील सर्व कपडे काढून पाण्याच्या नळीच्या अखेरीस लावलेल्या फवाऱ्याखालीं बसून स्नान करितां येतें, अगर टाक्यांत ऊन पाणी घालून तें नळीवाटें फवाऱ्यानें आंगावर घेतां येतें व खोलींत वारा बंद असल्यानें या स्नानापासून घाम निघूं लागतो, व सुख होतें.

* मी एकदां व्हिनूलानें भरलेल्या स्नानागारांत जाऊन प्रतीती पाहिली. त्या स्नानागारांत बलोद्दीपन करण्याचें सामर्थ्य गास्टीन येथील स्नानागारांशी अगदीं समतुल्य असतें. या गास्टीनच्या स्नानागाराचे गुण अनेक वैद्यांच्यामतें विद्युतापासून उत्पन्न आहेत; त्याच्याशीं व्हिनूल स्नानागार हें समतुल्य खरें पण व्हिनूल स्नानागारापासून जो गुण होतो तो अधिक कालपावेतों टिकतो.

शमनार्थ ते स्वभावधर्मास मुख्य सहाय्य म्हणून त्याची योजना करितात.

. ते आपापल्या परी मनस्वी चैनी लोक आहेत. पण त्यांच्या सर्व चैनी निर्दोष असतात. ते गानाच्या व सुगंधाच्या अंतरिक्षांत राहतात म्हटलें तरी चालेल. प्रत्येक जागीं त्या त्या स्थलाचीं सुस्वर नाद उत्पन्न करणारीं कलेचीं साधनें असावयाचीं; त्यांचा आवाज प्रायशः मृदुनाद निघेल अशी कळ उतरवून ठेवावयाचा. जणुं कोणी अदृश्य देवता मंजुळ व हळु हळु शब्द करीत आहेत. हा नाद त्यांच्या इतका संवयींतला झालेला आहे कीं, संभाषण करण्यास अगर एकाकी असतां विचार करण्यास त्यामुळें अंतराय होत नसतो. पण त्यांच्यांत अशी एक समजुत आहे कीं, ज्या हवेंत निरंतर सुस्वर आणि सुगंध भरलेले असतात, तिच्यांत श्वासोच्छ्वास केला असतां तिजमुळें शीलघटनेंत व विचारक्रमांत अवश्यमेव जो परिणाम घडून येतो, तो जितका सुखद असतो तितकाच उन्नतीप्रत नेणारा असतो. इतके संयमशील असून दुधावांचून इतर जीव—जनित आहार व कैफ आणणारीं पानें सर्वस्वी वर्ज्य केलेलीं असतां ही, ते आपल्या खाण्या पिण्यांत पराकाष्टेचे नाजुक व स्वादुप्रिय आहेत. आणि त्यांच्या सर्व क्रीडांत वयस्क झालेले देखील बालवत् उल्हास दाखवितात.

सौख्य ही कायती सिद्धी साधण्याकडे त्यांचें लक्ष्य असतें, तें क्षणमात्र चित्तोद्वेग म्हणून नव्हे, तर सकल आयुष्यांत प्रधान अवस्था ती असें ते समजतात. आणि परस्परांच्या सौख्याविषयीं आस्था त्यांच्या व्यवहाराच्या अत्यंत रम्यतेनें ते दर्शवितात.

त्यांच्या कवचीच्या आकृतींत व उर्ध्व लोकीं ज्या म्हणून जाती अवगत आहेत त्यांच्या कवचीच्या आकृतींत कांहीं विशिष्ट भेद आहेत; पण ती आकृति "डालिकोसिफालिक" ( Dolichocephalic ) घाट, जो लोह युगाच्या आरंभीं होता व जो आपणांत आलीकडे फारच आढळत असलेल्या "सेल्टिक" नामक घाटाशीं सदृश असतो, त्याच्याशीं ताडून पाहतां, लाएल साहेबांच्या "भूगर्भ विद्येचीं मूलतत्वें" भाग १०, पृष्ठ १३३, यांत वर्णिलेल्या शिलायुगांतील ब्र्याकिसिफालिक ( Brachycephalic ) घाटाची असंख्य युगाच्या रहाटींत बनलेली उत्तरावस्था आहे, असें मला वाटल्यावांचून राहत नाहीं. त्या घाटाप्रमाणेंच या आकृतींत तुलनेनें पाहतां, कपाळाचें स्थौल्य असतें. सेल्टिक घाटासारखें मागें सरलेलें कपाळ नसतें ललाट प्रदेशीं त्या घाटाप्रमाणें सारखा वाटोळेपणा असतो, पण शिराग्रीं ती आकृती बरीच उंच असते; आणि मस्तिष्क विद्वान् ज्या प्रदेशीं चेतनेंद्रियाचें स्थान मानतात, त्या पार्श्व मस्तक गोलार्धांत, फार कमी उद्धत असतें. मस्तिष्क विद्वानांच्या

परिभाषेप्रमाणें म्हटलें, तर व्हिल्यांच्या सामान्य मस्तक पार्श्वांत तोल, संख्या, ध्वनी, आकार, व्यवस्था आणि कार्यकारणभाव समजण्याचीं इंद्रियें मनस्वी विकास पावलेलीं असतात, आणि चित्तोद्भावित परमोत्कट कल्पना करण्याच्या इंद्रियापेक्षां निर्माणक इंद्रियें अधिक स्पष्ट असतात. ज्यांस नीतिदर्शक इंद्रियें म्हणतात, जशीं उदाहरणार्थ न्यायपरायणत्व आणि परोपकार, तीं विस्मय वाटण्या इतकीं प्रफुल्लित असतात. प्रेमशीलत्व व युद्धष्णुत्व हीं दोन्ही अल्प असतात. संलग्नशीलत्व मोठें असतें; घातुकत्वाचें (म्हणजे मध्येस्थित विघ्नांचा निश्चयानें विनाश करण्याचें ) इंद्रिय बृहत्तर असतें, पण परोपकाराच्या इंद्रियाहून लहान असतें; त्याचें शिशुवात्सल्य हें स्वजनित अपत्याचें प्राणिमात्रास जें प्रेम वाटतें त्याहून कांहींसें भिन्न असतें, म्हणजे, ज्या वस्तूंस सहाय्य अगर रक्षण लागत असेल त्यांच्याठायीं करुणा व मार्दव दर्शविणें हें त्याचें लक्षण होय. मला एक देखिल असामी विद्रूप अथवा कुरूप कधींही आढळला नाहीं. त्यांच्या चेहेऱ्याचें सौंदर्य, त्यांतील अवयवांच्या यथाप्रमाणतेनेंच नुसतें नसतें, तर त्यांच्या मुखाच्या गुळगुळीतपणामुळें, (हा मुखाचा गुळगुळीतपणा म्हातारपणच्या अखेरीपर्यंत एकही रेखा अगर सुरकुती न पडतां कायम असतो ) तसेंच मुद्रेच्या मनोहरतेमुळें आणि जें तेज प-

राक्रमाच्या प्रतिबोधानें, आणि आधिभौतिक व आध्या-त्मिक भयाच्या मुक्ततेपासून कांतीवर फांकतें, त्यामुळें असे. ह्याच मनोहरतेनें आणि त्या तेजामुळें मजसा-रख्याला मनुष्य जातीच्या, विकारांशीं धडपडण्याची संवय झालेल्या, पाहणारास त्यांस पाहिल्यावर स्वलघुत्वा-ची, पूज्यबुद्धीची व भयाची स्फूर्ती होत असे. ती मुद्रा कशी म्हणाल तर जशी एखाद्या चिताऱ्यानें उपदेवते-ला, उपजत विद्वानाला, अगर देवदूताला द्यावी तशी असे. व्हिल्यांतील पुरुषांस बिलकुल दाढी नसते. जा-यांस ( बायकांस ) कधीं कधीं म्हातारपणीं बारिकसें-मिसरुं फुटतें.

ज्या व्यक्ती मला प्रथमतः भेटल्या होत्या त्यांच्या आंगीं जो वर्ण मला दिसला तोच सर्वत्र नव्हता हें पा-हून मला आश्चर्य वाटलें. कांहीं त्यांच्याहून फारच गोरे असत; कोणाचे तर डोळे देखील नीलवर्ण असून केंस गहिऱ्या सोनेरी पांडुवर्णाचे असत. पण युरोपांती-ल उत्तरे कडील माणसांहून त्यांचा वर्ण अधिक गहिरा अगर अधिक तेजःपुंज असे.

माझ्या असें समजण्यांत आलें कीं, हा जो वर्णसंकर झालेला होता तो व्हिल्यांच्याच इतर व दूर दूर राह-णाऱ्या जातींत परस्परांत विवाह व्यवहार झाल्यामुळें. या जाती, हवेच्या कारणानें अथवा मुळारंभीं त्या जाती

उत्कर्ष पावल्यानें ज्या समाजांतील मंडळींत मी होतों त्यांच्याहून अधिक गौरकाय असत. गर्द लाल रंगाची (कुमाईत ) रंगाची त्वचा ही आनांतील परम प्राचीन-कुटुंबांचें दर्शक असें मानीत असत. परंतु या प्राचीन-पणाबद्दल गर्व मानण्याचें एकीकडे ठेवून, उलट ते असें समजत कीं प्रस्तुतची प्रजेची उत्तमता ही सजातीय पण निरनिराळ्या वर्णांच्या संयोगानें प्राप्त झालेली आहे. आणि व्रिहूल्या जातींपैकीं वधुवरें असलीं तर, असे विवाह-संबंध अधिक घडून येतील तितके बरे, असें समजून त्यांस उत्तेजन देत असतात. जीं राष्ट्रें व्रिहूल्यांच्या रीतीं-स व संस्थांस अनुसरून व्यवहार राखीत नाहींत, आणि चिद्विभूतींच्या साधानावर जी हुकमत मिळविण्यास व तीं पुढल्या पिढींत चालू राहील असे करण्यांत जी युगेंची युगें त्यांनीं घालविलीं होतीं, ती हुकमत मिळविण्याची ज्यांस शक्ती नाहीं, त्यांस ते इतके तुच्छ मानीत कीं न्यूयॉर्क शह-रवासी जन शित्ध्यांस देखील तितके तुच्छ मानीत नसतील.

माझें ज्या पुरुषांशीं अघळपघळ संभाषण झालें त्या सर्वांहून सर्व विषयांत अधिक ज्ञान झीमध्यें वसत होतें. तिजकडून मला समजलें कीं, ज्या स्थळीं व्रिहूल्यानीं प्रथमतः वसाहत केली तेथील प्राकृतिक अडचणी आरं-भीं दूर करण्यास जे महत्प्रयास त्यांस पडले ते व्रिहूल्यां-च्या वर्चस्वाचें बीज असें मानीत असत. ती म्हणाली

" तात्पर्य काय कीं, जेथें जेथें म्हणून सुधारणुकीच्या इतिहासाचें हें आद्य स्वरूप सुरू झाल्यानें सर्व जीवित प्रयासरूप बनतें, व त्यामुळें मनुष्यमात्रास आपल्या सर्व सामर्थ्यास खर्ची घालून बरोबरीच्यास मागें टाकण्याची लालसा म्हणजे ( स्पर्धा ) करावी लागते, तेथें तेथें आपणास नेहेमी असाच परिणाम आढळून येतो, तो कोणता म्हणाल तर हाकीं, या स्पर्धेत बहुत मोठी संख्या नष्ट व्हावयाचीच, तेव्हां त्यांत जे सर्वांत उत्तम सामर्थ्यवान् असतात तेवढेच प्रकृती संग्रहास राखते. म्हणून, आमच्या जातींत, व्हिल ( चिद्विभूती ) चा शोध लावण्यापूर्वीं देखील, ज्या उत्तम व्यवस्था होत्या तेवढ्याच मात्र टिकल्या. आणि आमच्या जुन्या पुस्तकांत अशी एक कथा आहे ( तिजवर एकदां सर्वांचा विश्वास होता ) कीं, तुम्ही ज्या सृष्टींतून आल्याचें म्हणतां, त्या लोकींहून, आमची स्थिती पूर्णत्वास येण्याकरितां, आम्हास हाकून लाविलें असून, आमच्या जातीची परम शुद्धी होण्या करितां आमच्या पूर्वजांस महत्प्रयास करावयास लावलें होतें; व अखेरीस आमचें शिक्षण एकदांचें पुरें झाल्यावर आम्हास उच्च लोकावर जावें लागेल, व तेथें ज्या नीच जाती उपलब्ध आहेत त्या नष्टकरून त्या सर्वांचें स्थान प्राप्त होईल, असें आमच्या ललाटीं लिहिलेलें आहे. "

ज्या उच्च लोकांतील रहिवाशांस कधींना कधींतरी व्रिल्ल्या हांकून लावणार, व आपण तत्स्थानापन्न होणार असें झी तत्वज्ञानतः कल्पीत होती, तेथील राजकीय व सामाजिक स्थितींविषयीं आफलिन व झी माझ्याशीं वारंवार एकांतीं भाषण करीत असत. माझ्या वृत्तांतांत आमचें सामर्थ्य व आम्ही स्तुतीस योग्य आहों अशा दृष्टीनें मी दृग्प्रदर्शन करीत असें ( पण माझ्या श्रोत्यांच्या धूर्ततेस सहज कळून येण्याजोगी प्रत्यक्ष थाप मी कधीं दिली नाहीं). या वृत्तांतांत आमच्या ज्या उत्तम सुधारलेल्या प्रजा आहेत त्यांत व त्या भूगर्भगत लोकांत जे कनिष्ट जातीचे लोक इतःपर कधींही रानटी स्थितींतून डोकें वर काढणार नाहींत व जे उत्तरोत्तर पण निःसंशय नष्ट होणार असें समजतात, त्या लोकांत असंख्य विषयांत साम्य आहे असें त्यांस दिसे. आपल्या समाजांस सूर्य प्रकाशित सृष्टी अकालीं प्रकट करूं नये ही दोघांचीही इच्छा होती. दोघेही परोपकारशील असत व इतके कोट्यावधी प्राणी नष्ट होणार हा विचार त्यांस फार व्याकुल करी. आणि आमच्या व्यवहार पद्धतीचें मी बरेंच चटकदार वर्णन करीत असें पण तें त्यांस उदास करी. आमची वडी मंडळी, कवी, तत्ववेत्ते, वक्ते व सेनाधीश यांजबद्दल मी मोठी बढाई मारीं. व व्रिल्ल्यांत त्यांच्या बरोबरीचे कोणी असले तर दाखवा म्हणून म्हणें, पण

व्यर्थ. आपल्या त्या भव्य चेहेऱ्यावर अमानुष सदयता प्रकट करून ती म्हणाली “ शिव, शिव. अल्पांनीं बहुतांवर वर्चस्व संपादन करावें हेंच तर ती सृष्टी असाध्य रानटी आहे याचें निश्चयात्मक व घातुक चिन्ह होय. हें तुमच्या कसें ध्यानांत येत नाहीं कीं या मर्त्यलोकच्या सुखाची पहिली अट म्हटली म्हणजे व्यक्ती व्यक्तींतल्या स्पर्धेचा व चढाओढीचा नाश करणें; व त्या नाशामुळें, मग कोणतीही का राजपद्धती असेना, बहुतांस अल्पांच्या अधीन होणें भाग होतें; व्यक्तिमात्राची खरी स्वतंत्रता नष्ट पावते, ( राज्याची स्वतंत्रता नाममात्रें कितीही कां असेना ) आणि ज्या वृत्तीच्या शांततेवांचून मानासिक व शारीरिक परमानंद प्राप्त होणेंच नाहीं, ती शांतता विलुप्त होते. आमची समजुत आहे कीं मृत्युत्तर ज्या देवयोनींतल्या प्राण्यांच्या आचरणाविषयीं आपल्या उदात्त बुद्धीस भावना करतां येते त्यासारखें जितकें आपलें आयुष्क्रमण होईल तितकें बरें; उघडच आहे कीं, जों जों आपण दिव्य सुखास इहलोकीं समीप करून घेऊं तों तों इतोत्तर येणाऱ्या जन्मांतल्या अवस्थेंत जणु हळुहळु जाऊन पडूं; कारण, हें निर्विवाद आहे कीं, देवांच्या अगर महा भाग जे चिरंजीव आहेत त्यांच्या जीवितवृत्ती विषयीं ज्या सर्व कल्पना आहेत, त्याप्रमाणें पाहतां स्वनिर्मित चिंता व कलहकारक मनोविकार (उदा-

हरणार्थ धनलोभ व ऐश्वर्याकांक्षा,) हे त्या वृत्तींत नाहींतच. ती वृत्ती म्हणजे निरुद्वेग शांतता असें आम्ही समजतों. तींत बुद्धिविषयक व अध्यात्मिक व्यवसाय नसतात असें नाहीं, पण ते प्रत्येकाच्या जातिस्वभावास सुखकर असून मर्जीविरुद्ध व विपरीत नसतात. त्या वृत्तींत कल्याणकारक प्रेमाचें परस्पर आदान प्रदान अबाधित असल्यानें, सतत आनंद होत असतो. सदाचाराच्या अतिव्याप्तीपुढें, द्वेष व सूड आणि कलह व स्पर्धा समूळ नष्ट होतात. असल्या प्रकारच्या राजपद्धतीची स्थिती आपणांस प्राप्त व्हावी म्हणून व्हिूल्या जातींतल्या सर्व जातींचा व कुटुंबांचा यत्न चालू असतो, व या परमार्थाची प्राप्ती होण्याच्या उद्देशानें आमच्या राज्यपद्धतीची व्यवस्था लावलेली आहे. यावरून तुम्हांस उमजेलच कीं ज्या बिनसुधारलेल्या राष्ट्रांतून तुम्हीं आलां आहां त्यांच्याशीं हा उत्कर्ष सर्वथा विपरीत आहे. त्याराष्ट्रांत संकटें, चिंता, व कलहकारक मनोविकार हे निरंतर यथाक्रमें उत्पन्न होत जावे, व ते उत्तरोत्तर प्रचलन होतांना अधिक क्षोभ पावावे, अशी योजना दिसते. व्हिूल्यांच्या सीमेपलीकडे, जी जात या आमच्या सृष्टींत सर्वांत मनस्वी शक्तिमान् आहे, तिला असा अभिमान वाटतो आहे कीं सर्व राज्यव्यवहारज्ञ समाजांत आपणच श्रेष्ठ आहों, आणि त्या बाबदींत म्हणजे राज्यव्यवहार दक्षतेंत आपणास परमावधीची

शिकस्त प्राप्त असल्यानें, दुसऱ्या राष्ट्रीयांनीं आपलें अनुकरण थोडें फार करणें अवश्यच आहे. त्या जातीनें कुम्-पोश विस्तीर्ण प्रमाणावर स्थापिलें आहे; म्हणजे, ज्या अर्थी अज्ञान्यांची संख्या बहुत आहे, त्याअर्थी राज्यनियमनही अज्ञान्यांचेंच. त्या जातीनें असें मानलें आहे कीं परमसुख जें काय आहे तें एकमेकांची सर्व बाबदींत स्पर्धा करण्यांत आहे. यामुळें निंद्य मनोविकारांस कधींही विश्रांती नाहीं. अधिकाराचें, द्रव्याचें, अगर कोणत्यातरी प्रकारचें, श्रेष्ठत्व मिळण्याकरितां स्पर्धा चालू असते. आणि या प्रतिस्पर्धेत त्यांच्यांत जे उत्तम व शांततम असतात ते देखील जी निर्भर्त्सना, जें पिशुनवचन व जो मिथ्यालाप करतात, व ज्याबद्दल त्यांस अनुताप अगर शरम वाटत नाहीं, तें ऐकून आंगावर शहारा येतो. "

आफ-लिन म्हणाले "कांहीं वर्षां पूर्वीं मी या लोकांच्या भेटीस गेलों होतों. आपल्या जातीपैकीं सर्वांत आम्हीच मोठ्या सुखांत व ऐश्वर्यांत आहों, असा गर्व वाहण्यामुळें तर त्यांची ती विपत्ती व अपकृष्टस्थिती फारच खेदकारक दिसते. आणि ही जात-तिच्यांत व तुमच्यांत समानता आहे हें उघडच आहे-आतां सुधरेल

---

* Government of the ignorant, upon the principle of being the most numerous

ही आशाच नको, कारण त्यांच्या सर्व समजुती अधिक निकृष्ट अवस्था उत्पन्न करणाऱ्या आहेत. आपल्या राज्याचा अधिकाधिक फैलाव व्हावा अशी ते इच्छा करीत असतात. पण असें जें एक तत्त्व (सिद्धांत) आहे कीं कांहीं एक अतिमर्यादित विस्तारापलीकडे जातांच, सुव्यवस्थित कुटुंबांचें जें सुख आहे तें कोणत्याही समाजास प्राप्त करून घेणें अशक्य आहे, त्या सिद्धांताशीं अगदीं विपरीत त्यांची ती इच्छा असते. लक्षावधि मनुष्यांच्या तनुतेचें जें प्रमाण मानलें आहे, त्याजवर कांकणभर अधिकच थोड्याशा व्यक्तींनीं तप्त होऊन फुगण्याची जी ही एक पद्धती आहे, ती जों जों पूर्ण दशेस येत आहे तों तों ते मनांत फुशारकी मानीत आहेत, व जबरीनें वसूलवसलात करीत आहेत. ते आरडु आरडू म्हणत असतात कीं पहा, आमची जात सामान्यतः लहान असतांनाही या अपवादभूत उदाहरणावरून आमच्याच पद्धतीपासून हीं महत्कार्यं घडून आलीं हें स्पष्ट सिद्ध होतें."

झी म्हणाली " तात्पर्य काय कीं, मानवी जीविताचें सार्थक्य जर देवांच्या विमल समानतेची समीपता मिळविण्यांत असेल, तर ही जी पद्धति वर्णिली व जिचें अवसान मर्त्यांच्या विषमता आणि भांडणें जितकीं वाढवतील तितकीं अतितम वाढावीं हेंच आहे, तिजहून अगदीं उलट्या दिशेस भरारी मारणें दुसरें राहिलेंच नाहीं. बरें,

अशा रितीचें वर्तन करीत असतां—कोणत्याही प्रकारच्या धर्माच्या श्रद्धेनें कां म्हणाना—पण देवांच्या आनंदाविषयीं मर्मज्ञता प्राप्त होण्याजोगी योग्यता मर्त्यांस कशी मिळावी हें मला कळत नाहीं. असें असून ही, आपलें मरण एवढीच क्रिया घडून आली म्हणजे ते दैविक आनंद आपणांस प्राप्त व्हावयाचेच ही त्यांची अपेक्षा असते तेव्हां असें कांहीं नाहीं. उलटें, देवोपम विषयांशीं अगदीं विपरीत अशा विषयांत ज्यांस सुख वाटत आहे, त्यांस देवांचीं सुखें निस्तेज दिसतील, व ज्या जगांत एकमेकांशीं भांडण्याची मुभा आहे त्यांत परत जाण्याची त्यांस स्पृहा होईलच."

---

## भाग १६ वा.

व्हिल्लनें मारलेल्या छडीविषयीं मागें अनेकवेळां सांगण्यांत आलें आहे, तेव्हां तिचें मी वर्णन करावें अशी माझ्या वाचकांची अपेक्षा असेल.

हें वर्णन माझ्यानें यथार्थ करवणार नाहीं; कारण तिचा उपयोग कसा करावा हें मला ठाऊक नसल्यानें काय भयंकर दगा होईल कोण जाणे, अशा भीतीनें ती काठी मला वापरण्यास मिळाली नाहीं. ती पोकळ असते. तिच्या मुठीच्या आंतले बाजूस पुष्कळ अटकणी, किंड्या, व कळा (springs) असतात, त्यांच्यायोगानें ति-

ची शक्ति बदलतां येते, तिचें रूपांतर करतां येतें, किंवा ती हवीतशी चालवितां येत;—म्हणजे, अमुक एक तऱ्हेनें धरिली तर ती घात करते, दुसऱ्या प्रकारानें धरिली असतां पुनः उपशम करिते— अशी धरिली तर खडकसुद्धां फोडून पार करिते व तशी धरिली तर धुकें विरळ करून टाकते.— एकारीतीनें धरिली तर शरीरांवर कांहीं विकार उत्पन्न करिते व दुसऱ्या रीतीनें धरिली तर मनांचें वशीकरण करण्याचें सामर्थ्य तिच्यांत वसतें. प्रायः ती हातांत धरावयाच्या काठीच्या माफक आकाराची करून हातांत वागवितात; परंतु तिच्यांत एक सरककिल्ली असते तिच्यायोगानें ती मर्जीनुरूप लांब किंवा आंखूड करितां येते. कांहीं विशेष कारणासाठीं उपयोग केला असतां, तिचा वरील भाग तळहाताच्या पोकळींत जाऊन बसतो, व पुढलें आणि मधलें बोट पुढें येतें. तथापि मला कळून आलें आहे कीं, तिची शक्ति सर्वच ठिकाणीं सारखी नसते, तर ती वागविणाऱ्यांच्या आंगीं व्हिलच्या आंगीं जे गुणधर्म असतात व त्यांला जीं कार्यें घडून आणावयाचीं असतात, त्यांत जो संबंध असतो अथवा जें सादृश्य असतें, त्या मानानें तिची शक्ति असते. कांहीं नाश करण्यांत, व कांहीं उपशम करण्यांत, बलवत्तर असतात. वापरणाऱ्यांच्या इच्छेच्या स्वास्थ्यावर व स्थैर्यावरही पुष्कळ अवलंबून असे. ते असें प्रपा-

देतात कीं व्हिल शक्तीचा पूर्ण अभ्यास होऊं शकतो तो केवळ दैहिक स्वभावानेंच, म्हणजे कुलक्रमागत चालत आलेल्या घटनेनेंच. तसेंच व्हिल्या जातीच्या चार वर्षांच्या मुलीला प्रथमच तिच्या हातांत दिलेल्या छडीनें असे कांहीं प्रयोग कारितां येतात कीं, व्हिल्यांच्या मर्यादेच्या बाहेरील प्रदेशांत जन्मलेला मोठा बलाढ्य व चतुर शिल्पकार जरी आपल्या धंद्यांत जन्मभर रुळलेला असला, तरी त्याला देखील तसे करतां येणार नाहींत. या सर्वच छड्यांत कांहीं एकसारखें ( नानाविध ) संमिश्रण असतें असें नाहीं; ज्या मुलांच्या हातीं दिलेल्या असतात, त्या स्त्री किंवा पुरूष जातींतील पंडितांच्या हातांतल्यां पेक्षां साध्या असून, ज्या विशेष कामाकडे मुलांची योजना केलेली असते त्याकामाचा हेतु मनांत धरूनच त्या तयार केलेल्या असतात; हा हेतु अगदीं लहान मुलांत महा घातुक असतो हें मी सांगितलेंच आहे. विवाहित स्त्रियांच्या व लेंकुरवाळ्यांच्या छड्यांतून प्रायः अन्योन्य घातुकशक्ति काढून टाकलेली असते, व उपशमशक्ति त्यांच्यांत पूर्ण भारलेली असते. व्हिल रसाच्या या अद्वितीय वाहकाविषयीं आणखी विस्तारानें मला सांगतां आलें असतें तर बरें झालें असतें, पण त्याचीं यंत्ररचना जितकीं उत्कृष्ठ आहे तितके तिचे परिणामही अद्भुत आहेत.

तथापि इतकें सांगितलें पाहिजे कीं, ह्या लोकांनीं कांहीं

नवीन नळ्या तयार केल्या आहेत, त्यांतून नाश करावयाचा असेल त्या पदार्थावर हा व्हिलरस बहुतेक अमर्याद अंतरावर सोडतां येतो. थोड्यांत थोडें म्हटलें तर ५००पासून६००मैलांवर तो सोडतां येतो.या हेतूच्या प्राप्तीस्तव, ते ज्या गणित शास्त्राची योजना करतात, तें इतकें तंतोतंत यथातथ्य असतें कीं,वायू नौकेंतील एखाद्या प्रेक्षकानें दिलेल्या माहिती वरून, व्हिलशाखेच्या कोणत्याही कामगाराला, मध्यंतरी येणारे अडथळे कोणत्या प्रकारचे आहेत, व ज्यांतून व्हिलरस सोडावयाचा तें यंत्र किती उंच चढविलें पाहिजे, व तें त्या रसानें किती अंश पर्यंत भरलें पाहिजे, हें बिनचुक सांगतां येतें. असें झालें म्हणजे, अत्यंत अल्प काळांत ( त्याची अल्पता निश्चित करणें कठीण आहे ) लंडन सारख्या विस्तीर्ण शहराच्या दुपटीनें मोठ्या विस्ताराची या रसानें राख रांगोळी करून टाकतां येते.

खरोखर हे आनालोक फारच अद्भुत शिल्पकार आहेत. कल्पक शक्तीचा प्रयोगतः उपयोग करून घेण्यांत तर ते फारच विलक्षण आहेत.

माझा यजमान व त्याची मुलगी झी यांच्या बरोबर मी एकदां एक सार्वजनिक पदार्थ संग्रहालय पहाण्यास गेलों होतों. हें संग्रहालय पंडितांच्या पाठशाळेंतील एका भागांत आहे.तेथें प्राचीन काळच्या अडाणीपणाच्या व चुकीच्या प्र-

योगांचे पुष्कळ चमत्कारिक नमुने मांडलेले आहेत. आलीकडे शोध लागलेल्या युक्त्या (यंत्रें) म्हणून ज्या विषयीं आपण अभिमान मानतों, असे प्रयोग तेथें पुष्कळ होते. गोळे व पेट घेणारी दारू भरून सोडण्याच्या कांहीं नळ्या सटर फटर म्हणून एका बाजूस ठेविल्या होत्या. त्यांची रचना आपणां मधील तोफा व *(क्याटापुल्टस्) यांच्या धर्तीवर होती; आणि आमच्यांतील अगदीं अर्वाचीन तोफांत ज्या सुधारणा झाल्या आहेत त्यां तोफांहून ह्या अधिक घातुक होत्या. जसें एखाद्या तोफखान्यावरील कामगारानें चिनी लोकांचे धनुष्य व बाण यांकडे पाहून तिरस्कारयुक्त हास्य करावें, त्याप्रमाणेंच माझ्या यजमामानें या हत्यारां विषयीं केलें. दुसऱ्या एका शाखेंत वाफेनें चालणाऱ्या गाड्या व गलबतें यांचे नमुने मांडलेले होते, व एक विमान ही होतें, तें कदाचित †मॉटगॉल फियरनें तयार केलेलें असावें असें होतें. विचारयुक्त शहाणपणाच्या मुद्रेनें ती म्हणाली "चिद्विभूतीच्या आंगच्या गुणधर्मांचें यत्किंचित ज्ञान होण्या पूर्वी जे आमच्या असंस्कृत पूर्वजांनीं खेळ केले होते ते असले क्षुद्र होते."

---

* Catapults हें ग्रीक लोकांत बाण व दगड मारण्याचें यंत्र असे.

† एक फ्रेंच शिल्पकार. यानें विमान नवीन शोधून काढिलें. त्याचें जन्म १७४५, व मृत्यु १७९९ त.

ही तरुण गाई ( स्त्री ), त्या देशांतील स्त्रियांच्या आंगीं स्नायूंची शक्ति कशी वसत असे, याचें अगदीं अत्युत्तम उदाहरण होती. तिच्या सर्व जाती प्रमाणें तिचा चेहरा सुंदर होता. उर्ध्व लोकांत असला भव्य व अगदीं निर्दोष चेहेरा माझ्या पाहण्यांत कधींच आलेला नाहीं. पण कठिण कठिण अभ्यासांच्या आसक्ती मुळें तिच्या मुखावर निर्मूर्त विचाराची मुद्रा दिसे, त्यामुळें तें ती विश्रांतींत असतां कांहींसें उग्र दिसे; हा उग्रपणा, तिचें ते विस्तृत स्कंद व तो उंच बांधा यांच्या संयोगानें तिजकडे पाहिलें म्हणजे तर, फारच भयप्रद वाटे. गाईंत देखील ती उंचच होती. मला खिशांतलें पिस्तुल जितक्या सौकर्यानें उचलतां आलें असतें तितक्या सौकर्यानें तिनें तोफ उचलली हें मीं पाहिलें. इला पाहतांच मजमध्यें अत्यंत भय उत्पन्न व्हावें; आणि हें भय, पदार्थ संग्रहालयाच्या ज्या शाखेंत चिद्विभूतीच्या शक्तीनें चालणाऱ्या यंत्रांचे नमुने ठेविले होते, तेथें आम्ही आल्यावर तर फारच वाढलें; कारण तेथें आपल्या हातांतल्या व्हिल छडीच्या नुसत्या फिरविण्यानें, स्वतः दूर अंतरावर उभें राहून, तिनें मोठ्या व जड पदार्थांत गती उत्पन्न केली. त्यांच्यांत जणुं बुद्धि प्रेरित करून आपल्या आज्ञा त्यांस समजून त्या त्यानां पाळावयास लावते आहे कीं काय असें भासे. मोठ्या संकीर्ण यंत्रांच्या खंडांस तिनें गती द्यावी, ती गती तिनें निरुद्ध करावी;

अथवा अत्यंत अल्पकाळांत ( तो सांगितला असतां खरा सुद्धां वाटणार नाहीं ) कच्च्या मालाच्या समग्र व सिद्ध कौशल्य पूरित सप्रमाण रचना बनत तों पर्यंत ती गती चालू ठेवावी. सचेतन प्राण्याच्या मज्जातंतूंवर व स्नायूं-वर जो परिणाम * मेस्मेरिझम् अथवा * इलेक्ट्रोबॉओ-लोजी घडविते, तोच परिणाम ही तरुण गाई ( स्त्री ) आपल्या बारिक छडीनें चैतन्यरहित यंत्रांच्या कळा व चवया यांजवर उत्पन्न करी.

निर्जीव पदार्थांवर एवढी हुकमत पाहून मला फार आश्चर्य वाटलें, असें मी आपल्या सोबत्यांस सांगितलें, व लागलेंच असेंही कबूल केलें कीं आमच्या पृथ्वीतलावर असे कांहीं अद्भुत चमत्कार मी पाहिलेले आहेत कीं त्या यो-गानें कांहीं जीवमान प्राणी दुसऱ्या सजीव प्राण्याचें वशी-करण करूं शकतात, हें सत्य आहे खरें, पण श्रद्धालुतेनें अथवा कुटिलतेनें त्याची अतिशयोक्ति झालेली आहे.— एवढें मीं सांगितलें मात्र तोंच झीनें, तिला अशा विष-यांची बापापेक्षां अधिक गोडी होती म्हणून, मला आ-पला हात पुढें करण्या विषयीं सांगितलें, व आपला हात त्याचे शेजारीं धरून ती मला म्हणाली "या दोहोंच्या रचनेंत व लक्षणांत कायकाय भेद आहेत या कडे लक्ष द्या." पहिला भेद हा कीं—गाईचा ( स्त्रीचा ) आंगठा

---

* * पृष्ट ५० याजवरील टीप पहा.

( मला पुढें दिसून आलें कीं त्या सर्वच जातीचा, मग स्त्री असो अगर पुरुष असो ), पृथ्वी पृष्ठावर आपल्या जातीचा जेवढा असतो, त्या पेक्षां पुष्कळ मोठा असून जसा लांब होता तसा स्थूल ही होता. मनुष्याच्या आंगठ्यांत व * गोरिला नावाच्या वानराच्या आंगठ्यांत जेवढा तफावत असतो तेवढाच बहुतेक यांच्या व आमच्या आंगठ्यांत आहे. दुसरा भेद हा कीं—त्यांच्या हाताचा तळवा प्रमाणतः आपल्याहून स्थूलतर असतो—त्यावरच्या त्वचेची रचना सूक्ष्मतर व मृदुतर असते—सरासरीनें त्यांची उष्णता आपल्याहून अधिक असते. या सर्वां पेक्षां विशेष स्मरणार्ह हें कीं एक दृश्य धमनी असते ती त्वचेच्या खालीं स्पष्ट दिसते. ती मनगटांतून निघून आंगठ्याच्या पेऱ्या पर्यंत येते व पुढें तिला कांट्या सारखे फांटे फुटून ते पुढल्या व मधल्या बोटाच्या अगदीं मुळाशीं गेलेले असतात.

ती तत्ववेत्ती गाई ( स्त्री ) मला म्हणाली, " तुमच्या आंगठ्याच्या क्षुद्र घटने मुळें, व आमच्या जातींतील मनुष्यांच्या हातावर जी थोडी बहूत तरी व्यक्त असते अशी धमनी तुमच्या हातांत नसल्यानें, व्हिलच्या निर्मातृत्वावर

---

* आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील प्रदेशांत सांपडणारा एक जातीचा मोठा वानर. तो माणसा येवढा मोठा असून शक्ति व क्रौर्य ह्यां विषयीं प्रसिद्ध आहे.

अपूरी व निर्बल यावाचून इतर हुकमत तुम्हांला चालवितां येणार नाहीं. धमनीच्या संबंधानें म्हणाल तर आमच्या अतिप्राचीन पूर्वजांच्या हातावर ती सांपडत नसे; व हिंदु-स्थांच्या मर्यादेच्या बाहेरील प्रदेशांतले जे अशिक्षित अडाणी लोक आहेत त्यांच्या हातावर सांपडत नसते. ही धमनी पिढी दरपिढी उत्तरोत्तर वाढत आहे; चिद्वि-भूती शक्तीनें जीं आरंभीं कार्यें घडून आलीं तेव्हां पासून तिची वाढ सुरूहोऊन तिचे सतत जे प्रयोग चालू आहेत त्या समागमें तीही वाढत आहे. चिद्विभूतीनें प्रवेश क-रतां येतो अशा प्रकृतीच्या सर्व अति सूक्ष्मशक्तीवर ज्या परम प्रधान शास्त्रांचा अधिकार चालू शकतो, त्या शास्त्रांचा व्यासंग करणारे तुमच्या जातींतील जे विशेष बुद्धिमान् प्राणी, त्यांच्यांत ही धमनी कदाचित् एक दोन हजार वर्षांनीं उत्पन्न होईल. पण जडाचें कोणतेंही रूप निश्चेष्ट व गतिहीन नसतें, एवढें सुद्धां ठाऊक नसण्या इतकें तुम्हाला तुमच्या वडिलांनीं अगर शिक्षकांनीं अ-ज्ञान वास्तविकच ठेविलें नसेल. तुम्हीं तर जड पदार्थ स्वभावतः निश्चेष्ट व गतिहीन आहे असें म्हणतां. वस्तुतः प्रत्येक कणास सतत गती असते व त्यावर अनेक साधनांचे विकार होत असतात. त्यांपैकीं उष्णता हें साधन स्पष्ट व शीघ्र होय; पण चिद्विभूती हें साधन, त्याचा अत्यंत सूक्ष्म आणि चतुरस्रपणानें उपयोग केल्यास, महासाम-

र्थ्यवान् आहे. म्हणून जड बाह्यतः किती जरी निश्चेष्ट व दृढ असें दिसलें, तरी वस्तुतः त्याच्या प्रत्येक कणावर जी क्रिया निरंतर घडत असते तीस, माझ्या हातानें उत्पन्न झालेला व इच्छेनें नियमित केलेला जो वेग, तो प्रबलतर व सत्वरतर मात्र करतो. धातूच्या राशीच्या आंगीं स्वतः सिद्ध विचार उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नाहीं म्हणावें, तर तिच्या अन्तर्गत गतिग्राहकत्वामुळें बुद्धिमान् प्रयोग करणाऱ्याचें विचार ग्रहण करण्याचें सामर्थ्य तिच्यांत येतें; आणि तो विचार व्हिूलशक्तीच्या पुरत्याशा जोरानें सोडला तर, त्या धातुराशीला जणुं घटक व दृश्य शक्तीच्या योगानें स्थानांतर करणें जसें भाग पडतें, तसेंच प्रयोग करणाऱ्याच्या इच्छे प्रमाणें क्रिया करणें ही भाग पडतें. आत्म्याचा असा अंतःप्रवेश झाल्यामुळें तेवढ्यावेळे पुरती ती धातुराशी सजीव आहे, व तिच्यांत विचार करण्याची शक्ती आहे, असें म्हटलें तरी चालण्या जोगें आहे. असें नसलें तर आमच्या कळसूत्री बाहुल्यांचा आम्हाला नोकरां ऐवजीं उपयोग करितां आला नसता."

त्या तरुण स्त्रीच्या शारीरिक शक्ती विषयीं व विद्वत्ते-विषयीं मला इतकी महती वाटली कीं तिच्याशीं वाद करावयाचें मला धाडस होईना. मी शाळेंत असतांना एके ठिकाणीं असें वाचलें होतें कीं, एका शहाण्या म-

नुष्यानें रोमन बादशहाशीं वादकरीत असतां एकाएकीं आपल्या पूर्वपक्षाचा अभिमान सोडला; व " तुम्हांस पूर्वपक्षाच्या मंडनार्थ कांहीं बोलावयाचें नाहीं कां? " असें बादशहानें विचारिलें असतां त्यानें उत्तर केलें कीं "नाहीं महाराज. ज्या न्यायवेत्त्याच्या हुकमतींत लाख सव्वालाख सैन्य नेहमीं तयार आहे त्याच्याशीं वाद काय करावयाचा आहे? "या संवादाचें मला स्मरण झालें.

चिद्विभूतीचे वास्तविक परिणाम जडावर कांहीं जरी होत असले तरी त्या विभूतीचा विस्तार व कारणें या संबंधानें ईचें ज्ञान अपुरतें होतें असें फॉरेडीनें सिद्ध करून दाखविलें असतें; अशी जरी माझी अंतस्थ खात्री होती, तथापि ईला आपल्या मुष्टिप्रहारानें एकामागून एक असे रॉयल सोसाइटी नांवाच्या मंडळीचे सभासद ठार करून टाकतां आले असते, अशा विषयीं मला मुळींच शंका नव्हती. ज्या गोष्टी आपल्याला अवगत आहेत त्या संबंधानें सुद्धां एखाद्या साधारण स्त्रीशीं वादविवाद करणें हें निरर्थक होय, असें प्रत्येक समजुतदार मनुष्याला कळत असतें. तेव्हां सात फूट उंचीच्या गाई ( स्त्री ) शीं, चिद्विभूतीच्या गुप्त धर्मा विषयीं, वाद करणें, म्हणजे अरण्यांत वावटळी बरोबर वाद करण्या इतकेंच निष्फळ होय.

पंडितांच्या पाठशाळेच्या विस्तीर्ण इमारतींत जे अ-

नेक भाग आहेत त्या पैकीं जो पुराणवस्तुशास्त्राकरितां योजिलेला होता तो पाहून माझें अतिशय मनरंजन झालें; त्यांत अतिपुरातन तसबिरी जमवून ठेविलेल्या होत्या. या तसबिरींना दिलेला रंग व त्यांची भुई हे इतकी टिकाऊ मसाल्याची होती कीं, चिनी लोकांच्या आद्यतम इतिहासांत जो अति प्राचीन काल आहे त्या कालांत त्या तसबिरी काढलेल्या आहेत असें जरी लिहिलेलें होतें तरी त्यांच्या रंगाची टवटवी अजून कायम होती. हे एकत्र करून ठेवलेले पदार्थ मी पहात असतां मुख्यत्वें करून मला दोन गोष्टींचा चमत्कार वाटला. पहिली ही कीं, ज्या तसबिरी सहा हजार आणि सात हजार वर्षांच्या दरम्यान काढलेल्या आहेत, असें लिहिलें होतें, त्यांत गेल्या तीन चार हजार वर्षांत काढलेल्या तसबिरीं पेक्षां पुष्कळच अधिक सुगर कोटीचें कौशल्य दृष्टीस पडलें. दुसरी गोष्ट ही कीं पहिल्यानें सांगितलेल्या काळांतल्या तसबिरींत व आपल्या ऊर्ध्वलोकांतील युरोपियन प्रकारच्या चेहेऱ्यांत पुष्कळच साम्य दिसलें. कांहीं तसबिरी पहातांच मला टिटियननें काढलेल्या इटालियन चेहेऱ्याची आठवण झाली. त्या चेहेऱ्यावर मनोविकाराच्या रेखा (जणु लोहशलाकांनीं वठलेल्या रेखा प्रमाणें) त्यांच्यांतील महत्वाकांक्षा अगर कुटिलता, चिंता अगर दुःख, स्पष्ट करीत होत्या. हे चेहेरे, जे पुरुष चिद्विभूतीच्या

अंतर्हित शक्तीच्या शोधानें समाजाची स्थिती बदलण्या पूर्वी युद्ध अथवा कलहाच्या युगांत होते, त्यांचे होते; म्हणजे हे पुरुष अधिकार अथवा कीर्ति याजकरितां जसे आपण उर्ध्वलोकीं एकमेकांशीं कलह करितों त्याप्रमाणें परस्परांशीं कलह करणारे होते.

चिद्विभूतीच्या या क्रांती नंतर १००० वर्षां आलीकडे चेहेऱ्याच्या ठेवणींतला फरक स्पष्ट होत चालला; तो असा कीं, तो पिढी दरपिढी प्रशान्त दिसूं लागला; आणि अशा शांतपणा मुळें यांत व कष्टाळू आणि पापी मनुष्याच्या चेहेऱ्यांत भेद अगदीं ढळढळीत दिसूं लागला. आणि मुद्रेचें सौंदर्य व तेज हीं जसजशीं अधिक अधिक वाढत गेलीं, त्या प्रमाणानेंच चिताऱ्याची कला अधिक ग्राम्य व एकच धर्तीवरची झाली.

पण एकत्र केलेल्या वस्तूंत अतिशय दर्शनीय म्हटल्या म्हणजे पौराणिक कालाच्या पूर्वी काढलेल्या ज्या तीन तसबिरी त्या होत. पौराणिक दंतकथेप्रमाणें त्या कोणी एका तत्ववेत्याच्या आज्ञेनें काढिलेल्या होत्या. त्या तत्ववेत्याची उत्पत्ति व त्याचे गुण, हिंदुस्थानांतील बुद्ध, व ग्रीक लोकांतील प्रॉमीथियस यांच्या प्रमाणें लाक्षणिक कथांत मिसळून गेले होते.

एक समयावच्छेदेंकरून पंडित व योद्धा असणारा हा गूढचरित पुरुष आमचा सामान्यआदि पुरुष

होता अशी व्हिलजातींतील मुख्य मुख्य भागांतले लोक बढाई मारीत असतात.

या तसबिरी स्वतः तत्ववेत्ता, त्याचा आजा आणि पणजा, अशा तिघांच्या तीन होत्या. त्या सर्व भर उंचीच्या होत्या. त्यांत मोठा लांब झगा घातलेला असा तत्ववेत्ता काढलेला आहे; त्यायोगें तो आंगावर जणु एखादें ढिलें खवलेदार चिलखत घातल्या सारखा दिसतो. तें चिलखत कदाचित एखाद्या माशाच्या अगर सरपटणाऱ्या प्राण्याच्या आंगाच्या धर्तीवर केलेलं असावें, परंतु त्याचे हात पाय उघडे आहेत. त्याचीं बोटें लांबच लांब असून त्यांची नखें एकमेकांत अडकलेलीं आहेत.

त्याचा कंठ अगदीं थोडा दिसतो, किंबहुना मुळींच दृष्टीस पडत नाहीं. त्याचें कपाळ थबकडें आहे; तें पंडिताचें असावें अशी जी समजूत आहे त्या प्रमाणें मुळींच नाहीं. त्याचे नेत्र तेजस्वी, पिंगट वर्णाचे असून बटबटीत आहेत. तोंड फारच रुंदट आहे, गालावरचीं हाडें उंच निघालेलीं आहेत व वर्ण मलीन आहे. त्याच्या विषयीं दंतकथा अशी आहे कीं, पुष्कळ वर्षें पर्यंत तो वार्धक्यावस्थेंत होता. तरुणपणांत आपल्या आजाला आपण जीवंत पाहिलें हें त्याला पूर्णपणें स्मरत असून, बाल्यावस्थेंत पणजाला जिवंत पाहिल्याची सुद्धां त्याला आठवण होती. आजाची तसबीर तो जिवंत असतां त्यानें घेतली अगर

घेवविली होती. आणि पणजाची † ममी प्रेतावरून काढली होती. तसबीरींतल्या आजाचा तोंडवळा व आकृति यातत्ववेत्त्या प्रमाणें होती, परंतु त्यांत विशेष गौरव होतें. त्याच्या अंगावर पोषाख नव्हता. त्याच्या शरीराचा वर्ण एक तऱ्हेचाच होता. छाती व पोट हीं पिवळीं होतीं. खांद्दे आणि पाय हे पितळया प्रमाणें मजितखोर रंगाचे पिंवळट होते. त्याचा पणजा*मंडूकवर्गीय एक थोरला मासला होता, म्हणजे, असें कशाला, तो एकजंगी बेडूक होता म्हणाना ?

दंतकथे प्रमाणें, या तत्ववेत्त्यानें आपल्या वंशजांस गद्यरुपी व सूत्रप्राय, चटकदार उपदेश लिहून ठेविलेला आहे. त्यांत विशेष लिहिलेलें हें आहे "हे वंशजहो ! नम्र असा; आपल्या जातीचा आद्यपुरुष एक बेडूक होता. स्वतःचा उत्कर्ष करा, कारण ज्या दैवी भावनेनें तुमचा आद्यपुरुष उत्पन्न झाला ती दैवीभावना तुमच्या उत्कर्षानें विकास पावते आहे."

तीन मंडूक वर्गीय तसबिरींकडे मी निरखून पहात अअसतां आफ्लिनूनें मला ही कथा सांगितली. मी त्याला

---

† A dead body embalmed and dried after the manner of the ancient Egyptians मसाला भरलेलें प्रेत.

* Batrachian genus.

उत्तर केलें "अशिक्षित व गांवढळ* म्हणून माझ्या मानले-ल्या अज्ञानाची व श्रद्धालुतेची तुम्ही थट्टा करितां, पण हीं ओबडधोबड चित्रें किती जरी जुन्याकाळचीं असलीं—मग तीं कदाचित् ग्राम्य व थट्टा करण्याकरतां काढलेलीं असोत—तरी मला असें वाटतें कीं बेडकाचा एक वंशज सूत्र-कार ज्यांत तत्ववेत्ता निपजला अथवा कोणत्याही भागाची (मी उच्च ब्हिल्याविषयीं म्हणत नाहीं, पण मानव जाती-च्या अतिनीच भेदांविषयीं कां घ्याना) उत्पत्ति बेडका पा-सून आहे हें, ज्यांत ज्ञानदीप्ति पुरती पसरली नव्हती अशायुगांत देखील, तुमच्या जातींतलि एकाही मनुष्यास खरें वाटलें नसेल"

आफ्लिनूनें उत्तर केलें "मला क्षमाकरा. सुमारें सात हजार वर्षांपूर्वीं अति उच्च स्थितीस जाऊन पोंहोंचलेलें, ज्याला आपण इतिहासाचें कलह अथवा तात्ववेत्तिक यु-ग असें म्हणतों, त्या युगांत एक अतिविख्यात पदार्थशा-स्त्रज्ञ होऊन गेला; त्यानें, आन व बेडूक यांच्या शरीर रचनेंत आनुषंगिक व शरीरसंबंधीं सादृश्य असतें म्हणून एका पासून दुसऱ्याची उत्पत्ति झाली असावी, अशी असं-ख्य शिष्य जनांची खात्री होईसें सिद्ध करून दाखविलें आहे. असे कांहीं रोग आहेत कीं, ते दोघांतही समान दिसतात. त्या दोघांच्याही आंतड्यांत परोपजीवी असे

* Tish.

एकाच जातीचे किडे उत्पन्न होत असतात. व सर्वांत आश्चर्य हें कीं आनाला एक पोहोण्याची पिशवी * इतर अवयवांबरोबर असते, तिचा त्याला हल्लीं कांहीं उपयोग नसतो, पण यामुळेंगानें असें स्पष्ट होते कीं याची उत्पत्ति बेडकापासून असावी. त्या दोहोंच्या आकृतींत भेद आहे ही कोटी आम्ही वर सांगितलेल्या सिद्धांताला ( म्हणजे बेडकापासून आमची उत्पत्ति असावी ) प्रतिकूळ होत नाहीं; कारण आमच्या सृष्टींत असे कांहीं जिवंत बेडूक अजून उपलब्ध आहेत कीं ते आकृतीनें व बांध्यानें आमच्याहून निरस नसतात, व हजारों वर्षांपूर्वीं याहूनही ते मोठे होते असें दिसतें. ”

मी म्हटलें “ हें मला ठाऊक आहे. कारण हे असले मोठ्या पिंडाचे बेडूक महाप्रलयापूर्वीं ऊर्ध्व लोकींचे मोठे प्रख्यात निवासी होते, असें आमच्यांतील उत्तम भूगर्भवेत्त्यांचें मत आहे. ( त्यांनीं कदाचित् या बेडकांनां स्वप्नांत पाहिलें असलें तर नकळे ) ; तुमच्या भूमीच्या

---

* Swimming-bladder a bag in animals which serves as the receptacle of some secreted fluid. It was used to make the body light in order that it may float on the surface of water.

अंतःप्रदेशांतील सरोवरें व दलदलींत राहून जे प्राणी पुष्ट व्हावेत असें संभवतें, ते हे बेडूकच होत. आणखी काय आपलें म्हणणें आहे तें ऐकूंद्या."

" इतहासाच्या कलहयुगांत, एक पंडित जें म्हणे त्याचें दुसऱ्यानें खंडण करावें. वस्तुतः त्याकाळीं ही एक म्हणच पडून गेली होती कीं, मानवी विचाराचें उच्चपद जें कायम राहिलें आहे तें पूर्व व उत्तर या उभय पक्षांकडून टोले मिळाल्यामुळें त्या प्रतिवादास जी गती उत्पन्न होई तिच्यामुळेंच; आणि म्हणूनच तत्ववेत्त्याच्या दुसऱ्या पक्षानें असें मत प्रतिपादिलें होतें कीं; आनांची उत्पत्ति बेडकापासून नाहीं, तर बेडूक हाच आनाचें उत्तरोत्तर वाढून सुधारलेलें अन्यरूप आहे. बेडकाची सामान्य आकृति घेतली तर ती आनापेक्षां पुष्कळ बांधेसूद आहे; त्या बेडकांच्या खालील शरीराच्या अवयवांची सुरेख ठेवण, त्यांचा पार्श्वभाग व स्कंद यांच्यापुढें आनांतील मोठा भाग हा बहुधां सर्वस्वी कुरूप दिसे, आणि त्याची आकृती खरोखरच अगदीं बेडौल असे. पुनः, जमीनीवर व पाण्यांत दोहों ठिकाणीं राहण्याची शक्ति बेडकांच्याआंगीं होती. दैविक सत्वाचे गुण ज्यांच्यांत आहेत असा हा मोठा अधिकार आनांत ( मनुष्यांत ) नसून, त्याच्या पोहोण्याच्या पिशवीचा उपयोग तो करीत नाहींसा

झाला, यावरून * त्या विशिष्ट जातीच्या अधिक उन्नत स्वरूपाचा अपकर्ष आहे हें अगदीं स्पष्ट रीतीनें सिद्ध होतें.

दुसरें असें कीं आनांच्या आद्यजातींना केंस भरपुर असत असें दिसतें. आणि तारतम्यानें आलीकडच्या काळांत देखील आमच्या पूर्वजांच्या चेहेऱ्यावर त्यांचे झुबकेचे झुबके उगवून त्यांस कुरूपता आणीत, व त्यांच्या गालांवर व हनवट्यावर तुम्हांप्रमाणेंच, अहो गांवढळगडी! अतोनात उगवत. पण आनांच्या वरिष्ठजातींचा पिढी दरपिढी असा हेतु असल्याचें दिसतें कीं, पृष्ठवंशाविशिष्ट केंसाळ प्राण्यांशीं आपल्या संबंधाचा मागमूस ठेवावयाचा नाहीं, व त्यांणीं हें हीणकट केंसाळ जाल आस्ते आस्ते, लग्नांत आवडनिवड करण्याच्या प्रघातानें, नाहींसें करीत आणलें आहे. तें असें कीं, जाईनीं ( स्त्रियांनीं ) अर्थातच गुळगुळीत चेहेऱ्यांचें तारुण्य अथवा सौंदर्य आपणांस पसंत म्हणून तशांशीं लग्नें करावीं. बेडकाचें स्थान पृष्ठवंशीयवर्गांत कितपत आहे हें त्यास मुळींच केंस नसतात, डोक्यावर देखील नसतात, यावरून दिसून येतें. ही नि-

---

* मनुष्य व बेडूक हे दोन्हीं एक वर्गीय असून बेडूक हे त्यांतले अधिक उन्नत स्वरूप आहे, कारण त्यास स्थल व जल या दोहोंतही सारखाच संचार करतां येतो, व मनुष्यास पोहोण्याच्या पिशवीचा उपयोग करतां येत नाहीं, म्हणून त्याची जाती कमी दर्जाची असा उद्देश.

क्लेश पूर्तता त्यांस जन्मतः प्राप्त आहे. ती आनांपैकीं अत्युत्तम सुंदर पुरुषांत, असंख्य युगाच्या यत्नानें देखील अजून प्राप्त झाली नाहीं. बेडकाच्या स्नायुरचनेच्या संकीर्णतेनें व नाजुकपणानें व त्यांच्या धमनीमार्गें होणाऱ्या रुधिराभिसरणानें, त्यांस उपभोगशीलत्व, आपल्या कनिष्ठ प्रकारच्या, निदान अधिक सुबोध शरिराच्या कुडीहून अधिक असतें असें या मताच्या लोकांनीं सिद्ध केलें होतें. बेडकाच्या हाताच्या ( त्याला हात असें म्हटलेंच तर ) परीक्षणा वरून त्याचें तें मर्मज्ञ प्रेमशीलत्व व व्यवहार संघट्टनशीलत्व कळून येतें. सारांश, आना हे जरी संघचारी व प्रेमप्रिय आहेत, तरी बेडूक हे त्यांच्याहून कांकणभर अधिकच तसे आहेत. तात्पर्य काय कीं, दोन्हीं पक्षांचा मोठ्या आवेशानें वाद चालला होता; एकानें म्हणावें कीं आन हे बेडकांचें पूर्णतेला पावलेलें प्रतिरूप होय; दुसऱ्यानें म्हणावें कीं बेडूक हें आनांचें उत्तमोत्तम विकसित रूप होय. नीतिशास्त्रज्ञांचा व सृष्टपदार्थ शास्त्रज्ञांचा मतभेद होता; पण त्यांच्यांतले पुष्कळ लोक बेडूक अधिक चांगला मानणाऱ्या मताचे होते. ते म्हणत कीं ( व त्यांत बराच सत्याभास असे ) आचार नीतींत ( म्हणजे व्यक्तीच्या व समाजाच्या आरोग्यास व कल्याणास जे नियम बहुत योग्य होत त्यांचें अवलंबन ) करण्यांत बेडकाचें श्रेष्ठत्व आहे यांत संदेह नकोच. इतिहासांत सर्वत्र

असें दिसतें कीं सर्व मानवीजातींत इथून तेथवर सगळी अनीती व स्वतःच्या व सर्व साधारण लोकांच्या सुखाला व कल्याणाला आवश्य असे त्यांनीं कबूल केलेले जे नियम त्यांज विषयीं, त्यांच्यांत अत्यंत विख्यात म्हणविलेले जे आहेत त्यांजकडून उपेक्षा झालेली आहे. पण बेडकाच्या जातीविषयीं कितीही चिकित्सक परीक्षण करणारा असला, तरी त्याला देखील त्यांच्या वागणुकींत त्यांनीं मुकाट्यानें मान्य केलेला नियमांला सोडून वांकडी चाल एकही प्रसंगीं दिसून येणार नाहीं. जर जिजबद्दल एवढा यत्न करावयाचा, व जी सुधारणा कितपत झाली आहे हें ताडण्याचें प्रमाण होय, ती आचार नीतीची श्रेष्ठता जर साधत नाहीं, तर सुधारणे पासून काय फायदा!

"सारांश कायकीं या मताचें अवलंबन करणारे असें मानीत कीं कांहीं एक प्राचीन काळीं मानवी जातीचें फार सुधरून बनलेलें जें रूप, ती ही बेडकांचीं जाती होय. परंतु कांहीं कारणांमुळें— ज्यांची युक्तीनें अटकळ करणें कठीण आहे— सृष्टीच्या परंपरेंत त्यांचें आद्य स्थान त्यांस राखतां आलें नाहीं. इकडे, आता हे कनिष्ठ घटनेचे तर खरे, पण त्यांनी सद्गुणा पेक्षां दुर्गुणांच्या म्हणजे उग्रता व धूर्तता यांच्या प्रभावानें उत्तरोत्तर आपलें वर्चस्व स्थापिलें. जसें मानवी जातींतल्या जातींतच, अगदीं रानटी अशा लोकांनीं असल्या दुर्गुणाच्या परा-

क्लेश पूर्तता त्यांस जन्मतः प्राप्त आहे. ती आनांपैकीं अत्युत्तम सुंदर पुरुषांत, असंख्य युगाच्या यत्नानें देखील अजून प्राप्त झाली नाहीं. बेडकाच्या स्नायुरचनेच्या संकीर्णतेनें व नाजुकपणानें व त्यांच्या धमनीमार्गें होणाऱ्या रुधिराभिसरणानें, त्यांस उपभोगशीलत्व, आपल्या कनिष्ठ प्रकारच्या, निदान अधिक सुबोध शारिराच्या कुडीहून अधिक असतें असें या मताच्या लोकांनीं सिद्ध केलें होतें. बेडकाच्या हाताच्या ( त्याला हात असें म्हटलेंच तर ) परीक्षणा वरून त्याचें तें मर्मज्ञ प्रेमशीलत्व व व्यवहार संवट्टनशीलत्व कळून येतें. सारांश, आना हे जरी संघचारी व प्रेमप्रिय आहेत, तरी बेडूक हे त्यांच्याहून कांकणभर अधिकच तसे आहेत. तात्पर्य काय कीं, दोन्हीं पक्षांचा मोठ्या आवेशानें वाद चालला होता; एकानें म्हणावें कीं आन हे बेडकांचें पूर्णतेला पावलेलें प्रतिरूप होय; दुसऱ्यानें म्हणावें कीं बेडूक हें आनांचें उत्तमोत्तम विकसित रूप होय. नीतिशास्त्रज्ञांचा व सृष्टपदार्थ शास्त्रज्ञांचा मतभेद होता; पण त्यांच्यांतले पुष्कळ लोक बेडूक अधिक चांगला मानणाऱ्या मताचे होते. ते म्हणत कीं ( व त्यांत बराच सत्याभास असे ) आचार नीतींत ( म्हणजे व्यक्तीच्या व समाजाच्या आरोग्यास व कल्याणास जे नियम बहुत योग्य होत त्यांचें अवलंबन ) करण्यांत बेडकाचें श्रेष्ठत्व आहे यांत संदेह नकोच. इतिहासांत सर्वत्र

असें दिसतें कीं सर्व मानवीजातींत इथून तेथवर सगळी अनीती व स्वतःच्या व सर्व साधारण लोकांच्या सुखाला व कल्याणाला आवश्य असे त्यांनीं कबूल केलेले जे नियम त्यांज विषयीं, त्यांच्यांत अत्यंत विख्यात म्हणविलेले जे आहेत त्यांजकडून उपेक्षा झालेली आहे. पण बेडकाच्या जातीविषयीं कितीही चिकित्सक परीक्षण करणारा असला, तरी त्याला देखील त्यांच्या वागणुकींत त्यांनीं मुकाट्यानें मान्य केलेला नियमांला सोडून वांकडी चाल एकही प्रसंगीं दिसून येणार नाहीं. जर जिजबद्दल एवढा यत्न करावयाचा, व जी सुधारणा कितपत झाली आहे हें ताडण्याचें प्रमाण होय, ती आचार नीतीची श्रेष्ठता जर साधत नाहीं, तर सुधारणे पासून काय फायदा!

"सारांश कायकीं या मताचें अवलंबन करणारे असें मानीत कीं कांहीं एक प्राचीन काळीं मानवी जातीचें फार सुधरून बनलेलें जें रूप, तीं ही बेडकांचीं जाती होय. परंतु कांहीं कारणांमुळें— ज्यांची युक्तीनें अटकळ करणें कठीण आहे— सृष्टीच्या परंपरेंत त्यांचें आद्य स्थान त्यांस राखतां आलें नाहीं. इकडे, आना हे कनिष्ठ घटनेचे तर खरे, पण त्यांनीं सद्गुणा पेक्षां दुर्गुणांच्या म्हणजे उग्रता व धूर्तता यांच्या प्रभावानें उत्तरोत्तर आपलें वर्चस्व स्थापिलें. जसें मानवी जातींतल्या जातींतच, अगदीं रानटी अशा लोकांनीं असल्या दुर्गुणाच्या पटा-

ईत पणामुळें जे लोक आद्यतः मानसिक गुण व विद्या यांनीं त्यांजपेक्षां श्रेष्ठ होते त्यांस समूळ नष्ट केलें, अगर कःपदार्थ करून सोडलें आहे, तसलाच हा प्रकार होय. दुर्दैवानें हे वाद त्या युगांतील धर्म संबंधीं मतांत घुसडले गेले. आणि समाजाचें शासन कुम–पोशच्या अमला खालीं चालत होतें, व ते होते अति अज्ञानी; तेव्हां त्यांचा वर्ग पडला माथे फिराऊ– म्हणून लोकांनीं हा वाद तत्ववेत्त्याच्या हातांतून काढून घेतला. राज्य पद्धतीच्या अग्रणींनीं ताडलें कीं, लोकांस वेडं करणारा हा बेडक्यावाद आपल्या महत्वाकांक्षा सिद्धीस नेण्यास मोठें नामी साधन होईल. पुढें एक सहस्र वर्षं पर्यंत लढाया व कलह चालू होते. त्या अवधींत उभय पक्षांकडील तत्ववेत्ते चराचर कापले गेले. व सुदैवें करून कुम–पोशचें राज्यही नष्ट झालें, तें असें कीं, कोणी एका कुटुंबानें आपण अगदीं आदिमवासी जे बेडुक त्यांच्या पासून आपला वंश खास आहे असें सिद्ध केलें, व आनांच्या अनेकविध जातीच्या स्वतंत्र राज्यांवर ते अधिष्ठित झाले. जेव्हां व्हिल रसाचा शोध लागला, व ज्यांच्या योगें व्हिल्या जातीच्या सर्व लोकांचीं उन्नती होत आहे त्या शांततेच्या संस्था त्या रसामुळें प्राप्त झाल्या, तेव्हां हे स्वेच्छाचारी राजे आमच्या समाजांतून तरी नाहींसे झाले आहेत."

"तर मग ते कलहवादी अगर तत्ववेत्ते तो वाद पुनः

सुरू करण्यास जिवंत नाहींत काय ! कां, ते तुमच्या सर्व जातीची उत्पती बेडकापासून आहे असें कबूल करतात!"

स्री गंभीर स्मित हास्य करून म्हणाली " छेः असले वाद तमो युगांतील पाः बोध ( pah bodh ) पैकीं आहेत. हल्लीं ते लहान मुलांच्या मनरंजनास बरे उपयोगी पडतील. ज्या भूतां पासून आपले देह निर्माण झाले आहेत, तीं कोणतीं आहेत, हें आपणास ठाऊक असतां, व तींच अत्यंत क्षुद्र रोप्यांत व आपणांस आहेत हें माहीत असतां, त्या सर्वज्ञ परमेश्वरानें एका रूपापेक्षां दुसऱ्यांतून अधिक भाग घेऊन, त्याच्या विषयीं ज्ञान व त्याजपासून होणारे बुद्धीचे अनेकविध प्रभाव, धारण करण्याची ग्राहकशक्ती जर त्यानें साधिली असली तर त्यांत काय बिघडलें ! या ग्राहक शक्तीचें वरदान मिळाल्यापासून आन हे आन म्हणून वस्तुतः जीवारंभ पावले, व या ग्राहक शक्तीमुळें व तिचें दान मिळाल्याचें ज्ञान आहे तो पावेतों, असंख्यात युगेंची युगें लोटून, त्यांच्या शहाणपणाची सुधारणा झाली तरी, जीं भूतें याच्या आधीन आहेत त्यांजपासून एक बेडुक साधूं म्हटलें तर त्यास कधींही साधतां येणार नाहीं. "

आफ- लिन म्हणाले– "शाबास मुली. चांगलें बोललीस. आपल्या सारख्या अल्पायुषी मर्त्यांस, आपला आदिपुरुष बेडुक असो वा नसो, एवढें युक्तिसिद्ध आश्वा-

सन असलें म्हणजे बरस आहे कीं, जशा व्हिल्यांच्या सं-स्था नष्ट होऊन पूर्ववत् चिखलांत कुचुंबणाऱ्या व निः-संशय कलह पूरित कुम- पोश स्थितींत जाणें असंभाव्य आहे, तसे आपणही पुनः बेडुक होणें शक्य नाहीं. "

---

भाग १ समाप्त.